२८ सप्टेंबर २०१७

नवरात्रि - अष्टमी

॥ श्री ॥

# - तैत्तिरीय उपनिषद -

## - शांतिपाठ -

ॐ शं नो मित्रः शं वरुणः। शं नो भवत्वर्यमा।
शं नो इन्द्रो बृहस्पतिः। शं नो विष्णुरुरुक्रमः।
नमो ब्रह्मणे। नमस्ते वायो। त्वमेव प्रत्यक्षं ब्रह्मासि।
त्वामेव प्रत्यक्षं ब्रह्म वदिष्यामि। ऋतं वदिष्यामि।
सत्यं वदिष्यामि। तन्मामवतु। तद्वक्तारमवतु।
अवतु माम्। अवतु वक्तारम्।
ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः।

ॐ मित्र म्हणजे सूर्य आम्हाला सुख समाधान देवो. वरुण, अर्यमा, इंद्र आणि बृहस्पती या देवता आम्हाला कल्याणकारक असो. मोठ्या व्यापक पावलांचा (उरुक्रम) विष्णु आम्हाला समाधान देवो. ब्रह्माला नमस्कार असो. हे वायो, तुला नमस्कार असो. तूच दिसणारे ब्रह्म आहेस. मी तुलाच दृश्य ब्रह्म म्हणेन. मी योग्य तेच (वैश्विक सत्य) सांगेन. सत्य तेच बोलेन. त्याने माझे रक्षण होवो. वक्त्याचे रक्षण होवो. ॐ सर्व दुःखांची शांति होवो.

ॐ प्रणव हे ब्रह्माचेच रूप आहे म्हणून त्याचे स्मरण प्रथम केले आहे. त्याच्यापर्यंत पोहोचण्याचे साधन म्हणजे हिरण्यगर्भ! त्यानेच या जगाची निर्मिती केली. दररोज तोच ऊर्जा पुरवतो. म्हणून तो जगताचा मित्र आहे. त्याची शक्ति अर्यमा आहे व किरणे आवरून अस्ताला जाणारा वरुण आहे. सूर्याचीच ही भिन्न रूपे आहेत. त्यांना प्रार्थना केली आहे.

त्यानंतर देवांचा राजा इंद्र, वाणीचा पती बृहस्पती यांना वंदन केले आहे. (शिकणे व शिकवणे हे वाणीमुळेच शक्य होते.) सर्व काही व्यापणारा, ज्याची पावले मोठी

© www.madhaveeraghuveer.com

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |
| 29 | 30 | 31 | | | | |

आहेत असा त्रिविक्रम विष्णू आणि ब्रह्म यांची प्रार्थना केली आहे.

यजुर्वेदाचा अंतरिक्ष लोक (ऋग्वेद - भूलोक, सामवेद - द्युलोक) आहे. या अंतरिक्षात संचार करणाऱ्या वायुला नमस्कार केला आहे. पंचभूतात तोच प्रथम प्रत्ययाला येतो.

प्राणस्य हि वशे सर्वं यत् त्रिदिवे प्रतिष्ठितम्। तिन्ही लोकात प्रतिष्ठित असलेले (भू, स्वर्ग, पाताळ) सर्व या प्राणावरच अवलंबून असतात. त्याची प्रार्थना आहे.

त्यानंतर गुरु व शिष्याचे रक्षण करण्यासाठी प्रार्थना केली आहे.

- परिचय -

यजुर्वेदाचे दोन भाग आहेत - कृष्ण यजु. व शुक्ल यजु. म. वेदव्यासांचे शिष्य वैशंपायन. त्यांच्याकडे यजुर्वेदाच्या अध्ययन-अध्यापनाची जबाबदारी होती. त्यांनी यजुर्वेदाच्या २६ शाखांची रचना करून शिष्यांना यजुर्वेद शिकवला.

ऋग्वेद
यजुर्वेद
सामवेद
अथर्ववेद

यज्ञ करताना कमीत कमी १८ जणांची उपस्थिती आवश्यक असते. अध्वर्यु, होता, उद्गाता, ब्रह्म

अध्वर्यु हा प्रमुख असतो. यज्ञाची जबाबदारी त्याच्यावर असते हा यजुर्वेदाचा असतो. त्याच्या सांगण्याप्रमाणे सर्व विधि होत असतात.

या चार ऋत्विजांना प्रत्येकी ३-३ सहाय्यक असतात शिवाय यजमान व यजमान पत्नी उपस्थित असतात.

Birthday / Anniversary

©www.madhaveeraghuveer.com

यज्ञाची ५ अंगे असतात.

सुयोग्य उच्चारणातील मंत्र, अन्नदान, दक्षिणा, श्रद्धा, शास्त्र!

यज्ञ जर विधिवत् यथासांग पूर्ण झाला तर यज्ञाचे फळ तत्काळ मिळते. — पायसदान, पर्जन्ययज्ञ – छत्री आणि या सर्व विधिंमध्ये कुठे काही चूक झाली तर ब्रह्महत्येचे पातक लागते. त्यासाठी प्रायश्चित्त घ्यावे लागते. एकदा वैशंपायनांच्या हातून यज्ञविधीमध्ये काहीतरी चूक झाली. तेव्हा त्यांनी आपल्या शिष्यांना आपल्या वतीने प्रायश्चित्त घेण्यास सांगितले. तेव्हा त्यांचा लाडका शिष्य, त्यांचा भाचा, बुद्धिमान असे याज्ञवल्क्य त्या चुकीचे प्रायश्चित्त घेण्यासाठी तयार झाले. ते म्हणाले – "सर्वांना याचा त्रास नको. मी एकटाच आपल्या वतीने प्रायश्चित्त घेतो."

या त्यांच्या बोलण्याने गुरुजी प्रसन्न तर झालेच नाहीत. उलट क्रुद्ध झाले. कारण आधीपासूनच त्यांचा या शिष्यावर राग होता. (कारण त्याने ऋग्वेद व इतर ज्ञान दुसऱ्या गुरूकडे शिकून मिळवले होते.) तो राग उफाळून आला. व असा बढाईखोर शिष्य नकोच माझ्याजवळ रहायला! असे बोलून त्याला आश्रमाबाहेर पाठवले.

याचे याज्ञवल्क्यांना आश्चर्य व वैषम्य वाटले. त्यांनी गुरुंची आज्ञा प्रमाण मानली व ते जाऊ लागले. तेव्हा त्याचाही वैशंपायनांना राग आला व त्यांनी याज्ञवल्क्यांना आजपर्यंत शिकलेली विद्या परत द्यायला सांगितले.

याज्ञवल्क्यांनी गुरुंना शांत करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. शेवटी अपमानित झालेल्या याज्ञवल्क्यांनी वैशंपायनांकडून शिकलेला यजुर्वेद ओकला. म्हणून तो कृष्ण झाला.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

वैशंपायनांच्या इतर शिष्यांनी तित्तिर पक्ष्यांची रूपे घेऊन तो वेद टिपला, खाऊन टाकला. म्हणून या भागाला तैत्तिरीय उपनिषद (कृष्ण यजुर्वेद) म्हणतात.

कुणी म्हणतात तित्तिरी नावाच्या ऋषींनी यजुर्वेद सांभाळला. त्यामुळे त्याला 'तैत्तिरीय संहिता' म्हणतात.

तैत्तिरीय संहितेची सात कांडांत विभागणी केली आहे. कांडाच्या विभागाला प्रपाठक (किंवा प्रश्न) म्हणतात. व त्याच्या पोटविभागाला अनुवाक म्हणतात. या अनुवाकात मंत्र असतात.

तैत्तिरीय आरण्यकात दहा अध्याय आहेत. त्यातील सात, आठ, नऊ अध्याय म्हणजे हे उपनिषद आहे.

या उपनिषदातील तीन अध्यायांना वल्ली म्हणतात.

१. शिक्षावल्ली — उपासना —— १२ अनुवाक
२. ब्रह्मानंदवल्ली — ब्रह्मानंदाचे स्वरूप —— ९ अनुवाक
3. भृगुवल्ली - भृगुंना झालेली आनंदाची प्राप्ती — १० अनुवाक

वेदांची षडंगे - कल्प, शिक्षा, व्याकरण, निरुक्त, छंद, ज्योतिष
कल्प - विधी विधान Code of conduct
धर्म, शौच, गृह्य
शीक्षा - वर्णोच्चार शास्त्र - उदात्त, अनुदात्त, स्वरित.
व्याकरण - पाणिनिच्या अष्टाध्यायी ग्रंथानुसार
निरुक्त - शब्दांची व्युत्पत्ति
छंद - मात्राबद्ध रचना Meter
ज्योतिष - ग्रह तारे तिथि

©www.madhaveeraghuveer.com

April 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | | |

Priority ID 411 695 2290

password yoga@om

THU MAR 18 2010

Wk 11, 077-288

# शीक्षा वल्ली - Phoenetics

## उच्चारणशास्त्र.

8 am

यापूर्वी अभ्यासलेला शांतिमंत्र हाच प्रथम अनुवाक्!

9

## द्वितीय अनुवाक् —

10

शीक्षां व्याख्यास्यामः। वर्णः स्वरम्। मात्रा बलम्। साम सन्तानः। इति उक्तः शीक्षाध्यायः।

11

इथे शीक्षा असा दीर्घ शब्द असला तरी मूळ खरा शिक्षा हाच शब्द योग्य आहे. हे छान्दस/आर्ष रूप आहे. कवयः निरंकुशाः असे म्हटले जाते.

12

1 pm

पूर्वी आचार्य संथा देत व शिष्य ग्रहण करत. वेद हे अशा मौखिक परंपरेतून सांभाळले गेले आहेत. आज काश्मीर ते कन्याकुमारी पर्यंत वेद पठणात कानामात्रेचा फरक नाही. फरक आहे तो Tone मध्ये.

2

3

उच्चारावर विशेष भर दिला जायचा. चूक झाली तर ती तत्काळ सुधारली जायची. उच्चारणावर विशेष भर दिला जायचा. मंत्रार्थवाद - सौंदर्यलहरी

4

उच्चाराचे शास्त्र चांगले विकसित झाले होते

5

वेदांची सहा अंगे आहेत. शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छंदस, ज्योतिष.

6

देवनागरी लिपीमध्ये मूळ व्यंजने ३६ व स्वर १६ मानले जात आज मात्र ३३ व्यंजने व १३ स्वर मानले जातात.

7

अ आ इ ई उ ऊ ऋ ॠ ऌ ॡ ए ऐ ओ औ अं अः ॥

स्वरांचा उच्चार स्वतंत्रपणे करता येतो. परंतु व्यंजनांचा उच्चार स्वर मिळवल्याखेरीज करता येत नाही. व्यंजन + स्वर = अक्षर — शब्द — वाक्य.

उच्चारणासाठी जो वेळ लागतो त्याला मात्रा म्हणतात.

नुसते व्यंजन - हलन्त - अर्धी मात्रा, ऱ्हस्व स्वर - एक मात्रा, प्लुत स्वर - तीन मात्रा, दीर्घ स्वर - दोन मात्रा

© www.madhuveeraghuveer.com

बक म्हणजे प्रयत्न हे दोन प्रकारचे असते.

आंतरिक — स्पृष्ट, ईषत् स्पृष्ट, विवृत, ईषत्विवृत, संवृत

स्पृष्ट - क, च, ट, त, प - वर्णगट - २५ वर्ण

ईषत् स्पृष्ट - य व (अर्धस्वर)

विवृत - 'आ'

अर्धविवृत - अ, ए, ओ

संवृत - इ, ई

बाह्य प्रयत्न - विवार, संवार, श्वास, नाद, घोष, अघोष, अल्पप्राण, महाप्राण, उदात्त, अनुदात्त, स्वरित.

साम म्हणजे उच्चारण सम असावे. एका तऱ्हेने, एका कृतीने, एका प्रकाराने व्हायला हवे..

दोन शब्दात योग्य अंतर, वाक्यानंतर आवश्यक विराम, वाक्य उच्चारताना स्वराचा चढउतार हे सर्व उच्चार शास्त्रात अंतर्भूत आहे.

(3)

- तृतीय अनुवाक -

सह नौ यशः। सह नौ ब्रह्मवर्चसम्। अथातः संहिताया उपनिषदं व्याख्यास्यामः। पञ्चस्वधिकरणेषु। अधिलोकम् अधिज्योतिषम् अधिविद्यम् अधिप्रजम् अध्यात्मम्। ता महासंहिता इत्याचक्षते। अथ अधिलोकम्। पृथिवी पूर्वरूपम्। द्यौरुत्तररूपम्। आकाशः सन्धिः। वायुः सन्धानम्। इति अधिलोकम्।

परमेश्वराने गुरु व शिष्य दोघांना यश द्यावे. गुरु ज्ञानसंपन्न व अनुभवसंपन्न आहेतच पण शिवाय त्यांच्याकडे दुसऱ्यांना समजावून सांगण्याची हातोटी असू दे. गुरुकडे अध्यापनकौशल्य व शिष्याची आकलनशक्ती योग्य असेल तरच ज्ञानदान व ज्ञानग्रहण दोन्ही परस्परपूरक ठरते.



©www.madhaveeraghuveer.com

8 am ब्रह्मवर्चस - तेजाचे तीन प्रकार तेजस, ओजस, वर्चस
तेज डोळ्यांनी दिसते. ओज वाणीतून जाणवते. तर
वर्चस हे आंतरिक (आध्यात्मिक) असते. ब्रह्मसाक्षात्काराचे
तेज सर्व अंगांगातून जाणवते.

10 श्रीसूक्ताच्या फलश्रुतित म्हटले आहे.
श्री। वर्चस्वमारोग्य माविधा-च्छोभमानं महीयते।

11 ब्रह्म जाणून घेण्यासाठीच शिष्य गुरूकडे आला आहे.
तो उद्देश ईश्वरी कृपेवाचून पूर्णत्वाला जाणार नाही.

12 संहिता - जोड, संधि - दोघांनी एकत्र येऊन काम करणे.
सांगणारा एकटा असून चालणार नाही. ऐकणारा हवा.
1 pm वक्ता वक्ता नोहे श्रोत्याविण।
शिवाय या दोघांना जोडणारी गोष्ट हवी. - भाषा
2 तेव्हाच बोलण्याचा, सांगण्याचा व्यवहार होऊ शकतो.

बोलणारा व ऐकणारा यांची जोडी —— संहिता
3 त्यांना जोडणारी भाषा —— संधान
बोलण्याचा व्यवहार —— संधि

4 या विश्वात पाच संहिता आहेत. अधिलोकम्, अधिज्योतिषम्,
अधिविद्यम्, अधिप्रजम्, अध्यात्मम्।
5 अधि म्हणजे त्या विषयाबद्दल, त्या संबंधी.
या पाच महत्वपूर्ण संहिता आहेत ∴ महासंहिता
6 ही कल्पना व्यावहारिक उदाहरणातून श्री. फडकेशास्त्री
स्पष्ट करतात. जात्याला दोन तळी (पाळी) असतात.
7 ती जोडण्यासाठी मध्ये खिळा (सांधा) असतो. या तीन
गोष्टी असल्याशिवाय दळणाची क्रिया होणारच नाही.
खालच्या भक्कम (स्थिर) तळीला पूर्वरूप म्हणतात
वरच्या फिरत्या तळीला उत्तररूप
मधला खिळा म्हणजे संधान
दळण्याची क्रिया म्हणजे संधि
Birthday / Anniversary या सर्वाचा परिणाम म्हणजे दळण्याची क्रिया आहे

© www.madhavveeraghuveer.com

8 am संधी या शब्दात (व्यावहारिक दृष्ट्या) असेच होते.
शिव + आकार = शिवाकार ; इति + उक्ता - इत्युक्ता
9 तम् + उवाच = तमुवाच
दोन शब्द एकत्र येऊन संधी बनतो.
10 पूर्वरूप - संधान - उत्तररूप = संधी
काशीपुर + अधीश्वरी = काशीपुराधीश्वरी
11 हीच कल्पना पुढे नेत पाच संहिता सांगितल्या आहेत
म्हणजे लोकासंबंधी - भूलोक, भुवर्लोक, स्वर्लोक
12 या सर्वांचे ज्ञान आम्ही पृथ्वीवर (बसून) ग्रहण करतो.
पूर्वरूप संधान उत्तररूप संधी
1 pm पृथ्वी वायु स्वर्ग आकाश
वायुने पृथ्वी व ~~अ~~ स्वर्ग जोडले आहेत. वायु हा
2 संधान = जोडणारा आहे. यजुर्वेदात वायु महत्त्वाचा मानतात
खरे तर ही संकल्पना भाषाशास्त्रातून घेतली आहे
3 स्वर, व्यंजन, स्वादि, विसर्ग, अनुस्वार हे एकत्र आले की
संधी बनतो.
4 स्वर + स्वर = इति + आहु: = इत्याहु: ( तथा + एव = तथैव
व्यंजन + स्वर =
5 व्यंजन + व्यंजन = पुरस् + कार = पुरस्कार
विसर्ग + स्वर = स: + अपि = सोऽपि, आदित्य: + उत्तर
6 अनुस्वार आदित्य उत्तर
स्वादि शिव: + अहम् = शिवाऽहम् ।
7 हे सर्व विश्व परस्परांशी जोडले आहे. इथे कशाच्या
एकाचा विचार करून चालत नाही. ज्यांच्या दोन्ही तळी
जोडली असल्यानेच क्रिया घडते. दोन वर्ण एकत्र येऊन
जसे शब्द बनतात. तसे विश्व हे एकरूप आहे.
दिसायला भिन्नता दिसली तरी त्यामध्ये एक तत्त्व, एकधागा,
सूत्र आहे. जोडलेले आहे. त्याचा साकल्याने विचार करायला
हवा Wholistic Approach.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

April 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | | |

Priority

MON MAR 2010 22

Wk 12, 081-284

8 am

अथ आधिज्यौतिषम् । अग्निः पूर्वरूपम् । आदित्य उत्तररूपम् । आपः संधिः । वैद्युतः संधानम् । इति आधिज्यौतिषम् ॥

9

आता ज्योति (प्रकाश) विषयी सांगतो. अग्नि हे प्रकाशाचे अलीकडचे रूप, सूर्य हे पलीकडचे रूप, पाणी हे त्यांना जोडणारे स्थान आणि विद्युत ही त्यांना जोडणारी साखळी आहे.

10 11

रात्रीच्या वेळी देखील प्रकाश व उब देणारा, आकाशातील तेजाचा प्रतिनिधी म्हणजे अग्नि. हा पूर्वरूप अंतरिक्षातील तेजोनिधी आदित्य हा उत्तररूप आहे. हे दोन्ही जिथे एकत्र येतात तिथे आप आहे. तो संधि आहे.

12 1 pm

काहींच्या मते आप म्हणजे मेघ तर काहींच्या मते वातावरणातील बाष्प / आर्द्रता / दमटपणा आहे.

2

आप शब्द नेहमी बहुवचनात वापरतात. (प्राण, देश) या सर्वांना जोडणारी वीज आहे. वीजमुळे पिकांना पोषक वायु निर्माण होतो.

3

काही वेळा आप याचा अर्थ चंद्र असाही घेतला जातो. चंद्र हा जलमय आहे.

4

तेजाचे सागरीकरण वायुतून होत असते. आप / जलतत्त्व हे दोन वायुचे एकत्रीकरणच $H_2O$ आहे.

5

हा वायु तेज बनून माणसाचे जीवन सुलभ, सुकर करतो. तेजाचे चार स्रोत आहेत. १. भौम (भूमीवरील) अग्नि २. अंतरिक्षातील आदित्य ३. शांत शीतल चंद्र ४. चंचल अशी वीज चपला.

6 7

वीजमुळे पोषक वायु निर्माण होतात, चंद्र त्यात औषधीद्रव्ये भरतो, पुष्णामि चौषधीः सर्वाः ..... सूर्य त्यात पोषकद्रव्ये भरतो. व अग्निमुळे शिजवून ते अन्न खाण्यायोग्य होते. ही सर्व मानवी जीवनाला आवश्यक असणारी ज्योतीची रूपे आहेत. त्यांचा एकत्रित विचार केला जातो.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

न तद् भासयते सूर्यो न शशाङ्को न पावकः। भगवद्गीता
रवि शशी अग्नि नेणती ज्या रूपा ।। - संत एकनाथ

न तत्र सूर्यो भाति न चंद्रतारकं
नेमा विद्युतो भान्ति कुतोऽयमग्निः।
तमेव भान्तमनुभाति सर्वं
तस्य भासा सर्वमिदं विभाति।। कठोपनिषद्.

त्या स्वयंप्रकाशी आत्म्याचा विलास म्हणजे हे विश्व आहे. आपले जीवन हे देखील त्या विलासाची एक तऱ्हा आहे. आपणही आपल्याच आयुष्याकडे त्या परमात्म्याची लीला क्रीडा म्हणून साक्षीभावाने पहायला शिकले पाहिजे.

अथ अधिविद्यम् । आचार्यः पूर्वरूपम् । अन्तेवासी उत्तररूपम् । विद्या सन्धिः । प्रवचनम् संधानम् । इति अधिविद्यम् ।

आता विद्येसंबंधीची संहिता सांगतो. गुरु हे अलीकडचे (पूर्वरूप) रूप, शिष्य हे पलीकडचे (उत्तररूप) रूप आहे. ज्ञान हे त्यांना जोडणारे स्थान आणि व्याख्यान ही त्यांना जोडणारी साखळी आहे.

अन्तेवासी - अन्तिक - जवळ. गुरुकुलात राहून शिकणारा छात्र हे उत्तररूप आहे.

ज्ञानदान करणारा उत्तम गुरु हवा — पूर्वरूप
चांगली आकलनशक्ती असणारा शिष्य हवा. — उत्तररूप
विषय समजावून सांगणारे प्रवचन हवे — संहिता

हे सर्व जुळून आले तर त्यातून विद्येची निष्पत्ति होईल. म्हणूनच गुरुला कुशाग्र शिष्य हवा असतो.

© www.madhaveeraghuveer.com

२९ सप्टेंबर २०१७

अथ अधिप्रजम् । माता पूर्वरूपम् । पिता उत्तररूपम् । प्रजा सन्धिः । प्रजननम् संधानम् । इति अधिप्रजम् ।

प्रजोत्पादन झाले नाही तर मनुष्यजात संपून जाईल. DINK Culture. विश्वाचे रहाटगाडगे सुरक्षित चालण्यासाठी प्रश्नोपनिषदात 'प्रजापति व्रत' सांगितले आहे. आपल्याकडे संततिसाठी विवाह करणे हे अखिल मानवजातीसाठी घेतलेले व्रत आहे. आपल्या संस्कृतीत सर्व गोष्टींचा समतोल साधला आहे. इंद्रियांना अति स्वैर सोडू नये तसेच त्यांची उपासमारही करू नये.

काम हा आवश्यक आहे. मात्र तो मर्यादेत असावा. धर्माच्या चौकटीत तो सुरक्षित असतो.

धर्माविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ ।
काम ही तर भगवंताची विभूति मानली आहे. त्यामुळे तो त्याज्य निंद्य तर नाहीच. उलट स्वीकारार्ह आहे. स्वैद्य नाही तर निरोगी समाजासाठी तो आवश्यकही आहे. मात्र तो उच्छृंखल नसावा.

| | |
|---|---|
| माता - पूर्वरूप | पिता उत्तररूप |
| प्रजा - संधि | प्रजनन - संधान |

गुरुकुलामध्ये विद्याग्रहण करून परत घरी जाताना (समावर्तन) गुरुजी सुशील, सद्गुणी कन्येशी विवाह करून वंशसातत्य राखण्याचा बोध शिष्याला करतात.

अथ अध्यात्मम् । अधरा हनुः पूर्वरूपम् । उत्तरा हनुः उत्तररूपम् । वाक् संधिः । जिह्वा संधानम् । इति अध्यात्मम् ॥

आता शरीर विषयक (स्वतःविषयी) सांगतो. खालचा ओठ हे पूर्वरूप, वरचा ओठ हे पलीकडचे (उत्तररूप) वाणी हे जोडणारे स्थान तर जीभ ही त्यांना



© www.madhavieeraghuveer.com

8 am जोडणारी साखळी आहे.

शरीरातील मुख्य भाग म्हणजे मुख आहे. जे आपल्या शरीरात असले तरी विशेषत्वाने प्रगट होते. खालच्या व वरच्या जबडा हे पूर्वरूप, उत्तररूप आहे. वाणी ही दोन्हींच्या मध्ये असणारी संधी तर जीभ हे प्रगट करण्याचे साधन (संधान) आहे.

या वाणीनेच मनुष्य बोलतो, व्यवहार करतो. अभिप्राय देतो. माणसे जोडतो किंवा तोडतो. याच वाणीने प्रार्थना म्हणतो किंवा अपशब्दही बोलतो. ज्ञान देतो व घेतो.

1 pm

इति इमा महासंहिता: । य एवम् एता: महासंहिता: व्याख्याता: वेद । संधीयते प्रजया पशुभि: । ब्रह्मवर्चसेन अन्नाद्येन सुवर्ग्येण लोकेन ।

3

अशा या पाच महासंहिता आहेत. जो मनुष्य या सांगितलेल्या (व्याख्याता:) महासंहितांना जाणतो तो चांगल्या पुत्रपौत्रांनी, पशुधनाने, ब्रह्मज्ञानाच्या तेजाने, अन्नादि भोग्य पदार्थांनी व स्वर्ग लोकाने समृद्ध होतो.

संहिता ही संकल्पना ज्याला कळली त्याला जीवनातील एक महत्त्वाचे सूत्र कळते की जगात एकट्याने काही होत नाही. अनेकजणांचा सहभाग प्रत्येक गोष्टीत असतो. प्रत्येक व्यवहारात कमीत कमी दोन गोष्टी असतात. हे आयुष्य म्हणजे Team-Work आहे हे ज्याला कळेल तो माणसे जोडत जाईल. (कदाच Leader / Captain न बनता सर्वांना प्रेमाने जवळ करेल त्याचा लोकसंग्रह वाढेल. हे चराचर विश्व ज्या धाग्याने बांधले आहे, त्याविषयी त्याला कृतज्ञता वाटेल. आणि

Birthday / Anniversary त्यातून त्याला ऐहिक व पारलौकिक समृद्धी मिळेल.

© www.madhaveeraghuveer.com

उपनिषदकालीन ऋषींनी कधीच प्रपंचाला त्याज्य मानले नाही, तर गौण मानले आहे. ज्ञान म्हणजे ब्रह्मज्ञान/आत्मज्ञान आणि विज्ञान म्हणजे भौतिक किंवा दृश्य विश्वाचे ज्ञान. ही दोन्ही ज्या वेळी एकत्र नांदतात त्याच वेळी मानवी जीवनाला खरे ऐश्वर्य लाभते. आणि म्हणूनच जीवनात प्रपंच आणि परमार्थ. व्यवहार आणि ईश्वर यांची सांगड घालणे उचित ठरते. पूर्वी लोकसंख्या मर्यादित होती तेव्हा कुटुंबात पुष्कळ माणसे असणे हे श्रीमंतीचे लक्षण मानले जायचे तसेच पशुधन, गोधन यावर समाजातील प्रतिष्ठा ठरायची मात्र त्याच वेळेस सर्वांना धरून राहण्याची, संबंध सांभाळण्याची आवश्यकता होती. हा लोकसंग्रह हे दैविक ऐहिक समृद्धीचे लक्षण मानले जात असे.

आणि त्याचबरोबर गुरुकृपेने, गुरुसेवेने विद्या प्राप्त करून घ्यायला हवी. कृतज्ञतापूर्वक ज्ञानाचा आदर करायला हवा. त्याने पारमार्थिक समृद्धी मिळते स्वर्गही मिळतो आणि त्याच्याही पेक्षा श्रेष्ठ असे ब्रह्मही प्राप्त होते.

अशी व्यक्ती कांतिमान (त्वचेने) तेजस्वी (डोळ्यांनी) ओजस्वी (वाणीने) आणि ब्रह्मवर्चस्वी (सर्वांगाने- Aura) होते. त्याला प्राप्त करण्यासारखे काही उरतच नाही.

तेव्हा शिष्याने या महासंहिता समजावून घ्याव्यात. आजच्या जगात या दृष्टीकोनाची नितांत आवश्यकता आहे.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

३० सप्टेंबर २०१७
– विजयादशमी

## – चतुर्थ अनुवाक –

यः छन्दसाम् ऋषभः विश्वरूपः छन्दोभ्यः अधि
अमृतात् सम्बभूव । सः मा इन्द्रः मेधया स्पृणोतु ।
अमृतस्य देव धारणो भूयासम् । शरीरं मे विचर्षणम् ।
जिह्वा मे मधुमत्तमा । कर्णाभ्यां भूरि विश्रुवम् ।
ब्रह्मणः कोशोऽसि मेधया पिहितः । श्रुतं मे गोपाय ।

मागील अनुवाकात आपण पाच महासंहितांचा अभ्यास केला. त्यातील तिसरी म्हणजे 'अधिविद्यम्' गुरुकुलामध्ये या अधिविद्यम् संहितेचा संबंध अधिक येणार. कारण गुरुकुलामध्ये गुरुशिष्यांमध्ये विद्येचा व्यवहार उत्कृष्ट व्हायला हवा. आचार्यांना उत्तम ज्ञान असले तरी शिष्यापर्यंत ते पोहोचवता यायला हवे. त्यांना समजेल अशा भाषेत सांगता यायला हवे. त्यासाठी गुरुंनी देखील नित्य अध्ययनशील असायला हवे. आपले ज्ञान अद्ययावत ठेवायला हवे. तसेच विद्यार्थ्यांजवळ ज्ञानपिपासा हवी. गुरुंवर श्रद्धा हवी. नित्य अध्ययन करायला हवे. त्यासाठी दोघांच्या हिताची प्रार्थना केली आहे.

छन्द म्हणजे वेद – छादनात् छन्दः – झाकून ठेवणारा वेदांमध्ये परब्रह्माचे ज्ञान (गुप्तपणे) भरलेले आहे. ते झाकून ठेवले आहे. या वेदातील ऋषभ म्हणजे सर्वश्रेष्ठ जो विश्वरूप ॐकार आहे, त्यालाच इंद्र म्हटले जाते. त्या इंद्राला – पर्यायाने ॐकार / परब्रह्माला मला समृद्ध, बुद्धिमान मेधावान करण्याची प्रार्थना केली आहे. त्यामुळे आचार्य जे सूक्ष्म ज्ञान सांगतील ते ग्रहण करण्याची क्षमता वाढत जाते. बुद्धी हळूहळू कुशाग्र होत जाते. आचार्य सूत्ररूपाने, मुद्रा स्वरूपात जे ज्ञान देतात ते आकलन होते. — विवेकचूडामणि
गुरोस्तु मौनं व्याख्यानम् ।

Birthday / Anniversary

©www.madhavaraghuveer.com

गुरु जे ज्ञान देत आहेत ते अमृत आहे. म्हणूनच मला या संसरणातून मुक्त करणारे आहे. मला ब्रह्मरूप व्हायचे आहे. मी त्याची धारणा करणारा होवो. मला पूर्ण ज्ञान प्राप्त व्हावे.

त्याबरोबर ही विद्या दुसऱ्यांना देण्याचे सामर्थ्य मला दे. माझे शरीर चपळ (विचर्षणम्) राहू दे. स्वास्थ्य, आरोग्य, चैतन्य यांनी परिपूर्ण देह असू दे. छात्रही तसाच निरोगी, सुदृढ हवा. नाहीतर पाठांत दोघांचीही एकाग्रता होणार नाही. शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्।

माझी वाणी मधुप्रमाणे मधुर कर. मी सांगितलेले छात्रांना समजू दे. सहजसुलभ, रस निर्माण होईल असे मला बोलता येऊ दे. इतकेच नाही तर माझ्या वाणीत असे आकर्षण असू दे की दररोज नवीन शिकण्याची ओढ छात्रांना लागावी. उत्सुकतेने जिज्ञासु वृत्तीने समजावून घ्यावे.

माझ्या कानांनी खूप ग्रहण करावे. मिळेल तिथून ज्ञान मिळवावे. पूर्वी गुरुकुल चालवणारे आचार्य देखील आपल्याला माहीत नसलेल्या विषयांचे ज्ञान करून घेण्यासाठी शिष्यभावाने दुसऱ्या आचार्यांकडे समित्पाणी जात असत. वेळ पडली तर, राजा (क्षत्रिय) कडे सुद्धा ज्ञानप्राप्तिसाठी जात असत. म्हणूनच शिक्षणाला मर्यादा नाही, शेवट नाही. शिकण्यासारखे आता काही उरलेच नाही अशी भावना गुरुमध्ये कधीही येऊ नये.

हे ॐकारा, तू ब्रह्माचा कोश आहेस. त्यावर मेधेचे झाकण आहे. ब्रह्म हे सामान्य बुद्धीच्या आकलनाबाहेरचे आहे. मला आत्मज्ञान ब्रह्मज्ञान होऊ दे. समजलेले सर्व चिरकाल राहू दे. मनात दृढ राहू दे. मी जे ज्ञान ग्रहण करीन, त्याचे तू रक्षण कर. त्याची विस्मृती होऊ देऊ नकोस.



© www.madhaveeraghuveer.com

| March 2010 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |
| 29 | 30 | 31 | | | | |

8 am जिव्हा मे मधुमत्तमा – आत्मज्ञान होण्यासाठी प्रथम अंतःकरण शुध्द असावे लागते. त्यासाठी शुध्द बुध्दी
9 व निर्वैर वृत्ती हवी. दुसऱ्याचे अंतःकरण दुखावले नाही की निर्वैर होता येते. आपल्या वाणीने जितकी
10 माणसे दुखावली जातात तितकी कृतीनेही दुखावली जात नाहीत. आपल्या बोलण्यामध्ये आपले अंतःकरण प्रकट
11 होत असते. म्हणून ज्याचे अंतःकरण शुध्द असते त्याची वाणी गोड असते आणि असत्य उलटही होते.
12 म्हणजे आपण मधुर भाषण करण्याचा अभ्यास केला. सवय लावली की अंतःकरण स्वच्छ व्हायला मदत होते.
1 pm म्हणून प्रसन्न बुध्दी आणि मधुर भाषण हे दोन्हीही साधकाला फार उपयोगी पडतात.

2

आवहन्ती वितन्वाना कुर्वाणा। अचीरम् आत्मनः। वासांसि
3 मम गावश्च। अन्नपाने च सर्वदा। ततो मे श्रियमावह।
लोमशां पशुभिः स्वाहा।
4 (ज्ञानप्राप्तीचे मंत्र म्हणून झाल्यावर आता) आचार्य श्रीच्या प्राप्तीचे मंत्र सांगत आहेत.
5 वस्त्रे आणि गायी, अन्न आणि पाणी या वस्तु आणणारी व विस्तार करणारी अशी श्री ज्ञानप्राप्तीनंतर
6 मला प्राप्त करून दे. ब्रह्मज्ञानाची जिज्ञासा असणारे विद्यार्थी माझ्याकडे येवोत.
7 गुरुजी गुरुकुलाच्या स्थापनेसाठी हवन करत आहेत. यजुर्वेद किंवा रुद्राचा ११ वेळा पाठ केला की छात्र
ज्ञानार्जनासाठी येतात. त्यासाठी काही मंत्र आहेत त्या छात्रांसाठी सर्व काही मला उपलब्ध व्हावे.
जे छात्र येतील त्यांना वस्त्रावरणे लागतील. दूधतूप लागेल. खाणे पिणे लागेल. थंडीवाऱ्याला त्यांना
Birthday / Anniversary उबदार कपडे लागतील. पशुपक्षी हवेत. चाकर देणार

© www.madhaveeraghuveer.com

| April 2010 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | | |

Priority

TUE MAR 30 2010

Wk 13, 089-276

8 am पशु हवेत. हे सर्व देणारी वृद्धिंगत होणारी, पसरणारी अशी श्री मला दे. यासाठी मी ही आहुति देत आहे.

श्री म्हणजे आश्रय देणारी! जिच्यामुळे अनेकजण आश्रयाला येतात ती श्री! जी सर्वांच्या उपयोगी पडते ती श्री! श्रीसूक्तात अशा जीवनावश्यक गोष्टीच मागितल्या आहेत. ज्याने जीवन समृद्ध होते ती श्री! केवळ पैशाची श्रीमंती नाही तर धनधान्य, दूधदुभते, गायी गुरे, रथ घोडे, नोकर चाकर तसेच निर्मळ पाणी, चलन वलन करणारा वायु, वातावरणातील प्रसन्नता, मनाची उदारता या सर्व गोष्टी श्री मध्ये अंतर्भूत आहेत.

1 pm

आमायन्तु ब्रह्मचारिण: स्वाहा। विमायन्तु ब्रह्मचारिण: स्वाहा। प्रमायन्तु ब्रह्मचारिण: स्वाहा। दमायन्तु ब्रह्मचारिण: स्वाहा। शमायन्तु ब्रह्मचारिण: स्वाहा।

ज्ञानाची तहान असणारे, जिज्ञासु वृत्तीचे, तल्लख बुद्धीचे ग्रहणशक्ती असणारे, गुरुकुलाचे नियम पाळणारे, शिस्त सांभाळणारे, शांत, संतुष्ट मन असणारे असे शिष्य माझ्याकडे येवोत.

आचार्यांकडून आपण जे ज्ञान मिळवले त्या ज्ञानाचे आपल्यावर ऋण असते. त्यातून मुक्ति मिळवण्यासाठी ते ज्ञान पुढे संक्रमित व्हायला हवे. तरच ते टिकून राहील. नाहीतर ते लोप पावते. ज्ञानाची ही साखळी खंडित होऊन चालणार नाही. ज्या ज्ञानाने आपल्याला लाभ झाला ते टिकवण्याची जबाबदारी आपल्यावर आहे.

ब्राह्मणाचे काम अध्ययन, अध्यापन आहे. आणि म्हणूनच अग्नीला आहुति देऊन प्रार्थना केली आहे.

ब्रह्मचारिण: मा आयान्तु।

Birthday / Anniversary

© www.madhaleeraghuveer.com

यशः जने असानि स्वाहा। श्रेयान् वस्यसोऽसानि स्वाहा। तं त्वा भग प्रविशानि स्वाहा। स मा भग प्रविश स्वाहा। तस्मिन् सहस्रशाखे नि भगाहं त्वयि मृजे स्वाहा।

असानि - असो , वयस्य - श्रीमंताहून श्रीमंत

मला या लोकात यश मिळू दे. माझे शिकवणे चांगले असू दे. माझे विद्यार्थी चांगले निघाले की मला यश मिळेल. माझे शील चांगले राहू दे. वसु म्हणजे धन। धनवानांहूनही मी अधिक श्रेयान होऊ दे. ज्यांच्याजवळ ब्रह्मज्ञान आहे व जो श्रेयसाच्या मार्गाने जाणारा आहे तो खरा धनवान। हे धन विश्वकल्याणासाठी हवे.

हे भग, भगवान् ॐकारा, मी तुझ्यात प्रवेश करावा. तू माझ्यात प्रवेश कर. मी ॐकारमय होऊन राहू दे.

भाग्य, उत्कर्ष, भरभराट, कीर्ति, सौंदर्य, मोक्ष ही गुणसंपदा ज्याच्याकडे आहे तो भगवान

ऐश्वर्यस्य समग्रस्य धर्मस्य यशसः श्रियः।
ज्ञानवैराग्ययोश्चैव षण्णां भग इतीरणा॥

जो ॐकारस्वरूप झाला तो विश्वकल्याणाखेरीज कसलाही विचार करत नाही.

सर्वच मंत्रांच्या पूर्वी ॐ चे उच्चारण केले जाते. सृष्टीचे मूळ तोच आहे. हे सर्व जग म्हणजे त्याचाच विलास आहे. हे सहस्रशाखा असणाऱ्या ॐकारा मी तुझ्याच ध्यानात मग्न होऊ दे. बुडून जाऊ दे. म्हणजे माझी जडता कमी होईल व मी अधिकाधिक शुद्ध होईन. मृजे - शुद्ध होऊ दे.

जडता मतीची भंगली
निःशेष जाळावहा

जडता कमी होणे ही अध्यात्ममार्गातील प्रगती आहे.

१ ऑक्टोबर २०१६

8 am यथा आपः प्रवता यान्ति, यथा मासा अहर्जरम्।
एवं मां ब्रह्मचारिणः धातरायन्तु सर्वतः स्वाहा।
9 प्रतिवेशः असि प्र मा भाहि प्र मा पद्यस्व।

10 ज्याप्रमाणे पाणी आपोआप सखल भागाकडे वाहत
जाते किंवा दिवस महिन्यामध्ये आणि महिने
11 संवत्सरात विलीन होतात त्याप्रमाणे चारी दिशांहून
शिष्य माझ्याकडे येवोत. अनेक प्रवृत्तीचे, अनेक स्तर,
12 भिन्न भाषीय शिष्य माझ्याकडे येवोत. कुठल्याही शिष्याला
(माझ्याकडून) नकार नाही. त्यातून आमच्या सर्वांचा
1 pm जीवनप्रवाह, सर्वांची साधना एकसंघ होवो. गुरु म्हणजे
कुणी उच्चस्थानी बसलेली व्यक्ती नव्हे किंवा शिष्य म्हणजे
2 केवळ गुरुंचे चरणामृत घेणारा भक्त नव्हे. प्रज्ञा हा
सद्गुण आम्हा उभयतांमध्ये असू दे. आणि त्यांचा
3 भविष्यकाळ उज्ज्वल आहे असे, शिष्य यशोशिखरावर
जाऊ देत. त्यांच्या तेजस्वी प्रज्ञेने त्यांना ज्ञानाची
4 परिसीमा गाठता येऊ दे.
गुरुंनी केलेली साधना, त्यांनी मिळवलेले ज्ञान,
5 त्यांनी केलेले प्रयोग, त्यातील यश-अपयश सुद्धा मोकळ्या
मनाने सांगण्यासाठी उत्तम शिष्य हवेत. पुढे वाटचालीत
6 गुरु शिष्य हे सहयात्री व्हावेत. त्यासाठी उपासना हवी.
त्यासाठी भगवंताची प्रार्थना केली आहे.
7 भगवंत एकटाच पूर्ण आहे, त्यामुळे जीवाने त्याची
प्रार्थना, आवाहन, जप आणि नामस्मरण करायला हवे.
अशा मार्गाने हृदयात प्रवेश केलेला भगवंत
जीवामध्ये प्रवेश करून त्याला दोषमुक्त करतो. शुद्ध
झालेल्या जीवामध्ये भगवंताचे प्रेम निर्माण होते. आणि
प्रेमाचे वैशिष्ट्यच असे आहे की मग जीव वेगळेपणाने
Birthday / Anniversary फार काळ राहू शकत नाही. मी म्हणजे मी नसून

भगवंतच आहे याचा अनुभव साधकाला येतो. या अवस्थेत आत्मज्ञान जागृत राहून प्रेमाची धार सतत चालू राहते. हेच अद्वैत भक्ती!

## - पञ्चम अनुवाक -

मागील अनुवाकामध्ये आचार्यांची ज्ञाननिष्ठा व शिष्यांना ब्रह्मापर्यंत नेण्याची तळमळ स्पष्ट केली आहे. शिक्षणाचे मुख्य तत्त्व Basic Principle हे आहे की ज्ञात गोष्टीकडून अज्ञात गोष्टीकडे नेणे.

ज्ञानसंपन्न गुरु व जिज्ञासु शिष्य यांची जोडी जमल्यावर ज्ञानदान व ग्रहण सुरु होते. उपनयन झालेले शिष्य गायत्रीचा पाठ सकाळ संध्याकाळ करतात. गायत्रीत सात व्याहृति (व्याहार - उच्चार) आहेत.

भूः भुवः सुवः (स्वः) महः जनः तपः सत्यम्।

हे सर्व विश्व हा ॐचाच विस्तार आहे. त्यापासून वर्ण, वर्णापासून शब्द, शब्दांच्या उच्चारानंतर त्या त्या वस्तु निर्माण झाल्या.

ध्वनिलहरींनी अणु एकत्र येतात. त्यातून निर्मिती होते. प्रथम उच्चार आणि नंतर निर्मिती किंवा आधी नाम मग रूप हा सृष्टीचा नियम आहे. प्रथम परब्रह्माला स्फुरण झाले त्यातून ध्वनितरंग निर्माण झाले. त्यातून विश्वोत्पत्ति झाली.

Let there be light & light was there.

प्रथम हे ब्रह्मांड निर्माण झाले. ते फुटून त्याचे तीन भाग झाले. खालचा भाग - भूः मधला भाग - भुवः आणि वरचा भाग सुवः।

असे सात भाग असले तरी हे तीन मुख्य आहेत. यांना महाव्याहृति म्हणतात.

ॐकार युक्त व्याहृतिने आरंभ करूनच गायत्रीमंत्राचा उच्चार केला जातो.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

भूर्भुवः सुवरिति वा एतास्तिस्रो व्याहृतयः। तासामु ह स्मैतां चतुर्थीं माहाचमस्यः प्रवेदयते। मह इति। तद् ब्रह्म। स आत्मा। अङ्गान्यन्या देवताः। भूरिति वा अयं लोकः। भुव इत्यन्तरिक्षम्। सुवरित्यसौ लोकः। मह इत्यादित्यः। आदित्येन वाव सर्वे लोका महीयन्ते॥

भूः भुवः स्वः अशा तीन प्रकारच्या व्याहृति आहेत. (नित्यकर्म, यज्ञप्रसंगी उच्चारले गूढ आणि पवित्र शब्द)

महाचमस ऋषींच्या मुळाने महः ही चौथी व्याहृति सांगितली. तेच ब्रह्म आणि तोच आत्मा। इतर देवता याची अंगे आहेत.

पहिल्या चार व्याहृतिमध्ये महः ही वरची म्हणून हिला ब्रह्म म्हटले आहे. मृत्युलोक - भूः, अंतरिक्ष - भुवः आणि स्वर्गलोक - स्वः या सर्वांना व्यापून राहणारा महः आहे. बाकी सर्व लोक याच्या अंतर्गत येतात.

म्हणजेच इंद्रियांनी दिसणाऱ्या जगताला व्यापून राहणारे एक सूक्ष्म जगत आहे. ते केवळ जाणिवमय आहे, आणि त्या जाणिवेमध्ये अधिकाधिक सूक्ष्म होत जाणारे थर आहेत. सामान्य उपनिषदामध्ये 'लोक' म्हटले आहे.

मृत्यूनंतर सामान्य मनुष्य भुवर्लोकात फिरत राहतो. त्यातील पुण्यवान मनुष्य एक पायरी पुढे जाऊन स्वर्गलोकात फिरत राहतो, आणि क्वचित एखाद्या ध्यानासिद्ध ऋषीला स्वर्गलोकाच्या पलीकडे असणाऱ्या जाणिवेच्या अति तरल आणि व्यापक थरांचा अनुभव येतो. महाचमस ऋषींच्या मुखाला असा महः चा अनुभव आला. हा शब्दही त्यानेच प्रथम वापरला. अत्यंत मोठा, विशाल, व्यापक व अनंत असा गूढ शब्द महः सूचित करतो.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

April 2010

| M | T | W | T | F | S | S |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | | |

8 am भूरिति वा अग्निः । भुवः इति वायुः । सुवरित्यादित्यः ।
महः इति चन्द्रमाः । चन्द्रमसा वाव सर्वाणि ज्योतींषी
9 महीयन्ते ।

10 भूः म्हणजे अग्नि, भुवः म्हणजे वायु आणि सुवः म्हणजे
आदित्य आणि महः म्हणजे चंद्रमा. चंद्राच्या योगाने
11 सर्व ज्योतिर्मय पदार्थांची वृद्धी होते.
भूः म्हणजे भूमीवरील अग्नीचे प्रतीक - त्याला भौम
12 तेज म्हणतात. हा नित्य परिचयाचा आहे.
भुवः म्हणजे वायु. अंतरिक्षात विचरण करणारा,
1 pm मेघ बनवणारा. ऑक्सिजन ज्यात आहे असा ।
सुवः म्हणजे आदित्य लोक.
2 महः म्हणजे चंद्रलोक.
उपनिषदात ज्योतीचा विचार केला आहे. परब्रह्माचे
3 तेज प्रथम विद्युतरूपाने प्रगट झाले. पण ते टिकणारे
नव्हते, त्यानंतर चंद्र निर्माण झाला - यातून औषधी
4 गुणधर्म मिळतात. अल्प प्रमाणात पुष्टि मिळते परंतु
निर्मितीसाठी ऊब हवी म्हणून मग प्रखर प्रकाशाचा सूर्य
5 निर्माण झाला. सूर्य पुष्टि व ऊर्जा देतो, त्यामुळे नंतर
सर्व निर्मिती सुरु झाली.
6 कठोपनिषदातील मंत्र -
न तत्र सूर्यो भाति न चन्द्रतारकं
7 नेमा विद्युतो भान्ति कुतोऽयमग्निः ।
या मंत्रातील चंद्र हा सूर्याच्या मागे राहून सूर्याला
तेज व प्रकाश पुरवतो. चंद्र हा मनाचा स्वामी आहे.
मनानेच उपासना करून परब्रह्मापर्यंत पोहोचायचे आहे.
खरोखर या चंद्रापासूनच सर्व ज्योती विकसित
झाल्या आहेत. सूर्य, अग्नी, वायु, भौम.
Birthday / Anniversary यांना चंद्रामुळेच महिमा मिळाला आहे.

© www.madhaveeraghuveer.com

अशा रीतीने या चार व्याहृति - चार पायऱ्या समजून त्यांची उपासना करायला हवी.

वेदांचे प्रतीक म्हणून व्याहृतिंची उपासना

भूः — ऋग्वेदातील ऋचा — भूमीचे प्रतीक
भुवः — सामवेदातील साम — अंतरिक्ष
सुवः — यजुर्वेदातील मंत्र — स्वर्ग
महः — अथर्ववेदातील मंत्र —
(ब्रह्मवेद)

यज्ञ

| होता | उद्गाता | अध्वर्यु | ब्रह्म |
|---|---|---|---|
| (ऋग्वेद) | (सामवेद) | (यजुर्वेद) | (अथर्ववेद) |
| प्रत्यक्ष हवन | मंत्रोच्चारण | यज्ञातील जाणकार | व्यवस्था ॐ उच्चार |

भूरिति वै प्राणः । भुव इति अपानः । सुवरिति व्यानः । (मुख्य प्राण) मह इत्यन्नम् । अन्नेन वाव सर्वे प्राणा महीयन्ते । ता वा एताश्चतस्रश्चतुर्धा । चतस्रश्चतस्रो व्याहृतयः । ता यो वेद । स वेद ब्रह्म । सर्वेऽस्मै देवा बलिमावहन्ति ।

याप्रमाणे या चार व्याहृतिंचे चार प्रकार आहेत. यांचे ज्याला ज्ञान होते, त्याला ब्रह्माचे ज्ञान होते. त्याला सर्व देव बळी आणतात.

भूः प्राण
भुवः अपान
सुवः व्यान
महः अन्न

या अन्नामुळेच प्राण टिकून राहतात. कार्य करण्यासाठी त्यांना शक्ती मिळते.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

ऊर्जा उत्सर्जन सांधे अन्नपचन स्वन,उचकी

• प्राण, अपान, व्यान, समान व उदान हे मुख्य पंचप्राण आहेत.

नाग – ढेकर देणे
कूर्म – डोळ्यांची उघडझाप
कृकल – शिंकणे
देवदत्त – जांभई
धनंजय – मरणोत्तर काही काळ राहणारा

या चार व्याहृति चार चार गोष्टींचे प्रतीक आहेत.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| भूः | भूलोक | अग्नी | ऋग्वेद | प्राण |
| भुवः | अंतरिक्ष | वायु | सामवेद | अपान |
| सुवः | स्वर्ग | आदित्य | यजुर्वेद | व्यान |
| महः | आदित्य | चंद्रमा | अथर्ववेद | अन्न. |

अशा या सोळा व्याहृतींना जो जाणतो तो हे विश्वरूप ब्रह्म जाणतो. अशा ज्ञानी पुरुषाला सर्व देव प्रेमाने बळी देतात. सर्वजण त्याला पुजतात. सर्व अर्पण करतात. त्यामुळे तो विश्वातील प्रत्येक गोष्ट जाणू शकतो. सर्व इंद्रिये आपापले ज्ञान त्याच्याकडे पोहोचवतात. इथे द्योतनात् देवः या अर्थाने इंद्रिय हा अर्थ घ्यावा.

जगात जे जे घडते ते ते याला बसल्या ठायीच कळते. अनुभवता येते. विश्व होऊनी विचरे विश्वामाजी / तो विश्व होतो.

☆ दृश्य वस्तूचे खोल खोल विश्लेषण करून त्यातील सार शोधून काढणे हे व्यावहारिक ज्ञानाचे लक्षण आहे. तर दृश्य वस्तूला धारण करणाऱ्या अव्यक्त सत्याचा साक्षात अनुभव घेणे हे अध्यात्मज्ञानाचे लक्षण आहे.

अतींद्रिय विश्वामध्ये अनिर्बंध संचार करणारी बुद्धी जे ज्ञान उत्पन्न करते त्यातून अखंड समाधानाची प्राप्ती होते. अनंताशी साक्षात ऐक्य होते. मनुष्याची दृष्टि निर्मळ बनते. तो स्वतः आनंदमय होतो व जगाला आनंदाकडे नेण्याचा प्रयत्न करतो.



© www.madhaveeraghuveer.com

३ ऑक्टोबर ९६

## – षष्ठ अनुवाक –

स य एषोऽन्तर्हृदये आकाशः। तस्मिन्नयं पुरुषो मनोमयः। अमृतो हिरण्मयः।

आचार्यांनी चारही व्याहृतींचे महत्त्व समजावून सांगितले. यांचा जप करून ध्यानावस्थेतही उत्तम प्रगती करता येते.

मात्र सगुणोपासनेच्याही पलीकडे जायला हवे. हे जे 'इदम्' म्हणून दिसणारे विश्व आहे, त्याच्या पलीकडे जो आहे, ज्याच्या प्रभावाने या सृष्टीची उत्पत्ती झाली, त्याला जाणणे हे अंतिम उद्दिष्ट आहे. त्याला जाणण्यासाठी आत उतरायला हवे, ध्यानधारणा हवी, गुरूंचे मार्गदर्शन हवे. त्यातून हृदयस्थ आत्मारामाचा साक्षात्कार होऊ शकतो.

ही परमशक्ती अंतर्हृदयातील आकाशात राहते. दोन जवनिकांमधील अतिसूक्ष्म पोकळीला दहराकाश म्हणतात. या दहराकाशात तो निर्गुण, निराकार, स्वयंप्रकाशी ऊर्जेचा स्रोत असतो. तो मनोमय आहे, अमृत आहे, हिरण्मय आहे. ध्यानधारणेने मन एकाग्र करून त्याला जाणता येते. तो तेजोमय आहे. सुवर्णाप्रमाणे प्रभा असल्यामुळे हिरण्मय म्हणतात.

किं ज्योतिस्तव ------

अन्तरेण तालुके। य एष स्तन इवावलम्बते। सेन्द्रयोनिः। यत्रासौ केशान्तो विवर्तते। व्यपोह्य शीर्षकपाले। भूरित्यग्नौ प्रतितिष्ठति। भुव इति वायौ। सुवरित्यादित्ये। मह इति ब्रह्मणि।

मुखातील टाळू व मस्तकातील टाळू यांच्यामध्ये स्तनाग्राप्रमाणे एक मांसखंड लोंबत असतो. तो भेदून सुषुम्ना नाडी वर जाते.

हे सर्व कुंडलिनीयोगाचे वर्णन आहे. मूलाधारापासून जागृत झालेली कुंडलिनी हृदयातून टाळूमधून वर ब्रह्मरंध्रापर्यंत जाते. तिथे जीवाशिवाची भेट होते.

सामान्य लोकांचा जीव हा नवद्वारातून बाहेर पडतो. परंतु योगी किंवा साक्षात्कारी संतांचा जीव या ब्रह्मरंध्रातून बाहेर पडतो यालाच नेदद्वार म्हणतात.

या मार्गाला ऋषी इंद्रयोनि म्हणतात.

इदं म्हणून जे जे दिसते ते निर्मिणारा तो इदंद्र - इंद्र त्याच्यापर्यंत पोहोचण्याचे हे द्वार म्हणून इंद्रयोनि!

हे स्थान केशांत स्थानी आहे. जिथून केस सर्व दिशांना आपोआप वळतात त्या शीर्षस्थानी हे स्थान आहे.

★ उपनिषदातील अनेक गूढ मंत्रांपैकी हा मंत्र आहे. योगमार्गाने जाणाऱ्या साधकांचा अनुभव यात स्पष्टपणे सांगितला आहे. ज्या वेळी योग्याला ध्यानावस्था चांगल्या रीतीने साधू लागते त्या वेळी त्याचे मन पूर्णपणे हालचाल बंद करते. मनाची हालचाल बंद झाली की मेंदूचा पुढील भाग काम करण्याचे थांबवतो तिथे मस्तकपिंड नावाच्या ग्रंथिमधून एक प्रकारचा स्राव घशात उतरू लागतो. यालाच अमृतवर्षाव असे म्हणतात. या अमृताच्या जोरावर योगी अनेक दिवस अन्नपाण्यावाचून राहू शकतात. त्यांची शरीरकांति आणि बुद्धी सतेज बनते.

वरील मंत्रात स्तनाग्राप्रमाणे लोंबणाऱ्या भागाचे वर्णन आले आहे ते पडजिभेचे वर्णन नाही. तर मेंदूतील मस्तकपिंड या ग्रंथीचे म्हणजे Pituitary Glands चे वर्णन आहे. मन काम करण्याचे थांबले की शरीरातील प्राणशक्ती मेंदूभोवती गोळा होते आणि देह सुटण्याच्या वेळी टाळूला बारीक भोक पडून ती बाहेर पडते. योग्याचा देह मागे उरतो. चैतन्य शक्ती मात्र स्वस्थानी जाते. चैतन्याला स्वतःचे घर दाखवणे म्हणजे मृत्यु!

अर्थात जे योगाने साधते ते भगवंताच्या प्रेमाने पण साधते. त्यासाठी नामस्मरण हेच साधन आहे.

Birthday / Anniversary

२५ ऑक्टो. २०१०

© www.madhaveeraghuveer.com

8 am आप्नोति स्वाराज्यम् । आप्नोति मनसस्पतिम् । वाक्पति
चक्षुष्पतिः । श्रोत्रपतिर्विज्ञानपतिः । एतत् (ततः) भवति ।
साधनेनंतर प्राप्ति.

अशा रीतीने ब्रह्मामध्ये प्रतिष्ठित झालेला असा तो
10 आत्मस्वरूप झाल्याने तो स्वतःचा राजा होतो. मनाचे
स्वामित्व मिळवतो. वाणी, डोळे, कान आणि बुध्दी या
11 सर्वांचा स्वामी होऊन तो ब्रह्मरूप होतो.
सातही स्वर्गांचा तो स्वामी होतो. प्रकृतिच्या
12 अधिपत्याखालून तो मुक्त होतो. प्रकृतिचा स्वामी बनतो.
तो स्वतःसिध्द होतो. स्वयंभू म्हणजे ज्याला कुणी बनवावे
1 pm लागत नाही, जन्म घ्यावा लागत नाही. तो असतोच.

तुकाराम महाराज म्हणतात -
2 तुका म्हणे आम्ही विठ्ठलाचे जाणिते ।
स्वयंभू आपते केले न कुणी ॥

3 त्याचे मन आता परब्रह्मात विलीन झाल्याने अमन झाले.
वाणीवर स्वामित्व मिळाल्याने तो बोलेल ते खरे होते.
4 तो कोणत्याही काळातील, कोणत्याही ठिकाणचे पाहू शकतो.
ऐकू शकतो. विज्ञान म्हणजे जाणीव । तो ज्ञानरूपच होतो.
5 त्याची जाणीव विश्वभर पसरलेली असते.
वरील मागील मंत्रामध्ये जी साधना सांगितली त्याचे फळ
6 या पुढील काही मंत्रात सांगितले आहे.

7 आकाशशरीरं ब्रह्म । सत्यात्म प्राणारामं मनआनन्दम् ।
शान्तिसमृद्धं अमृतम् । इति प्राचीनयोग्योपास्स्व ॥

आता तो संकुचित राहिला नाही, त्यामुळे तो
सीमित शरीरात मावत नाही. आकाश हेच त्याचे शरीर
होते. तो असीम होतो, परब्रह्माप्रमाणे निराकार, अरूप
Birthday / Anniversary सर्वव्यापी, सूक्ष्म असा होतो. तो जे बोलतो ते खरे होते.

© www.madhaveeraghuveer.com

| April 2010 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | | |

तो त्रिकालदर्शी, त्रिकालज्ञानी होतो, आकाशाप्रमाणे सर्वव्यापी होतो. त्याचा आत्मा सदावर्तमान होतो. त्याच्या ठिकाणी प्राणांना आराम मिळतो. विश्रांती मिळते आणि म्हणूनच संतांच्या सहवासात आनंद वाटतो. शांति मिळते. चित्तातील खळबळ शांत होते निवांत वाटते. तो अमृत होऊन जातो.

आकाशाप्रमाणे तो प्रतिकारहीन होतो. जे जे वाट्याला येते ते तो सहजतेने स्वीकारतो. इंद्रियांचा क्षोभ होत नाही ∴ तो आनंदस्वरूप होतो.

यदृच्छालाभसंतुष्टो -------

ज्याच्या मनात आशा असते तो भिकारी
जो निरिच्छ आहे तो सम्राटच असतो.

भर्तृहरी - राजा - योगी | मंदिराच्या दारात - भिकारी / धनिक
अखेरीला प्राचीनयोग्य असे संबोधन आहे.

हे कदाचित शिष्याचे नाव असेल किंवा प्राचीन/सनातन ब्रह्म जाणण्यासाठी तू योग्य आहेस अशी दाद Compliment दिली असेल. जो कोणत्याही गोष्टीचा ध्यास घेतो त्याचे लक्ष इकडे तिकडे जात नाही. सर्व शक्ती तो प्राप्तव्यावर केंद्रित करतो.

• मागे अभ्यासलेल्या चार व्याहृतींचा संबंध इथे जोडू या.
भूः - अग्नी, भुवः वायु, स्वः आदित्य, महः हिरण्यगर्भ.
१ अग्निपासून झालेली वाणी जिभेवर राहते.
२ वायु नासिकेतून ये-जा करतो.
३ डोळ्यातील तेज हे आदित्याचे तेज आहे.
४. आणि महः हा शीर्षस्थानी राहणारा ब्रह्म आहे.

वाणीने ॐकाराचा जप करायचा. श्वासावर नियंत्रण ठेवायचे, नेत्रज्योति आतमध्ये वळवायची. व ब्रह्मरंध्रापर्यंत पोहोचायचे. तिथे चंद्राचे तळे आहे. अमृताने भरले आहे. ते उघडे होताच अमृताचा वर्षाव होतो. प्रत्येक कण ऊर्जायुक्त होतो. जीवाशिवाची भेट होते. सर्वत्र आनंद भरून राहतो.

Birthday / Anniversary

©www.madhaveeraghuveer.com

— सप्तम अनुवाक —

8 am
पृथिवी अन्तरिक्षं द्यौः दिशः अवान्तरदिशाः। अग्निः वायुः आदित्यः चन्द्रमाः नक्षत्राणि। आपः ओषधयः वनस्पतयः आकाशः आत्मा। इति अधिभूतम्।
9
अथ अध्यात्मम्। प्राणः व्यानः अपानः उदानः समानः।
10
चक्षुः श्रोत्रं मनः वाक् त्वक्। चर्म मांसं स्नावा अस्थि मज्जा। एतद् अधिविधाय ऋषिः अवोचत्।
11
पांक्तं वा इदं सर्वम्। पाङ्क्तेन एव पाङ्क्तम् स्पृणोति इति।

12

पृथ्वी, अंतरिक्ष, द्यौ, दिशा आणि अवान्तर दिशा।
1 pm
अग्नि, आदित्य, वायु, चंद्र, नक्षत्रे। उदक, ओषधी, वनस्पती, आकाश आणि आत्मा हे अधिभूतस्वरूप आहे.

2
अध्यात्मस्वरूप – प्राण, व्यान, अपान, उदान व समान
डोळे, कान, मन, वाणी व त्वचा
3
चर्म, मांस, स्नायु, अस्थि व मज्जा.

हे सर्व पंचविध आहे. आणि पंचविधरूपाने मनुष्याला
4
त्याचे ज्ञान होते.

या विश्वात सर्व गोष्टी एकमेकांशी जोडलेल्या आहेत. त्याचा समग्र विचार व्हायला पाहिजे. एका विराट पुरुषाचे ते सर्व अवयव आहेत. परस्परसंबंधित आहेत.

समष्टि Family Doctor — Specialist

जे एकमेकांशी संबंधित, जोडलेले असतात ते पांक्त।

अधिभूत पांक्त
- लोक - पृथ्वी, अंतरिक्ष, स्वर्ग, दिशा व अवांतर दिशा।
- मिती - लांबी, रुंदी, उंची, दिक्, काल।
- ज्योती - अग्नी, आदित्य, वायु, चंद्रमा, नक्षत्रे
- निर्मिती, पुष्टि - आप, ओषधी, वनस्पती, आकाश, आत्मा

हा समष्टीचा विचार झाला. व्यष्टीमध्येही असेच गट

कार्यरत आहेत. त्यांना आध्यात्मिक पांक्त म्हटले आहे.

© www.madhuveei.com

12 MON APR 2010 Priority

Wk 15, 102-263

| April 2010 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | | |

व्यष्टि

8 am १. वायु - प्राण, अपान व्यान, समान, उदान
नाग, कूर्म, कृकल, देवदत्त, धनंजय

9 २. ज्ञानेंद्रिय - चक्षु, श्रोत्र, मन, वाणी, त्वचा
3. धातु - चर्म, मांस, स्नावा, अस्थि, मज्जा.

10

अधिभौतिक गटाने आध्यात्मिक गट पुष्ट करता येतो.
11 आध्यात्मिक गटाने अधिभौतिकाला प्रसन्न करता येते.
दोन्हींची सांगड घालून ब्रह्मांडाचे ज्ञान होते.
12 परस्परं भावयन्तः श्रेयः परमवाप्स्यथ।
अशा रीतीने परस्परांशी संबंध असणाऱ्या या
1 pm सर्व समूहांचा अभ्यास म्हणजे ब्रह्मांडाचा अभ्यास!
बाह्य व आंतरिक(शारीर) गोष्टींचा अभ्यास
2 पिंड व ब्रह्मांडातील साम्य समजावून घ्यायचे आणि
त्यातील परस्परावलंबित्व जाणून घेऊन सर्वांचा
3 सकल्याने अभ्यास करायचा. विश्वप्रार्थना करायची.
अंतःकरण विशाल होत गेले की सगुणातून निर्गुणाकडे
4 सहज झेप घेता येते.
सर्वभूतस्थमात्मानं सर्वभूतानि चात्मनि----
5 सर्व
सर्व साध्यासाठी साधन आहे ॐकार साधना।।

6

7

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

| May 2010 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| 31 | | | | | 1 | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

Priority

TUE APR 13 2010

Wk 15, 103-262

## - अष्टम अनुवाक -

8 am ओमिति ब्रह्म । ओमिति इदं सर्वम् । ओमित्येतदनुकृतिर्ह स्म वा अप्योश्रावयेत्याश्रावयन्ति । ओमिति सामानि गायन्ति । ओम् शोमिति शस्त्राणि शंसन्ति । ओमित्यध्वर्युः प्रतिगरं प्रतिगृणाति । ओमिति ब्रह्मा प्रसौति । ओमिति अग्निहोत्रम् अनुजानाति । ओमिति ब्राह्मणः प्रवक्ष्यन्नाह ब्रह्मोपाप्नवानीति । ब्रह्मैवोपाप्नोति ।

11

आता ब्रह्मांडाला भेदून पल्याड जायचे आहे. ते ॐ कार उपासनेने शक्य होते.

12

एकोऽहं बहुस्याम् हा प्रथम संकल्प उठला तेव्हा ध्वनितरंग निर्माण झाले. त्याचा नाद म्हणजे ॐकार! ऋषींनी त्या बीजतत्त्वाला ॐ हे नाव दिले.

1 pm

ॐ हे नाम आहे नित्य नामी सुद्धा आहे. ते स्वतः ब्रह्म ही आहे व ब्रह्माचे नाव ही आहे आणि म्हणूनच ॐकार ~~[illegible]~~ उपासना ब्रह्मापर्यंत घेऊन जाते.

2

3

माण्डूक्य उपनिषदात याचे सविस्तर वर्णन आहे. ओंकारात साडेतीन मात्रा आहेत. अ उ म या तीन मात्रा जागृती - स्वप्न - सुषुप्ति चे प्रतीक मानून साधकाकडे नेणारी ही उपासना आहे.

4

5

त्यासाठी आचार्य शिष्यांना परिचित असलेला यज्ञविधि, अग्निहोत्राचा दृष्टांत देत आहेत.

6

खरोखर ॐ म्हणजे साधक, साधन व साध्य सर्वच ब्रह्म आहे. इथे त्रिपुटी मावळते.

7

या ॐ चे व्यक्त रूप म्हणजे हे दृश्य विश्व! इदम् म्हणून जे जे दाखवता येते ते ते सर्व म्हणजे ॐ आहे, ब्रह्म आहे. प्रथम ध्वनि झाला व नंतर निर्मिती झाली. आधी नाम व नंतर रूप हा या विश्वाचा नियमच आहे.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

पूर्वी रोजच्या व्यवहारात देखील ॐ चा उच्चार वेळोवेळी केला जात असे. विशेषतः संमति देताना तर आवर्जून ॐ उच्चार करत असत. त्यातसुध्दा यज्ञविधितील चार ऋत्विजांपैकी ब्रह्मा याला तर ॐ शिवाय दुसरे काही उच्चारण्याची अनुमति नसे. केवळ ॐ नेच प्रश्न व ॐ नेच उत्तर देत असे. यज्ञातील होता, उद्गाता, अध्वर्यू व ब्रह्मा हे देखील यज्ञकार्यात ॐ चा उच्चार करत असत.

उपदेश, मंत्र इ० सांगण्यापूर्वी ओ श्रावय म्हणून नंतर ऐकवले जात असे.

सामान्य गायन करताना सुरुवातीला ॐ चा उच्चार. गेय नसलेले मंत्र म्हणजे शस्त्र. त्याचे पठण ओम शोम म्हणून केले जाई.

Imp

## – शीक्षा वल्ली –

### – नवम अनुवाक –

ऋतं च स्वाध्यायप्रवचने च। सत्यं च स्वाध्यायप्रवचने च। तपश्च स्वाध्यायप्रवचने च। दमश्च स्वाध्यायप्रवचने च। शमश्च स्वाध्यायप्रवचने च। अग्नयश्च स्वाध्यायप्रवचने च। अग्निहोत्रं च स्वाध्यायप्रवचने च। प्रजा च स्वाध्यायप्रवचने च। प्रजनश्च स्वाध्यायप्रवचने च। प्रजातिश्च स्वाध्यायप्रवचने च। सत्यमिति सत्यवचा राथीतरः। तपो इति तपोनित्यः पौरुशिष्टिः। स्वाध्यायप्रवचने एवेति नाको मौद्गल्यः। तद्धि तपस्तद्धि तपः।
॥२९॥

अर्थ – (स्वाध्याय – अध्ययन, प्रवचन – अध्यापन)
योग्य भाषण, सत्य, तप, दम, शम, अग्न्याधान, अग्निहोत्र, आतिथ्य, लौकिक व्यवहार, प्रजोत्पत्ती, ऋतुकाली गमन, पौत्रोत्पत्ती या सर्वांचे अनुष्ठान केले पाहिजे.
असे रथीतर ऋषींचा मुलगा सत्यवचा सांगतो. तपाचे अनुष्ठान केले पाहिजे असे पुरुशिष्ट ऋषींचा तपोनित्य नावाचा मुलगा सांगतो. स्वाध्याय व प्रवचन यांचेच अनुष्ठान केले पाहिजे कारण तेच तप होय. असे मुद्गल ऋषींचा नाक नावाचा मुलगा सांगतो.

नुसता आत्मज्ञानी पुरुष सामान्य प्रापंचिक लोकांना उपयोगी पडत नाही. त्याला व्यवहारी लोकांशी कसे वागावे, वासनेत लडबडलेल्या प्रापंचिकांना आत्मज्ञानाकडे कसे वळवावे, याचे शास्त्र अवगत असावे लागते, तरच तो लोकसंग्रह करू शकतो. आणि समाजामध्ये ज्ञानाची ज्योत तेवत ठेवू शकतो. म्हणून साधनकालामध्ये साधकाने प्रपंचातील कर्तव्ये यथासांग पार पाडावीत. प्रपंचातील टक्के टोणपे खात खातच परमार्थ उमगू लागतो. लोकव्यवहार सत्य व अनृत मिळून चालतो. विश्वाचे चक्र सुरळीतपणे चालू राहण्यासाठी जे आवश्यक ते सर्व करावे.



© www.madhuveeraghuveer.com

Priority
IMP



समाजाची, विश्वाची बांधिलकी जपायलाच हवी. आपण समाजाचे, निसर्गाचे, पशुपक्ष्यांचे देणे लागतो. या सर्वांचा साकल्याने विचार हवा. — नागपंचमी, बैलपोळा आहे तसेच दररोज काकबळी, गोग्रास, वैश्वदेव, माधुकरी आहे. निसर्गाचा परिचय - वटपौर्णिमा, पत्री, दूर्वा

ब्राह्मणाच्या ६ कर्तव्यांमध्ये दररोज अध्ययन-अध्यापन सांगितलेच आहे. शिवाय ब्रह्मयज्ञाचे आचरण. "Teaching is the best way of learning!"

बुद्धीवर कधीही गंज चढू द्यायचा नाही. वापरली नाही तर ती गंजून जाते. नवीन भाषा, विद्या, शास्त्र, स्तोत्र, कला, तंत्रज्ञान शिकून घ्यावे. त्यात पारंगत झाल्यावर इतरांना शिकवावे. मात्र आपले मांडे भरल्याशिवाय शिकवू नये. दासबोधातील आदर्श दिनचर्या!

शिकवण्यासाठी मनुष्य आणखी खोलात जाऊन अभ्यास करतो. त्यातील संकल्पना, बारकावे, दृष्टांत समजून घेतो. आणि त्याचबरोबर इतर संत महात्मे विद्वान यांचे विचार जाणून घ्यावेत. नवीन काय मिळते ते पहावे.

थोडक्यात माणूस म्हणून जिवंत राहण्यासाठी स्वाध्याय प्रवचन हवेच. आपले संभ्रम दूर करावेत.

ऋत - Universal Truth त्रिकालाबाधित सत्य.

सत्य - सत्यासारखे स्थिर व शांत काही नाही सत्यवचनी माणसाला सदाचरणाचेच पाठबळ लाभते.

तप - म्हणजे एखाद्या गोष्टीचा ध्यास घेणे. मागोवा.

दमन - इंद्रियांवर नियंत्रण. इंद्रियांना त्यांचा आहार द्यायचा पण सीमित! स्वैर सोडायचे नाही. कठोपनिषदात इंद्रियांना घोड्याची उपमा दिली आहे.

इंद्रियांना वळण लावण्यासाठी व्रत सांगितली आहेत. निराहार, एकभुक्त, एकवाढ, त्रिकाल स्नान, जप-स्तोत्र, मौन

Birthday / Anniversary

शम - मनावरील नियंत्रण. अलिप्तता हवी.

© www.madhaveeraghuveer.com

अग्निचे चयन, अग्निहोत्र - गार्हपत्य, दाक्षिणाग्नि, आहवनीय.

गृहपती अग्न्याधान करतो. हा अग्नि समृद्धी, कल्याण, सौख्य, स्वास्थ्य, उत्तम संतति मिळवून देतो.

दक्षिणाग्नि - दक्षिण दिशा ही यमाची दिशा. या दिशेला गेलेल्या म्हणजे मृत पितरांसाठी हा अग्नि आहे. दर्शपूर्णमास यज्ञामध्ये 'अन्वाहार्य चरु' लागतो तो या अग्निवर शिजवतात. म्हणून याला 'अन्वाहार्यपचन' असेही म्हणतात - पितृकार्यासाठी.

आहवनीय अग्नी देवकार्यासाठी आवश्यक आहे. यात दिलेल्या आहुति तो देवतांपर्यंत पोहोचवतो. चौकोनी कुंड असते.

अग्निशाळा स्वच्छ ठेवणे हे अग्निहोत्र. ही तेजाची उपासना आहे.

आतिथ्य: - अतिथि हा देवासमान आहे. गृहस्थाने दररोज अधिक अन्न शिजवावे. आपल्या भोजनापूर्वी कुणी अतिथी गावात आला आहे का हे पहावे. वस्त्र, स्नान, बिछाना, भोजन या सर्वांची सोय करावी.

मात्र या सर्वांबरोबरच स्वाध्याय प्रवचन विसरू नये. गृहस्थाला अनेक व्यवधाने असतात. परंतु त्यात अडकून न राहता, सर्व कर्तव्यकर्मे करून देखील स्वाध्याय प्रवचनासाठी वेळ काढायचाच.

संतति उत्पन्न करून वंशसातत्य राखायचे ही एक प्रकारे सामाजिक जबाबदारी आहे. नातेवाईक, हितचिंतक, गाईगुरे सर्वांना सांभाळण्याचे भान ठेवायचे हे सर्व महत्त्वाचे आहे. (प्रजाति) मात्र नातवाचा जन्म झाला की हळूहळू या जबाबदारीतून बाहेर पडायचे आता कुटुंबवृद्धीची जबाबदारी संपली परंतु म्हणून स्वाध्याय प्रवचनाला चुकायचे नाही.

रथीतर पुत्र सत्यवचा —— सत्य सर्वश्रेष्ठ आहे पालन करावे

पुरुशिष्टाचे - तपोनित्य - तपामुळे आत्मिक शक्ती वाढते. दृढता

मुद्गलपुत्र नाक - स्वाध्याय प्रवचनाने धर्म कळतो. आत्मशक्ति मिळते.

Birthday / Anniversary

27 Oct. 2017

— दशम अनुवाक —

अहं वृक्षस्य रेरिवा। कीर्तिः पृष्ठं गिरेरिव। ऊर्ध्वपवित्रो वाजिनीव स्वमृतमस्मि। द्रविणं सवर्चसम्। सुमेधा अमृतोक्षितः इति त्रिशङ्कोर्वेदानुवचनम्।

ज्याने ॐकाराची उपासना केली, स्वाध्याय-प्रवचनाचा विसर पडू दिला नाही त्याला ब्रह्मप्राप्ति होते. अशीच ब्रह्मप्राप्ति त्रिशंकू ऋषींना झाली. त्यांनी आपले अनुभवकथन केले आहे. त्यांनी जे जाणले/अनुभवले ते वेद। आणि म्हणून हे वचन वेदसंमत आहे.

या संसारवृक्षाला प्रेरणा/गति देणारा मीच आहे माझ्यापासूनच हे विश्व निर्माण झाले व माझ्यातच ते विलीन होते. मीच परब्रह्म आहे — अहं ब्रह्मास्मि अशी अनुभूति त्यांना आली.

माझी कीर्ति अत्यंत उत्तुंग पर्वतशिखराप्रमाणे आहे. सर्वात श्रेष्ठ व पवित्र असे ब्रह्म मी आहे.

सूर्याच्या ठिकाणी जे प्रकाशरूप आत्मस्वरूप आहे तसेच माझ्या ठिकाणी आहे. सूर्य अन्न उत्पन्न करतो सूर्याच्या उष्णतेने व ऊर्जेने धान्य, वनस्पती उगवतात. त्यात अमृत भरलेले असते. किरणांद्वारा ही शक्ती सर्वांना दिली जाते. त्या अमृतमय शक्तीप्रमाणे मीसुद्धा श्रेष्ठ, पवित्र आहे.

वर्चस म्हणजे ब्रह्मतेज! शरीराच्या कांतिला तेज तर वाणीच्या प्रभावाला ओज म्हणतात. परंतु आध्यात्मिक प्रगतीमुळे सर्वांगातून वर्चस प्रगटते. अशा या ब्रह्मतेजाचा साठा माझ्याकडे आहे. हिऱ्याप्रमाणे सतत तेज फेकणारा असा मी आहे. मी मेधा म्हणजे सूक्ष्म बुद्धी, कुशाग्र बुद्धी असणारा आहे.

अमृतोक्षितः ——— अमृतः अक्षितः अजर अमर क्षयरहित, चिरंतन, अविनाशी असा एक अर्थ आहे.



© www.madhaveeraghuveer.com

आणि दुसरा अर्थ म्हणजे अमृतेन उक्षित: (सिंचित:) मी अमृताच्या वर्षावाने (अभिषेकाने) चिंब भिजलेला आहे.

हे उद्गार अहंकाराचे/गर्वाचे नाहीत. इथे ऋषी स्वत: परब्रह्माशी एकरूप झालेले आहेत. 'थेंबुटा सागरी बुडाला' ही अवस्था झाल्यानंतर थेंबाला वेगळेपणाने अस्तित्व उरत नाही. सागराचे सर्व गुणधर्म त्याला लागू होतात. परब्रह्माशी एकरूप झाल्याने जे आनंदोद्गार आपोआप बाहेर पडतात त्याचे हे व्यक्त स्वरूप आहे.

ब्रह्मविद् ब्रह्म एव भवति।

तुकाराम महाराजांनी ही अनुभूति घेतली तेव्हा ते म्हणाले - आम्ही वैकुंठवासी। आलो याच कामासी। आम्ही विधीचे (ब्रह्मदेवाचे) जाणिते।

ज्ञानेश्वर माऊलींनी त्या परब्रह्माचे वर्णन करताना 'स्फटिकामधील दिव्य ज्योती' म्हटले आहे.

आपल्यालाही तिथे पोहोचायचे आहे. ते चित्र सतत डोळ्यांपुढे ठेवून सतत ध्यास घेतला तर अशक्य काहीच नाही. त्रिशंकू ऋषींनी हा अनुभव घेतला.

माणसाच्या अंत:करणात विलसणारे आत्मतत्त्व या ना त्या रूपाने स्वत:च्या अस्तित्वाची जाणीव करून देत असते. देहबुद्धीला सर्वस्व मानणारा माणूस भौतिक वस्तूंच्या मागे लागतो. त्या मिळवण्यासाठी धडपडत असतो. या श्रीमंतीच्या हव्यास, वासनातृप्तीच्या प्रेरणा यांच्या मुळाशी सुद्धा अंतरंगातील आत्म्याची चेतनाच असते. ती विकृत होऊन बाहेर पडत इतकेच!

परंतु अंत:करण स्वच्छ होऊन आत्म्याची प्रेरणा जशीच्या तशीच मनामध्ये प्रतिबिंबित झाली म्हणजे स्वत:चे परमात्मस्वरूपाशी असलेले तादात्म्य अनुभवास येते. तोच हा अनुभव त्रिशंकू ऋषींनी मांडला आहे.

© www.madhaveeraghuveer.com

Priority — 31 Oct. 2017

Imp

| April 2010 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | | |

## - एकादश अनुवाक -

8 am वेदमनूच्याचार्योऽन्तेवासिनमनुशास्ति। सत्यं वद।
धर्मं चर। स्वाध्यायान् मा प्रमदः। आचार्याय प्रियं
9 धनमाहृत्य प्रजातन्तुं मा व्यवच्छेत्सीः। सत्यान्न
प्रमदितव्यम्। धर्मान्न प्रमदितव्यम्। धर्मान्न प्रमदितव्यम्।
10 कुशलान्न प्रमदितव्यम्। भूत्यै न प्रमदितव्यम्।
स्वाध्याय-प्रवचनाभ्यां न प्रमदितव्यम्। देवपितृ-कार्याभ्यां
11 न प्रमदितव्यम्।

Average

12 वेदांचे अध्ययन संपल्यावर (अनूच्य - बोलून झाल्यावर) आचार्य शिष्याला उपदेश करतात. ही समावर्तनाची 1 pm Convocation वेळ आहे. सम + आ + वृत (वर्त) म्हणजे शब्दशः परत येणे. गुरुगृही शिकलेला छात्र आता पुन्हा 2 आपल्या घरी निघतो तेव्हा गुरुजी उपदेश करतात. प्रत्येक छात्राची क्षमता भिन्न असते. तेव्हा आचार्य 3 ठरवतात की प्रत्येकासाठी किती कालावधि पुरेसा आहे ते।

उपनयनानंतर वेदाचे षडंगासहित अध्ययन करायचे 4 असते. प्रथम संथा व नंतर अनुवचन (अर्थग्रहण)

हे सर्व पूर्ण झाल्यानंतर आचार्य शिष्यांसमोर 5 समारोपाचे अभिभाषण करतात.

खरे बोल. धर्माने वाग. रोज अभ्यास कर. गुरुंना 6 दक्षिणा दे. मुलंबाळे होऊ दे. सत्याची हेळसांड करू नको. अधर्माने वागू नको. आपले अहित करू नकोस. समृद्धीची 7 हेळसांड करू नकोस. अध्ययन - अध्यापन सोडू नकोस.

सत्याने चालणे सर्वथैव श्रेयस्करच असते. ज्याच्या हृदयात सत्य आहे, त्याच्या हृदयात परमेश्वर असतो.

जाँके हिरदे साँच है, ताके हिरदे आप —— कबीर.

धर्म - त्याप्रमाणे वर्णाश्रमाचे इमानेइतबारे, निष्काम भावनेने पालन करणारा भगवंताला प्रिय होतो. — सज्जन कसाई

स्वाध्याय - गुरुकुलात जे शिकले त्याची उजळणी करावी.

Birthday / Anniversary

©www.madhaveeraghuveer.com

नवीन ग्रंथ अभ्यासावेत ~~[illegible]~~ श्रेष्ठांचे विचार जाणून घ्यावेत त्याने बुध्दी तेजलदार राहते. ध्येयाचा विसर पडत नाही.

गुरुदक्षिणा - आचार्यांना प्रिय असेल ती दक्षिणा यथाशक्ती द्यावी. नुसते धनच नव्हे तर वस्तुरूपाने, सेवारूपाने द्यावे.

गृहस्थाश्रम - सुशील, सद्गुणी कन्या पाहून विवाह करावा उत्तम आचरण असावे. गृहस्थाश्रमावर इतर तीन आश्रम अवलंबून असतात. त्यांना आश्रय, आधार द्यावा. सर्वांची काळजी घ्यावी. कुटुंबातील वृद्ध व्यक्ती, लहान मुले, रुग्ण, गर्भवती स्त्रिया, अतिथि अभ्यागत या सर्वांना तृप्त करून मगच भोजन करावे. इतकेच नाही तर गाईगुरे, नोकर चाकर यांची संपूर्ण जबाबदारी घ्यावी. वैश्वदेव, काकबळी, गोग्रास, माधुकरी यांच्या माध्यमातून समाजऋण, देवऋण फेडावे. अतिथि घरी येणे हे भाग्याचे लक्षण मानले जाई.

वंशसातत्य - प्रजातंतु तुटू देऊ नकोस. वंशाचे सातत्य टिकवले तरच पितृऋणातून मुक्त होता येते. पुष्कळ मुले असणे हे संपन्नतेचे लक्षण मानले जाई. हे सीमित अर्थाने खरे आहे परंतु मानवजात जिवंत राहण्यासाठी सुद्धा ते आवश्यक आहे.

कुशल

कुशल - म्हणजे चांगले, योग्य. शरीराची आबाळ करू नकोस. गैर वर्तन करू नकोस

भूति - म्हणजे वैभव. धनधान्य, दुधदुभते, पशुधन, वातावरणातील मांगल्य, पावित्र्य, शुद्धता, भक्ती, संतोष, विद्या, निष्ठा, शांति ही सारी वैभवाचीच रूपे आहेत. अशा वैभवाचा कृतज्ञतापूर्वक स्वीकार करायचा. ते मिळवण्यात कुठेही टाळाटाळ नको किंवा मिळाल्यानंतर त्याची उपेक्षा नको. जे मिळाले आहे ते सर्वांना वाटून मग त्याचा (उरलेला) भोग घ्यायचा. गावातील प्रतिष्ठित लोकांचा त्यामुळेच गावाला आधार वाटायचा. दुष्काळात घरच्या कणग्यातील धान्य, विहिरीतील पाणी लोकांसाठी खुले केले जात असे.

स्वाध्याय-प्रवचनांमुळे सत्याचा, धर्माचा मार्ग टिकून राहतो. जीवन दिशाहीन होत नाही. देव - शक्तिकेंद्र आहेत. त्यांना प्रसन्न केले तर ते आम्हाला भरभरून देतात. भूमिची दोन हातांनी सेवा केली तर ती हजार हातांनी भरभरून देते. ज्या देशात आपण जन्मलो त्याची आठवण कृतज्ञतापूर्वक ठेवायला हवी. अमर्दा नोकरचाकरांचा मान राखायला हवा. हेच पितृकार्य आहे.

मातृदेवो भव। पितृदेवो भव। आचार्यदेवो भव। अतिथिदेवो भव। यानि अनवद्यानि कर्माणि तानि सेवितव्यानि। नो इतराणि। यानि अस्माकं सुचरितानि तानि त्वया उपास्यानि। नो इतराणि। ये के च अस्मात् श्रेयांसो ब्राह्मणाः तेषां त्वया आसनेन प्रश्वसितव्यम्। श्रद्धया देयम्। अश्रद्धया अदेयम्। श्रिया देयम्। ह्रिया देयम्। भिया देयम्। संविदा देयम्।

माता, पिता, गुरु आणि अतिथि यांना देवाप्रमाणे पूज्य मान. या जगातील निंद्य ते सर्व सोडून द्यावे. आणि जे जे वंद्य आहे ते सर्व भावपूर्वक करावे. आमच्या चांगल्या वागण्याचेच तू आचरण कर. इतर गोष्टींचे नाही.

जे ब्राह्मण (ज्ञानी पुरुष) आमच्यापेक्षा श्रेष्ठ असतील त्यांचा योग्य सन्मान कर. त्यांना जे काही द्यायचे असेल ते श्रद्धेने द्यावे, अश्रद्धेने नाही. पुष्कळ दे. आदराने दे. नम्रतेने दे, समजून दे.

आपल्या धर्मात आईचे स्थान अनन्यसाधारण आहे.

नास्ति मातृसमो गुरुः —— महाभारत - शांतिपर्व

जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी - रामायण

तस्यां शुश्रूषा नित्या पतितायामपि। आपस्तम्बसूत्र

Birthday / Anniversary

ऐ मां तेरी सूरतसे अलग भगवानकी सूरत क्या होगी?

कुपुत्रो जायेत क्वचिदपि कुमाता न भवति।

© www.madhaveeraghuveer.com

संतति हे पित्याचे प्रतिरूप असते. पित्याचे गुण पुत्रावर असते. ज्या आचार्यांनी ज्ञान दिले त्यांच्याबद्दल कृतज्ञता मनात ठेव त्यांची सेवा कर आणि अतिथिसत्कार केल्याखेरीज गृहस्थाची कर्तव्ये पूर्ण होत नाहीत. पंक्तीला अतिथि नसणे हे खऱ्या गृहस्थाला कमीपणाचे वाटते.

नेहमीच विधि-निषेध पाळावेत. Do's & Don'ts आमच्यामध्ये कितीतरी बऱ्या-वाईट गोष्टी आहेत. त्यातील चांगल्या तेवढ्याच घ्याव्यात आणि वाईट सोडून द्याव्यात. आणि आमच्यापेक्षा अधिक श्रेष्ठ, ज्ञानी कुणी भेटले तर त्यांचा यथोचित मानसन्मान करावा.

समाजाची सर्व जबाबदारी गृहस्थाश्रमावर असते. दान ते देण्याचे सामर्थ्य परमेश्वर देतो. मात्र दान हे नेहमीच श्रद्धेने, आदराने, कर्तव्यभावनेने द्यावे. उपकाराची भावना नको उलट दान घेऊन अतिथिच उपकार करत असतो. म्हणून क्षमतेहून कमी देऊ नको. जास्त ही देऊ नको. ज्याला ज्याची गरज असेल त्याला ते द्यावे. नको ते देऊन त्याचा त्रास वाढवू नको. अधिक देऊन त्याला आळशी बनवू नको.

दातव्यमिति यद्दानं -------

अथ यदि ते कर्मविचिकित्सा वा वृत्तविचिकित्सा वा स्यात् ये तत्र ब्राह्मणाः सम्मर्शिनः युक्ताः अयुक्ताः ~~क~~ अलूक्षाः धर्मकामाः स्युः यथा ते ~~तेषु वर्तेरन् तथा तेषु वर्तेथाः। अथ अभ्याख्यातेषु ये तत्र ब्राह्मणाः~~ तेषु वर्तेरन् तथा तेषु वर्तेथाः। एष आदेशः। एष उपदेशः। एषा वेदोपनिषद्। एतद् अनुशासनम्। एवम् उपासितव्यम्। एवम् उ च एतद् उपास्यम्।

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

आपल्या कर्माबद्दल किंवा वर्तनाबद्दल जर तुला शंका आली तर जे ज्ञानी पुरुष विचारशील आचारशील, भक्तिमान, क्रूरबुद्धिरहित आणि धार्मिक असतील त्यांचे अनुकरण करावे.

गुरुगृही शिक्षण घेत असताना, किंवा त्यापूर्वी मातापित्याच्या प्रेमळ छत्राखाली वावरत असताना फारसे प्रश्न पडत नाहीत परंतु आता उघड्या जगात वावरताना अनेक प्रश्न पडतात. हे करू की नको? या प्रसंगी वागावे कसे? या जगात चांगली वाईट दोन्ही प्रकारची माणसे भेटतात. त्यांच्याशी व्यवहार करावा लागतो. तेव्हा नेमका निर्णय कसा घ्यावा? त्याचे परिणाम काय होतील?

अशा शंका येतील तेव्हा त्यांचे निरसन करण्यासाठी आचार्य जवळ नसतील तेव्हा त्या गावात जे प्रतिष्ठित, पतदार, जाणकार लोक असतील. जे रुक्ष नसतील, धर्माने वागणारे असतील, माणुसकी जपणारे असतील असे लोक सामान्यपणे कसे वागतात ते बघावे व त्यानुसार आपले आचरण ठेवावे. असे वागल्याने माणूस एकटा पडत नाही. चारचौघांसारखे वागल्याने निरर्थक काही प्रश्न निर्माण होत नाहीत.

विकट वाट वहिवाट नसावी
धोपटमार्गा सोडू नको।
संसारामधि ऐस आपुला
उगाच भटकत फिरू नको।।

✍ हा शास्त्रांचा आदेश आहे आणि माझाही हाच उपदेश आहे. हेच वेदातील रहस्य आहे. आपल्याला तत्त्व समजत नसेल तर समाजातील महानुभाव ज्या मार्गाने जातात तसे जावे. — महाजनो येन गतः स पन्थाः।

- द्वादश अनुवाक Imp

8 am शं नो मित्रः शं वरुणः । शं नो भवतु अर्यमा ।
शं न इन्द्रो बृहस्पतिः । शं नो विष्णुः उरुक्रमः ।
9 नमो ब्रह्मणे । नमस्ते वायो । त्वमेव प्रत्यक्षं ब्रह्मासि ।
त्वाम् एव प्रत्यक्षं ब्रह्म अवादिषम्

10

॥२८॥

11

सुरुवातीला शांतिपाठ म्हणून जो भाग आला
12 होता तसाच समारोप करताना प्रार्थना म्हणून आला
आहे. मात्र प्रथम विनंति होती म्हणून आज्ञार्थी रूपे
1 pm (भवतु) होती. आता मात्र अनुवाक पूर्ण झाल्यामुळे
भूतकाळाची रूपे (अवादिषम्) आहेत.

2 सूर्याची तिन्ही रूपे - उगवतीचा, माध्यान्हीचा व
मावळतीचा - आम्हाला कल्याणप्रद होवो. बाहुंना बळ
3 देणारा इंद्र बुद्धीला तेज देणारा बृहस्पती आणि
सर्व संचारी विष्णु आमचे कल्याण करो.

4 मूळरूप ब्रह्म, पहिले इंद्रियगोचर रूप वायु. यांना
नमन असो. (आकाश आहे पण दिसत नाही. जाणवत सुद्धा नाही)
5 वायु हे अनुभवाला येणारे प्रत्यक्ष ब्रह्म आहे. ऋताचे अधिष्ठान
आहे म्हणून मी तुला ऋत म्हटले, सत्य म्हटले. ते ब्रह्म
6 माझ्या प्रार्थनेने प्रसन्न झाले व त्याने माझे व आचार्यांचे
रक्षण केले.

7 इथे सर्व अध्ययनकाळात परमेश्वराने रक्षण केल्याबद्दल
कृतज्ञता व्यक्त केली आहे.

Birthday / Anniversary

© www.madhaveeragdhuveer.com

| | | |
|---|---|---|
| **26** | MON<br>APR<br>2010 | *Priority* |

Wk 17, 116-249

**April 2010**

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | | |

8 am
शीक्षावल्लीमध्ये १२ अनुवाक (विभाग) आहेत.

9
१. प्रार्थना

२. स्वर व उच्चारांना महत्व. मौखिक पद्धति - पाठांतर

10
३. अधिलोक (भौतिक), अधिप्रज (संतति) अध्यात्म (आत्मा)

४. ऋषींनी केलेली मेधा व श्रीची मागणी.

11
सद्वस्तुची जिज्ञासा, सर्व बाजूंनी सर्व प्रकारचे ऐश्वर्य

५. भूलोक, भुवर्लोक, स्वर्लोक - जाणीवेच्या तीन पायऱ्या.

12
त्यापलीकडे ब्रह्म आहे.

६. हृदयात मनाचे वसतिस्थान आहे.

1 pm
योगमार्गाने शक्य असणारे आत्म्याचे दर्शन।

७. अधिभूतस्वरूप, अध्यात्मस्वरूप

2
पिंड व ब्रह्मांड, व्यष्टि व समष्टि — विश्वप्रार्थना

८. ब्रह्मविद्येमध्ये ओंकाराचे महत्व. ॐकार हेच नाम

3
हाताने काम, मुखाने नाम, अंतःकरणात राम हा

संतांचा सिद्धांत मूळ उपनिषदातीलच आहे.

९. अध्यात्मविद्येची उपासना करण्यासाठी आवश्यक

असणारी योग्यता अंगी येण्यासाठी आचरण कसे असावे?

5
१० अहं ब्रह्मास्मि ही अनुभूति त्रिशंकू ऋषींना आली.

स्वाध्याय प्रवचनाचे कधीही विस्मरण नको.

6
११. अध्यात्मविद्येच्या प्राप्तिसाठी सदाचरणाची, नीतिधर्माच्या

बंधनांची आवश्यकता असते. पश्चात्ताप व निश्चय

7
यांच्या सहाय्याने आचरण खरोखरचे शुद्ध, निष्कलंक

असावे. त्यायोगे तो साधक सर्वमान्य होईल.

१२. प्रार्थनेचा पुनरुच्चार परंतु आता कृतज्ञतेने केला

आहे. सर्वव्यापी, सर्वसाक्षी, सर्वशक्तिमान ईश्वराविषयी

आदरभाव व्यक्त केला आहे.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuleer.com

May 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 31 | | | | | 1 | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

Priority

TUE APR 27 2010

Wk 17, 117-248

## – ब्रह्मानंद वल्ली –

९ अनुवाक - ३५ मंत्र

8 am

ॐ सहनाववतु । सह नौ भुनक्तु । सह वीर्यं करवावहै । तेजास्विनावधीतमस्तु । मा विद्विषावहै । ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥

9

10 आम्ही दोघांनी एकत्र रहावे, एकत्र सेवन करावे, एकत्र सामर्थ्य संपादन करावे. आमच्या अध्ययनाने

11 आम्ही तेजस्वी बनावे. आमच्याकडून एकमेकांचा द्वेष न घडो. त्रिविध तापांची शांति होवो.

12

### प्रथम अनुवाक

1 pm

ब्रह्मविदाप्नोति परम् । तदेषाभ्युक्ता ।

2 जो ब्रह्मविद झाला तो परम श्रेष्ठ पद प्राप्त करतो.

3 ही उक्ती अतिशय प्रसिद्ध आहे.

एखाद्या वस्तूचे ज्ञान झाले की ती आपण वापरू शकतो

4 T.V. Mobile. नाहीतर जवळ असूनसुद्धा ती असून नसल्यासारखीच असते. आपल्या अंतरंगात असणारा आत्मा

5 – त्याची आपल्याला जाणीव नाही.

परंतु इतर वस्तु प्रमाणे तो नाही. कारण इतर वस्तु

6 व आपण वेगळे असतो. मात्र परब्रह्माबद्दल अशी परिस्थिती नाही. त्याला जाणले की त्याच्यापासून वेगळे राहता येतच

7 नाही. त्या शक्तीचा अनुभव तिच्याशी एकरूप होऊनच घेता येतो. तिथे त्रिपुटी संपून जाते. साध्य व साधक ज्ञेय व ज्ञाता, वेगळेपणाने शिल्लक राहत नाही. ते एकरूपच होऊन जातात.

ब्रह्मविद् ब्रह्म एव भवति ।

तो स्वतः त्या श्रेष्ठ पदाला पोहोचतो. मात्र हे सांगायला

Birthday / Anniversary वेगळेपणाने उरत नाही.

© www.madhaveeraghuveer.com

WED 28 APR 2010

Wk 17, 118-247

Priority

April 2010

| M | T | W | T | F | S | S |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | | |

सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म । यो वेद निहितं गुहायां परमे व्योमन् । सोऽश्नुते सर्वान् कामान् सह ब्रह्मणा विपश्चितेति ।

ब्रह्म हे तत्त्व आहे, मूलद्रव्य आहे. ते सत्यस्वरूप, ज्ञानस्वरूप आणि अनंत असे आहे. सूक्ष्म अशा हृदयाकाशामध्ये राहणारे ब्रह्म जो जाणतो तो त्या सर्वज्ञ ब्रह्माशी एकरूप होऊन जातो. तो पूर्णकाम होतो म्हणजे त्याच्या सर्व कामना पूर्ण होतात.

त्रिकालातीत अस्तित्व असणारे हे ब्रह्म आहे. ते ज्ञानरूप, चिद्रूप आहे. जाणिवस्वरूप आहे. त्याला दिशा व कालाचे बंधन नाही. त्याचे अस्तित्व सर्वत्र आहे. प्रत्येकाच्या हृदयाच्या पोकळीत तो आहेच. दहराकाश, परमव्योम अशा पोकळीत ते आहे.

अस्तित्व (सत्) आहे, चैतन्य (चित्) आहे आणि क्रियाशक्ती (आनंद) आहे ∴ सच्चिदानंद आहे.

अस्ति + भाति + प्रिय या रूपाने प्रत्येकात आहे. फक्त ते नाम रूपाची खोळ पांघरून (उपाधियुक्त) आहे ∴ ते चटकन जाणवत नाही.

या विश्वात हे (इदम्) म्हणून जे काही दाखवता येते ते दृश्य जगत त्या ईश्वराचे वसतिस्थान आहे.

जो त्या ब्रह्मतत्त्वाशी एकरूप होतो तो इथं ब्रह्माबरोबर सर्व भोग भोगतो. तो विश्वभर पसरतो. त्या आतील ब्रह्मतत्त्वाचे भान ठेवून जो भोग घेतो तो ब्रह्मच भोगतो.

रामकृष्ण परमहंस – कालीमाता – इतक्या तोंडांनी तूच तर खातो आहेस.

Birthday / Anniversary

8 am तस्मात् वा एतस्मात् आत्मनः आकाशः सम्भूतः।
आकाशात् वायुः। वायोः अग्निः। अग्नेरापः। अद्भ्यः
9 पृथिवी। पृथिव्या ओषधयः। ओषधीभ्यः अन्नम्।
अन्नात् पुरुषः। स वा एष पुरुषः अन्नरसमयः।
10 तस्य इदम् एव शिरः। अयं दक्षिणः पक्षः। अयम्
उत्तरः पक्षः। अयम् आत्मा। इदं पुच्छं प्रतिष्ठा। तत् अपि
11 एषः श्लोकः भवति।

त्याच आत्मस्वरूपापासून आकाश उत्पन्न झाले.
12 आकाशापासून वायु, वायुपासून अग्नि, अग्निपासून पाणी,
पाण्यापासून पृथ्वी, पृथ्वीपासून वनस्पती, वनस्पतींपासून
1 pm अन्न आणि अन्नापासून पुरुष उत्पन्न झाला. म्हणून हा
पुरुष अन्नाच्या रसाने पूर्ण आहे. म्हणजेच अन्नरसाने
2 बनलेला आहे. त्याचे हे मस्तक आहे. हा उजवा आणि
डावा बाहु आहे. हा देहाचा मध्य (मुख्य) भाग आहे.
3 आणि हा शरीराचा आधारभूत असा खालचा भाग आहे.

मग त्या आत्म्यापासून (परमात्म्यापासून) आकाश
4 निर्माण झाले. आकाशापासून वायु, वायु (तील काही घटका)
पासून अग्नि अग्निपासून जल, जल आटून पृथ्वी - जमीन
5 निर्माण झाली. पृथ्वीमधून ओषधी / वनस्पती निर्माण झाल्या.
ते जीवांचे अन्न बनले. अन्नापासून सप्तधातु निर्माण झाले.
6 त्यातील महत्त्वाचा शुक्र/वीर्य! त्या वीर्यापासून पुरुष
निर्माण झाला. हा पुरुष अन्नरसमय आहे. असेच सर्व
7 प्राणी निर्माण झाले. मात्र ब्रह्माचा साक्षात्कार केवळ मानवालाच
होऊ शकतो. हा पुरुष अन्नानेच निर्माण होतो अन्नावरच
जगतो व अन्नातच विलीन होतो - (पृथ्वी) (माती)

हा पुरुष आहे तरी कसा?

त्याला पक्ष्याची उपमा दिली आहे. त्याचे पाच भाग आहेत.
पुढचे डोके, उजवे अंग डावे अंग (पंख) मधील भाग, आत्मा
आणि मागचा भाग म्हणजे पुच्छ - हा आधार आहे. हे पुच्छ



© www.madhaveeraghuveer.com

**April 2010**

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | | |

सुकाणूचे काम करते. प्राणी, माणूस सारख्या आधारानेच बसू शकतात. माणसाचे पुच्छ झडून गेले असले तरी माकडहाड आहेच. पायांचा आधार आहे.

या देहाच्या सहाय्यानेच तो साधना करु शकतो.

नरदेहाचेनि साधने । सच्चिदानंद पदवी घेणें ।

या देहामुळेच तो कायिक, मानसिक, वैचारिक तप करु शकतो व त्यातून आपले मूळ शोधू शकतो.

माणसातील सात धातूंपैकी वीर्य/शुक्र हे सर्वश्रेष्ठ आहे कारण त्यामध्ये पुनरुत्पत्तिचे सामर्थ्य आहे. प्रत्येक प्राण्यातील शुक्रापासून तसतसा प्राणी निर्माण होतो ही प्रक्रिया उलट्या क्रमाने तपासत गेलो तर शेवटी ब्रह्मापर्यंत पोहोचता येते.

शुक्र अन्नापासून, अन्न पृथ्वीपासून, पृथ्वी आपापासून आप अग्निपासून, अग्नि वायुपासून, वायु आकाशापासून आणि आकाश हे सूक्ष्म आहे ते त्याहीपेक्षा सूक्ष्मतर ब्रह्मापासून निर्माण झाले आहे. म्हणजे शेवटी माणसाचे मूळ हे ब्रह्म आहे. आणि ब्रह्माचे सर्व गुणधर्म माणसात आहेत. 'अहं ब्रह्मास्मि' ही अनुभूति माणूस घेऊ शकतो. आणि हा विचार केवळ माणूसच करु शकतो. आणि म्हणूनच या ब्रह्मविद्येमध्ये मानवाचा विचार केला आहे.

☆ वेदांतामध्ये किंवा सर्वच अध्यात्मवादी दर्शनांमध्ये सृष्टीची रचना सांगताना आत्मा व अनात्मा असा भेद केलेला आढळतो. मूळ आत्मस्वरूप जाणीवेने सर्वव्यापी असते. इतकेच नाही तर ते शाश्वत आणि अनंत असते. मात्र सृष्टिनिर्मितीच्या वेळी ते एकाहून अधिकाधिक जड तत्त्वांना जन्म देते. आकाश हे व्यापक आणि म्हणूनच सूक्ष्म आहे. आकाशामध्ये केवळ शब्द हा एकच तन्मात्रा आहे. त्यानंतर वायुची निर्मिति आहे.



©www.madhaveeraghuveer.com

IMP

વાયુમધ્યે શબ્દાબરોબરચ સ્પર્શ હી આહે. ત્યાનંતર અગ્નિ ઉત્પન્ન હોતો. શબ્દ, સ્પર્શ, રૂપ આહે. ત્યાનંતર આપાચી નિર્મિતી આહે. શબ્દ, સ્પર્શ, રૂપ, રસ આહે. આણિ સર્વાત શેવટી પૃથ્વી હી સર્વાત જડ આણિ ૫ તન્માત્રા યુક્ત આહે. શબ્દ, સ્પર્શ, રૂપ, રસ, ગંધ.

મ્હણૂનચ અત્યંત સૂક્ષ્મ, વ્યાપક, શાશ્વત અસા જ્ઞાનસ્વરૂપ આણિ પરિપૂર્ણ આત્મા જડાચ્યા મર્યાદાની બાંધલા જાતો. દેહ સૃષ્ટીચે મોઠે દ્વંદ્વ આહે. હે દ્વંદ્વ બુદ્ધીચ્યા માર્ગાને ઉકલણ્યાચે યેઈલચ અસે નાહી; ઉલટ કિત્યેકદા પુષ્કળ અભ્યાસાને વિકલ્પચ વાઢત જાતાત. આણિ ખરે આત્મતત્વ કાહી સાપડત નાહી.

યાસાઠીચ સાધુસંત સામાન્યાંના બોધ કરતાત.

બુદ્ધી જ્યાચે ચિંતન કરતે ત્યાચે રૂપ તીલા પ્રાપ્ત હોતે. પરંતુ સર્વસામાન્ય માણસે પ્રપંચાચે કિંવા અનાત્મ વસ્તૂંચે ચિંતન કરતાત. આણિ ત્યામુળે તે સ્વાર્થી વ સંકુચિત બનત જાતાત. પરંતુ આત્મસ્વરૂપાચે દર્શન હોણ્યાસ સૂક્ષ્માચે ચિંતન ઘડાયલા હવે. આણિ સચ્ચિદાનંદસ્વરૂપ પરમાત્મ્યા ઇતકી દુસરી સૂક્ષ્મ વસ્તુ નાહી. ત્યાચ્યા ચિંતનાચા છંદ લાગલા કી મગ અનાત્મવસ્તુમધ્યે રસ વાટેનાસા હોતો આણિ જીવ અંતર્મુખ હોતો. અંતર્મુખ હોણે મ્હણજે બુદ્ધીચે તોંડ ભગવંતાકડે વળણે. હે સાધલે કી બુદ્ધીલા ત્યાચાચ ધ્યાસ લાગતો. કોણતીહી ક્રિયા કરતાના ત્યાચેચ ચિંતન ઘડૂ લાગતે. હી ચિંતનાચી યુક્તી સાધલી ના કી નેહમીચ્યા વ્યવહારાત કોણતાહી બદલ ન કરતા પ્રત્યેક કૃતીમધ્યે અનુસંધાન ટિકૂન રાહતે. હી કલા ત્યાલા સાધતે તો પ્રપંચ વ પરમાર્થ યાતીલ સમતોલ ઉત્તમરીતીને સાધૂ શકતો ત્યામુળે ત્યાચે અંતર્યામી સમાધાન ટિકૂન રાહતે. હૃદયાચ્યા ગુહેત રાહણારે સત્યમ્ જ્ઞાનમ્ અનન્તમ્ બ્રહ્મ અનુભવાલા યેતે.

Birthday / Anniversary

8 am अन्नात् वै प्रजाः प्रजायन्ते। याः काः च पृथिवीं श्रिताः।
अथो अन्नेन एव जीवन्ति। अथ एनद् अपि यन्ति अन्ततः।
9 अन्नं हि भूतानां ज्येष्ठम्। तस्मात् सर्वौषधम् उच्यते।
सर्वं वै ते अन्नम् आप्नुवन्ति ये अन्नं ब्रह्म उपासते।
10 अन्नं हि भूतानां ज्येष्ठम्। तस्मात् सर्वौषधमुच्यते।
अन्नात् भूतानि जायन्ते। जातान्यन्नेन वर्धन्ते।
11 अद्यतेऽत्ति च भूतानि। तस्मादन्नं तदुच्यत इति॥

12 • पृथ्वीचा आश्रय करणारे सर्व प्राणी अन्नापासून
उत्पन्न होतात, अन्नाने जगतात व अन्नातच लय
1 pm पावतात. सर्व प्राण्यांच्या अगोदर अन्न उत्पन्न झाले.
म्हणून ते सर्वांचे औषध आहे असे म्हणतात. जे लोक
2 अन्नदृष्टीने ब्रह्माची उपासना करतात. त्यांना अन्नाचे
विविध प्रकार वश होतात. अन्नापासून प्राणी जन्म
3 पावतात. जन्म पावल्यावर अन्नाने ते वाढतात.
प्राण्यांकडून भक्षण केले जाते. आणि प्राण्यांना भक्षण
4 करते म्हणून त्याला अन्न म्हणतात.
स्थूल देह - अन्नमय कोश
5 आता पंचकोशांचे वर्णन करत आहेत.
अन्नच श्रेष्ठ व ज्येष्ठ आहे. ∴ अन्नाला सर्वौषधम्
6 म्हणतात. औष म्हणजे ओज - ऊर्जा - कॅलरी
जे अन्नब्रह्माची उपासना करतात त्यांच्यावर कधी
7 उपाशी रहाण्याची वेळ येत नाही.
ब्रह्माचे कुळ हे अन्नाशी (पृथ्वीशी) मिळतेजुळते आहे
ज्यातून निर्मिती त्यातच लय आहे.
पृथ्वीची (ब्रह्माची) उपासना करायची म्हणजे शेती करणे,
पर्यावरणाचे संरक्षण करणे, तिच्याविषयी कृतज्ञता बाळगणे.
तिचे उपकार घेण्यासाठी आधी स्वतःला पात्र बनवणे.
थोडक्यात व्यष्टिरूपाने अन्न व समष्टिरूपाने पृथ्वी महान आहे.

तस्मात् वा (वै) एतस्मात् अन्नरसमयात् अन्यः अन्तरः आत्मा प्राणमयः। तेन एषः पूर्णः। सः वा (वै) एषः पुरुषविधः एव। तस्य पुरुषविधताम् अनु अयं पुरुषविधः। तस्य प्राण एव शिरः। व्यानो दक्षिणः पक्षः। अपानः उत्तरः पक्षः। आकाशः आत्मा। पुच्छं प्रतिष्ठा। तत् अपि एषः श्लोकः भवति।

या अन्नरसमय पिंडाहून वेगळा असा प्राणमय अंतरात्मा आहे. त्या प्राणमय आत्म्याने हा अन्नरसमय पिंड भरलेला आहे. तो प्राणमय आत्मा पिंडाच्या आकाराचा म्हणजे माणसाच्या आकाराप्रमाणेच आहे. पिंड देखील प्राणमय आत्म्याच्या आकाराप्रमाणेच आहे. (Mutual) प्राण हे याचे ~~शरीर~~ शिर, व्यान हा उजवा भाग, अपान हा डावा भाग, आकाश हा त्याचा आकार (आत्मा) आणि पृथ्वी त्याचा आधार किंवा पाया (पुच्छ) आहे. पुढील मंत्र याच अर्थाचा आहे.

प्राणमय देह हा त्या पुरुषमय देहात सर्वत्र व्याप्त होऊन राहत असल्याने त्याच आकाराचा असतो.

अन्नमय कोशात हा प्राणमय कोश असतो. हा वायुरूप कोश जर पक्षी समजला तर प्राण हे त्याचे शिर, व्यान हा सर्व हालचालींसाठी आवश्यक असा उजवा पंख तर अपान हा डावा पंख आहे. अपान अशुद्ध वायु बाहेर टाकण्याचे काम करतो. मलनिःसारण करतो. आकाश सर्वव्यापी असते. आकाश म्हणजे पोकळी. नाभिमध्ये राहणारा समान अन्नाचे रसात रूपांतर करून ती ऊर्जा सर्व शरीरभर पोहोचवतो. असा सर्वव्यापी असणारा समान (आकाश) आहे. या सर्वांना आधार देणारा पृथ्वीचा भाग या वायुमय शरीराला गुरुत्वाकर्षण रूपाने (आधार देऊन) धरून ठेवते. जे पिंडात तेच ब्रह्मांडात आहे.

©www.madhaveeragniveer.com

4 TUE MAY 2010

Wk 18, 124-241

Priority

१५ नोव्हेंबर २०१०

May 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 31 | | | | | 1 | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

## - तृतीय अनुवाक -

8 am प्राणं देवा अनु प्राणन्ति । मनुष्याः पशवश्च ये ।
प्राणो हि भूतानाम् आयुः । तस्मात् सर्वायुषम् उच्यते ।
9 सर्वम् एव ते आयुः यान्ति ये प्राणं ब्रह्म उपासते ।
प्राणो हि भूतानाम् आयुः । तस्मात् सर्वायुषम् उच्यते
10 इति ये प्राणं ब्रह्म (इति) उपासते ते सर्वम् एव
आयुः यान्ति । तस्य एषः एव शारीर आत्मा यः पूर्वस्य ।

11

देव, माणसे आणि पशु प्राणाला म्हणजे प्राणशक्तीला
12 अनुसरूनच श्वासोच्छ्वासादि क्रिया करतात. प्राण हे
भूतमात्रांचे जीवन आहे. म्हणून त्याला सर्वायुष म्हणतात -
1 pm सर्वांचे आयुष्य । जे लोक प्राणदृष्टीने ब्रह्माची उपासना
करतात त्यांना प्राणशक्तीचे विविध प्रकार वश होतात.
2 म्हणजे त्यांची भूतमात्रांवर सत्ता चालते.

आपल्या प्रत्येकाचे श्वास ठरलेले आहेत. तेवढेच आयुष्य
3 आहे. आयु म्हणजे कार्यशक्ति !

प्राणांची ब्रह्म म्हणून उपासना करणे म्हणजे पूरक,
4 कुंभक, रेचक १० नी श्वास लांबवायचा. अशा दीर्घ
श्वासामुळे आयुष्य वाढते. ऋषी मुनी — संथ गतीने श्वास
5 ∴ दीर्घायुष्य

चांगदेवांचे प्राणांवर नियंत्रण ∴ १४०० वर्षे आयुष्य
6 वाघ, सर्पावर सत्ता चालवता येई.

7 तस्मात् वा एतस्मात् प्राणमयात् अन्यः अन्तरः आत्मा
मनोमयः । तेन एष पूर्णः । स वा एष पुरुषविध एव ।
तस्य पुरुषविधताम् अनु अयं पुरुषविधः । तस्य यजु
एव शिरः । ऋग् दक्षिणः पक्षः । सामोत्तरः पक्षः ।
आदेश आत्मा । अथर्वाङ्गिरसः पुच्छं प्रतिष्ठा ।
तदप्येष श्लोको भवति ।

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

प्राण हा अन्नरसमय शरीराचा आत्मा आहे. त्या प्राणमय शरीराच्या आतमध्ये त्याच्याहून वेगळा असा मनोमय अंतरात्मा आहे. मनोमय अंतरात्म्याने प्राणमय शरीर धरलेले आहे. मनोमय अंतरात्मा माणसाच्या आकारासारखाच असतो.

यजुर्वेद हे त्याचे मस्तक, ऋग्वेद ही उजवी बाजू, सामवेद डावी बाजू, विधि किंवा आदेश हे त्याचे शरीर आणि अथर्वांगिरस हा त्याचा पाया आहे.

या मनोमय शरीराला पक्ष्याची उपमा दिली आहे. यजुर्वेदात यज्ञाबद्दल सर्व माहिती असते ∴ ते शिर आहे. यज्ञातील अध्वर्यू यजुर्वेदपारंगत असतो.

ऋक् हा उजवा पंख तर साम हा डावा पंख आहे. श्रुतिमधील वाक्याप्रमाणे (आदेश) सर्व काही चालते ∴ तो मध्यभाग आहे आणि अथर्ववेद हा अथर्व आणि अंगिरस ऋषींनी संपादला म्हणून ते त्याचे पुच्छ किंवा आधार आहेत. कारण - - - -

यज्ञात सर्व काही योग्य रीतीने होत आहे की नाही हे पाहण्याचे काम अथर्ववेदाचा ब्रह्मा करीत असतो. यज्ञात काही दोष राहिल्यास त्याला ब्रह्मा जबाबदार असतो. म्हणूनच तो यज्ञाचा आधार (प्रतिष्ठा-पुच्छ) असतो.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

Priority

| May 2010 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| 31 | | | | | 1 | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

29 Nov. 2017

## – चतुर्थ अनुवाक –

8 am

यतो वाचो निवर्तन्ते। अप्राप्य मनसा सह।
आनन्दं ब्रह्मणो विद्वान्। न बिभेति कदाचन। इति।
तस्यैष एव शारीर आत्मा यः पूर्वस्य।

9

10

मन आणि वाणी ज्याच्यापर्यंत न पोहोचताच परत फिरतात त्या ब्रह्माच्या आनंदाचा अनुभव घेणाऱ्या पुरुषाला कसलेही भय उरत नाही.

11

ब्रह्मतत्वाची आनंदस्वरूप अनुभूति आली की तो पुरुष निर्भय होतो. जोपर्यंत द्वैताची जाणीव असते

12

तोपर्यंत भीती असते. एकदा का द्वैताची भावना गेली, केवळ अद्वैत उरले की मग भय कुणाचे ?

1 pm

द्वितीयात् वै भयं भवति।

2

मनाने साधना केली की हेच मन त्याला ब्रह्मापर्यंत पोहोचवून मागे फिरते. मनाचे हे वैशिष्ट्य आहे की

3

त्याला जिथे चिकटवावे तिथे चिकटते.

कुलूप किल्ली —— मनाची शक्ती खूप मोठी आहे.

4

हमको मन की शक्ती देना - - - - -

यां मनोमय कोशाचा आत्मा कोण? जो अन्नमय

5

कोशाचा आत्मा असतो तोच या मनोमय कोशाचा आत्मा!

6

7

Birthday / Anniversary

© www.madhaveeragniveer.com

तस्माद् वा एतस्मात् मनोमयात् अन्तरः आत्मा विज्ञानमयः। तेन एषः पूर्णः। स वा एष पुरुषविध एव। तस्य पुरुषविधतान्वयं पुरुषविधः। तस्य श्रद्धैव शिरः। ऋतं दक्षिणः पक्षः। सत्यमुत्तरः पक्षः। योग आत्मा। महः पुच्छं प्रतिष्ठा। तदप्येष श्लोको भवति।

त्या या मनोमय कोशाच्या आत असणारा कोश म्हणजे विज्ञानमय कोश. मनोमय कोशात बाहेरची जाणीव तर विज्ञानमय कोशात आतली जाणीव असते. हा कोश अधिक सूक्ष्म असतो. व्यवहारात हाच कोश निश्चयात्मक बुद्धीचे काम करत असतो.

मन अनुभवांशी जोडलेले असते. प्रिय काय किंवा अप्रिय काय हे ते सांगते परंतु बुद्धी मात्र योग्य अयोग्याचा निवाडा करते.

प्रसादाचा पेढा खावा की न खावा?

व्यवसायात्मिका बुद्धि - सकाम यज्ञ करणाऱ्यांची बुद्धी अनंत भेदांची असते. (बहुशाखा)

आई आपल्या मुलाला औषध पाजत असेल तर, गोड मिळेल असे सांगते. तिचा उद्देश वेगळा असतो परंतु मुलगा मात्र गोडीच्या नादाने औषध पितो.

केवळ मनाला वाटते म्हणून काही गोष्टी करत राहिलो तर कोणताही काम न होता हानीच होण्याची शक्यता असते. ∴ मनावर सतत नियंत्रण हवे.

नियंत्रण हवे म्हणजे दडपण नाही.

दिवा बोलत नाही फक्त आहे ते दाखवतो. तसेच विज्ञानमय कोश भाषण देत नाही. मात्र खाचखळगे थेट दाखवतो. मनातले योग्य विचार कृतीतून साकारण्याचे सामर्थ्य विज्ञानमय व मनोमय कोशाच्या संयोगातून पूर्वी केलेल्या साधना उपासनेतून मिळत असते.

Birthday / Anniversary

8 am श्रद्धा हे त्याचे शिर आहे. श्रद्धेशिवाय माणसाला
अस्तित्व नाही. माणसाची कशावर तरी श्रद्धा
9 असतेच. विश्वासाला प्रमाणाची गरज असते तशी
श्रद्धेला वाटत नाही. या श्रद्धेने ज्ञान मिळवता येते.
10 ऋत हा दक्षिण पंख (नैतिक सत्य, विश्वाच्या हितासाठी)
असते. तर सत्य हा डावा पंख आहे. सदा वर्तमान –
11 नेहमी असणारे. योग हा मध्यभाग आहे. योगाने
माणूस तदाकार होतो. त्यानंतर खरे ज्ञान होते. निश्चय
12 झाला की बुद्धीला स्थिरता येते. योगाने स्थैर्य येते.
पाश्चात्य देशात भौतिक सुखे असूनसुद्धा स्थैर्य
1 pm नाही. शांति नाही जे आपल्याकडे आहे.
महः हे त्याचे पुच्छ आहे. तैत्तिरीय – शिक्षा वल्ली
2 मधील पाचव्या अनुवाकात चौथी व्याहृति – महः आहे.
महः हा त्याचा आधार / प्रतिष्ठा / पुच्छ आहे.

3

– पंचम अनुवाक –

4 विज्ञानं यज्ञं तनुते। कर्माणि तनुतेऽपि। विज्ञानं देवाः
सर्वे। ब्रह्म ज्येष्ठमुपासते। विज्ञानं ब्रह्म चेद् वेद।
5 तस्माच्चेन्न प्रमाद्यति। शरीरे पाप्मनो हित्वा। सर्वान्
कामान् समश्नुते इति। तस्यैष ~~आत्मा~~ एव शरीर
6 आत्मा यः पूर्वस्य।
विज्ञानमय कोश आणि आनंदमय कोश हे अतीत
7 सूक्ष्म आहेत. बाह्यरूप मिथ्या तर आतले रूप सत् आहे.
आनंद मिळवायचा आहे. त्या आनंदाचेच हे कवच आवरण।
मनाची उपासना करून अ-मन करायचे. मन
नाहीसे करायचे. मन स्थिर झाले की त्यात आत्मज्ञाना शुद्ध
ज्ञानाचा उदय होतो.
As soon as mind seats on present
Birthday / Anniversary tense, it disappears.

©www.madhaveeraghuveer.com

तल्लीन जास्त वर्तमानकाळात राहता आले तर शुद्ध ज्ञानाची प्राप्ती होऊ शकते.

हे विज्ञानच यज्ञाचा विस्तार करते. जे आहे ते त्याचे आहे. मी केवळ माध्यम आहे. हे जाणून कृतज्ञतेने आहुती देणे म्हणजे यज्ञ. इदं न मम हे नुसते वाचेने म्हणायचे नाही तर खरोखर तशी भावना हवी.

त्यातून आपोआपच ममत्व, आसक्ती नाहीशी होते. निरपेक्ष, स्वार्थरहित वृत्तीने केलेले कार्य म्हणजे यज्ञच आहे. यज्ञ आपल्याला मोक्षाप्रत नेतात.

इंद्रियांनी मनाच्या ताब्यात न राहता बुद्धीच्या ताब्यात राहिले तर आदर्श जीवन जगता येईल. शिस्तबद्ध जीवन असेल तर मोक्षमार्ग सुकर होईल.

आणि खरोखर जो विज्ञानाला नीट समजून उपासना करेल त्याच्या हातून प्रमाद घडणार नाही, खोटे वर्तन तो करणार नाही. आतला आवाज ऐकला तर कोणतेही पाप घडणार नाही. १० प्रकारची पापे

चोरी हिंसा, व्यभिचार - कायिक पापे
असंबद्ध कठोर बोलणे, चहाडी, खोटे बोलणे - वाचिक पापे
मत्सर, गैरसमज, घात करण्याची इच्छा - मानसिक पापे

ही दहा पापे तर तो करत नाहीच परंतु सर्वांत महत्त्वाचे म्हणजे देहाला सर्वस्व मानण्याचे पाप तो करत नाही. सर्व भोगांना समभावाने अनुभव घेतो.

अन्नपूर्णा स्तोत्र

भक्ताभीष्टकरी दशाशुभहरी काशीपुराधीश्वरी ।
भिक्षा देहि कृपावलम्बनकरी मातान्नपूर्णेश्वरी ॥

© www.madhaveeraghuveer.com

10 MON MAY 2010 | Priority

Wk 19, 130-235

May 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 31 | | | | | 1 | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

अरविंद [illegible] (निगडी)
9823049053

तस्माद् वा एतस्मात् विज्ञानमयाद् अन्यः अन्तरः आत्मा आनन्दमयः। तेन एषः पूर्णः। सः वा एष पुरुषविध एव। तस्य पुरुषविधताम् अनु अयं पुरुषविधः। तस्य प्रियम् एव शिरः। मोदः दक्षिणः पक्षः प्रमोद उत्तरः पक्षः। आनन्द आत्मा। ब्रह्म पुच्छं प्रतिष्ठा। तत् अपि एषः श्लोकः भवति।

बुद्धी ही मनोमय शरीराचा आत्मा आहे. त्या विज्ञानमय शरीराच्या आतमध्ये त्याच्याहून वेगळा असा आनंदमय आत्मा आहे. त्या आनंदमय आत्म्याने विज्ञानमय शरीर भरलेले आहे. आनंदमय अंतरात्मा माणसाच्या आकाराचा असतो. प्रेम हे त्याचे मस्तक. प्रसन्नता ही त्याची उजवी बाजू, विशेष प्रसन्नता ही त्याची डावी बाजू, आनंद किंवा समाधान हे त्याचे शरीर आणि ब्रह्म हा त्याचा पाया आहे. पुढील मंत्र याच अर्थाचा आहे.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

June 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| 28 | 29 | 30 | | | | |

*Priority*

6 Dec. 2017

TUE MAY 11 2010

Wk 19, 131-234

- षष्ठ अनुवाक -

8 am

असन्नेव स भवति। असद् ब्रह्मेति वेद चेत्। अस्ति ब्रह्मेति चेद् वेद। सन्तमेनं ततो विदुरिति।

9

ब्रह्म नाही असे जो समजतो तो मनुष्य असत् म्हणजे नास्तिक होतो आणि ब्रह्म आहे असे जो जाणतो त्याला संत समजतात.

10

11

जर ब्रह्म नाही असे मानले तर शून्यातून काहीही निर्माण होऊच शकत नाही. म्हणून तू सुद्धा नाहीस. नाहीतून आहे होऊ शकत नाही.

12

असत् - सत् - सन्त

1 pm

जो ब्रह्म आहे असे मानतो, त्यावर विश्वास ठेवतो तो त्याला जाणता जाणता ब्रह्मच होऊन जातो म्हणजे ब्रह्मविद् होतो.

2

3

तस्यैष एव शारीर आत्मा। यः पूर्वस्य।

मागे जो विज्ञानकोश सांगितला त्याचा हा आनंदमय कोश हा आत्मा आहे.

4

5

6

7

Birthday / Anniversary

© www.madhaveelaghuveer.com

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 31 | | | | | 1 | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

8 am अथ अतः अनुप्रश्नाः। उत अविद्वान् अमुं लोकं प्रेत्य कश्चन गच्छति ३ आहो विद्वान् अमुं लोकं
9 प्रेत्य कश्चित् समश्नुते ३ उ।

10 आपले सर्व म्हणणे ऐकून माझ्या मनात काही प्रश्न उभे राहिले आहेत. आता इथून पुढे हे अनुप्रश्न
11 मी आपल्याला विचारतो. आपण कृपा करून माझ्या मनातील गोंधळ दूर करा.
12 ब्रह्म आहे का? त्याला काही प्रमाण आहे का? जो ब्रह्माला मानत नाही तो मेल्यानंतर परलोक प्राप्त
1 pm करतो का? आणि जो ब्रह्माला मानतो त्याला कोणती गति प्राप्त होते? ब्रह्माचे अस्तित्व मानल्याने वा न
2 मानल्याने काय फरक पडतो? आणि खरोखर काहीच अंतर नसेल तर ते जाणण्याचे कष्ट घ्यायचेच कशाला?
3 तुम्ही तर सांगता की प्रत्येकात ब्रह्म आहे. तेव्हा प्रत्येकजण परलोकात पोहोचायला हवा. आणि हे घडत
4 नसेल तर जाणून घेऊन काय करायचे?
३ हे चिन्ह ३ अक्षरे दर्शवते.

5

सः अकामयत । बहु स्यां प्रजायेय इति । सः तपः अतप्यत ।
6 सः तपः तप्त्वा । इदं सर्वम् असृजत । यत् इदं किं च ।
तत् सृष्ट्वा । तत् एव अनुप्राविशत् । तत् अनुप्रविश्य ।
7 सत् च त्यत् च अभवत् । निरुक्तं च अनिरुक्तं च ।
निलयनं च अनिलयनं च । विज्ञानं च अविज्ञानं च । सत्यं
च अनृतं च । सत्यम् अभवत् । यत् इदं किं च ।
तत् सत्यम् इति आचक्षते । तत् अपि । एषः श्लोकः भवति

आधी परब्रह्म एकटेच होते. पण त्याला एकटेपणाचा कंटाळा आला. त्याने इच्छा केली - मी खूप आकार धारण करावेत. सगुण साकार रूप घ्यावे. परंतु त्यासाठी काही निश्चित योजना, आराखडा हवा. तो त्याने तपाच्या सहाय्याने प्राप्त केला. त्यावरून त्याने विश्वाची निर्मिती केली आणि जे जे दृश्य म्हणून दाखवता येते ते ते सर्व उत्पन्न केले.

परंतु निर्मितीसाठी त्याच्याकडे कोणतीही सामग्री नव्हती. कच्चा माल नव्हता. तेव्हा त्याने स्वतःपासूनच हे विश्व निर्माण केले. उपादान कारण ही तोच आणि निमित्तकारणही तोच आहे.

कोळी आपल्या शरीरातून चिकट द्राव बाहेर काढतो आणि तोच जाळे विणतो.

इथे, त्याने सृष्टीची निर्मिती केल्यावर तो त्यात शिरला; प्रत्येकात शिरला. त्यामुळे हे व ते जवळ दिसणारे, व दूर दिसणारे तोच बनला. वर्णन करता येण्याजोगे आणि वर्णन न करता येण्याजोगे तोच आहेत. दृश्य-अदृश्य तोच आहे. ज्याला आश्रयाची आवश्यकता आहे व ज्याला आश्रयाची आवश्यकता नाही तो तोच आहे. चेतन व जड तोच आहे. खरे व खोटे तोच आहे.

या विश्वातील प्रत्येक वस्तूत सत् चित् आनंद आहेच. अस्ति भाति प्रिय नाम रूप तोच आहे.

तप ही आत्मा व सृष्टी यांना जोडणारी साखळी आहे.

तप म्हणजे अति सूक्ष्म खोल व एकाग्र चिंतन आहे. तप ज्ञानरूप असते. ते शक्ति निर्माण करते. सृष्टी निर्मिती साठी ब्रह्माने तप म्हणजेच सूक्ष्म व सखोल चिंतन केले.

आपल्यालाही सृष्टीवर ताबा आणायचा असेल तर एकाग्रतेने चिंतन घडायला हवे. हे २ मार्गांनी करता येते



© www.madhaveeraghuveer.com

14 FRI MAY 2010

Wk 19, 134-231

*Priority*

**May 2010**

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 31 | | | | | 1 | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

8 am एक विज्ञानाचा मार्ग आणि दुसरा अंतर्ज्ञानाचा
मार्ग आहे. पहिला मार्ग दूरचा व खटाटोपाचा आहे.
9 त्यामानाने दुसऱ्या मार्गासाठी आपला संयम मन व
इंद्रियांवर हवा. आणि यातील गंमत अशी की
10 जसजसे मन शुद्ध होत जाईल तसतसे जीवाचे
सामर्थ्य वाढत जाते. त्याचबरोबर संयम, संतोष,
11 सत्प्रवृत्ति यांची वाढ होत जाते. शिवाय या सर्वांचा
उपयोग जनहितासाठी केला जातो
12 शहाणा साधक आपले सामर्थ्य जपून वापरतो
सर्वसामान्य माणसे दैनंदिन जीवनात प्रत्येक प्रसंगात
1 pm देहाची व मनाची शक्ती जरुरीपेक्षा विनाकारण खर्च
करतो. ते प्रथम थांबवले पाहिजे. जरुरीपुरते खाणे-
2 पिणे, उठणे बसणे, ऐकणे वाचणे लिहिणे, काळजी
करणे व्हायला हवे. त्यात अतिशयोक्ति नको.
3 ज्याने हे थांबवले त्याची शक्ति साठायला लागते
आणि चिंतनाला ध्यानाला बसला की चित्त एकाग्र होऊ लागते.
4 उत्तम साधक तर फार कमी बोलतात, थोडे खातात,
फार थोडे वाचन करतात. मात्र डोळे आणि कान
5 काळजीपूर्वक वापरतात. अभ्यासू माणसाने व्यवहार
सांभाळून जेवढे करता येईल तेवढेच करावे

6

7

Birthday / Anniversary

## - सप्तम अनुवाक -

असद् वा इदम् अग्रे आसीत्। ततः वै सत् अजायत। तत् आत्मानं स्वयम् अकुरुत। तस्मात् तत् सुकृतम् उच्यते।

आरंभी हे सर्व विश्व अव्यक्त म्हणजे प्रत्यक्ष नव्हते. अव्यक्त विश्वापासून हे दृश्य विश्व निर्माण झाले. त्याने स्वतःच स्वतःला निर्माण केले म्हणून त्याला सुकृत म्हणतात.

अव्यक्तातून हे व्यक्त, नामरूपात्मक, मूर्त जग साकार झाले. त्याने अशा रीतीने स्वतःला जड-चेतन नामरूपात्मक बनवले म्हणून त्याला सुकृत स्वयंभू म्हणतात.

वारा वाहत नाही तोपर्यंत जाणवत नाही. या आत्म्याने सुद्धा स्वतःला आपणाहून जाणिवेच्या कक्षेत आणले. तो दृश्य बनला.

यद् वै तत् सुकृतं रसो वै सः। रसं हि अयं लब्ध्वा आनन्दी भवति। कः हि एव अन्यात् कः प्राण्यात् यत् एषः आकाशः आनन्दः न स्यात्। एष हि एव आनन्दयाति।

तो जो सुकृत आहे तोच रस आहे. रस हे आनंदाचे मूळ स्वरूप आहे. आनंदाचा अनुभव आल्यावर मनुष्य आनंदरूप बनतो. मनुष्याच्या हृदयात आनंदरूप स्थित आहे. म्हणून मनुष्य जगतो व त्याच्या जीवनाच्या सर्व क्रिया चालतात. आनंदस्वरूप आत्मा हाच सर्व जीवांना आनंद देतो.

सुकृत शुष्क नाही तर रसपूर्ण आहे.

आपण जगतो ते कशासाठी? तर जगण्यात आनंद आहे म्हणून! जीवन कितीही संकटांनी, दुःखांनी भरलेले असले तरी सुद्धा जगण्यात मजा आहे. गाढ झोपेतही आनंद आहे. कारण आपण त्या परमात्म्याच्या अगदी

Science has been created by the God believing Theist only

जवळ असतो. लहान मूल जगण्याचा आनंद सर्वाधिक घेत असते. माणूस स्वतःला विसरतो तेव्हा त्याला सत्यानंद झालेला असतो.

स्वतःचा विसर पडणे ही आनंदाची सर्वोच्च स्थिती त्यावेळी तिथे 'मी' नसतो. 'तो' असतो. ∴ सत्यानंद.

जड इंद्रियांना प्रेरणा देणारा तोच आहे. त्यातून सुख मिळते. ते सुखही हाच अनुभवतो. मात्र जेव्हा जीवशक्ती कमी होते तेव्हा काहीही नकोसे वाटते. त्यावेळी आनंद उपभोगण्याची शक्ती कमी होते.

जेव्हा आनंदमय आत्मा असतो तेव्हाच मनुष्य आनंदाचा उपभोग घेऊ शकतो

यदा ह्येव एष एतस्मिन् अदृश्ये अनात्म्ये अनिरुक्ते अनिलयने अभयं प्रतिष्ठां विन्दते। अथ सः अभयं गतो भवति।

जेव्हा मनुष्य या अदृश्य, अशरीरी, अविकारी आणि निराधार अशा ब्रह्माच्या ठिकाणी निश्चयाने स्थिर होतो त्या वेळी तो अभयास्थितीला पोहोचतो.

म्हणजेच जीव जेव्हा आपल्या मूळ स्थितीला पोहोचतो तेव्हा तो निर्भय होतो. जिथे द्वैत आहे तिथे भय आहे. सर्वत्र मीच आहे असे म्हटल्यावर भीती कुणाची? जन्ममृत्यूचेही भय नाही. जन्म मृत्यु देहाला असतात. शक्तीला नसतात.

Energy never dies.

शिष्याने विचारलेल्या प्रश्नाला हे उत्तर आहे. तो कोणत्या लोकाला जातो? ब्रह्म जाणणारा ब्रह्मलोकाला प्राप्त होतो. कारण तो सर्वत्र व्याप्त होतो परब्रह्मच बनतो.

एकरूपता आली की अनुभव घेणारा वेगळा उरतच नाही. मन पूर्ण स्थिर झाले की आनंदच आनंद असतो. ब्राह्मी स्थिति

Birthday / Anniversary

| June 2010 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| 28 | 29 | 30 | | | | |

*Priority* Behind every creation there is a creator

MON 17 MAY 2010

Wk 20, 137-228

8 am यदा ह्येवैष एतस्मिन् उदरमन्तरं कुरुते। अथ तस्य भयं भवति। तत्त्वेव भयं विदुषः अमन्वानस्य। तदप्येष श्लोको भवति।

9

जेव्हा मनुष्य ब्रह्माविषयी यत्किंचित संशय घेतो म्हणजे आपणामध्ये व ब्रह्मामध्ये अल्पदेखील भेद पाहतो तेव्हा त्याला भय आहे असे समजावे. अविवेकी विद्वानाला तेच भय असते.

10

11

जेव्हा हा जीव परब्रह्मात एकरूप न होता जर थोडेसेही अंतर ठेवून राहिला तर भय आहे.

12

अविवेकी विद्वान म्हणतो मला ज्ञान झाले. जिथे मी शिल्लक राहतो तिथे भयही असते. अशा विद्वानाला ब्रह्माचेही भय वाटते.

1 pm

तो सर्वज्ञ सर्वशक्तिमान व मी अत्यल्प अल्प शक्तीचा म्हणून भीती वाटते.

2

3

4

5

6

7

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

## अष्टम अनुवाक

8 am भीषास्मात् वातः पवते। भीषोदेति सूर्यः।
भीषास्माद् अग्निः च इन्द्रः च। मृत्युर्धावति पञ्चमः॥

9 या ब्रह्माची भीती वाटते म्हणून वायु वाहतो.
10 त्याच्या भीतीने सूर्य उगवतो. याच्या भीतीने अग्नि व इंद्र आपापली कामे करतात. आणि पाचवा मृत्यु
11 देखील याच्या भीतीनच काम करतो.

**तत्त्व** आत्मस्वरूप आनंदमय असून सूक्ष्म आहे.

12 ब्रह्मांडाचा मुख्य व्यवहार ज्या पाच शक्तींवर चालतो त्या शक्ती विनबोभाटपणे, खंड न करता, वेळेवर सर्व
1 pm कामे करतात. ती का? तर हा शिक्षा करेल या भीतीने.

१. वायु हा ब्रह्मांडाचा प्राण आहे. व्यक्ती - श्वासोच्छ्वास
2 २. सूर्य — हिरण्यगर्भापासून विश्व. ऊर्जा
३. अग्नी - अन्नाची निर्मिती ऊब
3 ४. इंद्र - पावसाचा स्वामी वृष्टिशिवाय सृष्टी नाही.
५. मृत्यु - नको असलेल्या गोष्टींचा नाश

4 यामुळे हा विश्वाचा प्रपंच चालतो. या शक्तींना परमेश्वराचा धाक आहे. त्याने घालून दिलेल्या नियमाप्रमाणेच चालतात.
5 नियमानुसार आचरण करून आपल्या स्वामीला खूश करतात.

मूळ आत्मस्वरूप अदृश्य, निराकार, स्थलकालातीत
6 आहे पण या लक्षणांपेक्षा आनंद हा आत्म्याचाही आत्मा आहे. आत्म्याचा आनंदरूप स्वभाव इतका प्रबळ आहे की
7 मनुष्याच्या एकूण एक खटपटीची ती पार्श्वभूमि आहे. मनुष्याच्या सगळ्यात कृती या आनंदासाठीच असतात.

हृदयाच्या खोल गुहेमध्ये आनंदाचे खरे स्थान आहे. 'मी कोण' याचा शोध घेऊ लागले म्हणजे वृत्तींचा वेग हळूहळू कमी होऊ लागतो. आणि जसजसे आपण आत खोल जाऊ लागतो. जसे आत खोल जातो तसतसे विचार येणार विचार थांबले की केवळ 'मी आहे' असे सूक्ष्म स्पंदन



© www.madhaveeraghuveer.com

हृदयामध्ये जाणीवरूपाने अनुभवाला येते. असा अनुभव येणे हे हृदयाच्या गुहेपर्यंत पोहोचल्याचे लक्षण आहे. इथपर्यंतची वाटचाल त्या मानाने सोपी आहे. आता यापुढे मात्र वाटचाल कठीण आहे. त्यासाठी मोठे तपोबल हवे. शरणागती हवी. हे जमते तेव्हा एका विलक्षण तृप्तीचा, सुखाचा, समाधानाचा अनुभव येतो. या अनुभवालाच भक्ति रस म्हणतात. एकदा त्या रसाची गोडी चाखली की त्यापुढे इतर कोणत्याही सुखाची गोडी कमीच वाटते. आणि एकदा आनंदाने हृदयात प्रवेश केला की भय निभून निघून जाते. आनंद व भय यांच्यात कमालीचा विरोध आहे. एक आहे तिथे दुसरे राहू शकत नाही.

काळजी ही भीतीची कन्या आहे, म्हणून आपला जीव जसजसा आनंदाकडे जोड करून चालू लागेल तसतशी काळजी आपोआप कमी होते. आणि प्रत्यक्ष आनंदाचे दर्शन झाल्यावर तर भीती समूळ नाहीशी होते.

सा एषा आनन्दस्य मीमांसा भवति। युवा स्यात् साधु युवाध्यायकः। आशिष्ठः द्रढिष्ठः बलिष्ठः तस्य इयं पृथिवी सर्वा वित्तस्य पूर्णा स्यात्। स एको मानुषः आनन्दः।

आत्मानंदाची मीमांसा अशी आहे. समजा एक तरुण, शीलवान, तेजस्वी, विद्येचा महत्त्वाकांक्षी, दृढनिश्चयी आणि बलवान पुरुष आहे. त्याला पृथ्वीवरील सर्व संपत्ति भोगायला मिळाली तर त्याला जो आनंद होईल तो मानवी आनंद होय.

आनंद उपभोगण्यासाठी सर्व इंद्रिये सक्षम हवीत शिवाय तो सज्जन चारित्र्यवान हवा. वेदाध्ययन केलेला असावा. म्हणजे जीवनाचा खरा अर्थ त्याला समजेल. तो महत्त्वाकांक्षी असावा. शारीरिक, मानसिक, बौद्धिक बळ हवे.

Priority

विवेकचूडामणी - ३७ वा श्लोक
श्रोत्रिय अकामहत



8 am ते ये शतं मानुषा: आनन्दा: । स: एक: मनुष्य-गन्धर्वाणाम् आनन्द: । श्रोत्रियस्य चाकामहतस्य ।

9 असे शंभर मानवी आनंद मिळून मनुष्यगंधर्वांचा एक आनंद होतो. निष्काम आणि विद्वान आत्मज्ञान्याला

10 हा आनंद मिळतो.

गंधर्वांना माणसापेक्षा अधिक शक्ती मिळालेल्या

11 आहेत ते देवाहून कमी दर्जाचे असतात. मनुष्यजन्मात उत्तम कर्म केल्यावर गंधर्वांचा जन्म मिळू शकतो.

12 त्याला मनुष्य गंधर्व म्हणतात.

ज्या श्रोत्रियाला कुठल्याच भोगांची इच्छा नसते

1 pm त्याला हा आनंद स्वाभाविकपणे मिळत असतो. सर्वत्र ब्रह्म अनुभवणाऱ्याला काहीच कामना रहात नाही. तो

2 नेहमी संतुष्ट आनंदीच असतो.

3 ते ये शतं मनुष्यगन्धर्वाणाम् आनन्दा: स: एक: देवगन्धर्वाणाम् आनन्द: । श्रोत्रियस्य च अकामहतस्य ।

4

देवगंधर्व म्हणजे देवांसाठी गायन वादन करणारे,

5 त्याचसाठी जन्मलेले गंधर्व! ते पदोन्नती मिळून आलेले नाही तर जन्मजात गंधर्वच आहेत. मनुष्यगंधर्वांचे

6 शंभर आनंद म्हणजे देवगंधर्वांचा आनंद! निरिच्छ बद्ध जाणणाऱ्याला तो आनंद आपोआपच मिळत असतो.

7 ते ये शतं देवगन्धर्वाणाम् आनन्दा: स: एक: पितृणां चिरलोकलोकानाम् आनन्द: श्रोत्रियस्य च अकामहतस्य ॥

देवगंधर्वांचे शंभर आनंद एकत्र केले तर चिरस्थायी पितृलोक प्राप्त केलेल्या पितरांचा एक आनंद होतो.



© www.madhaveeraghuveer.com

उपसीदेद् गुरुं प्राज्ञं यस्माद् बन्धविमोक्षणम् ।
श्रोत्रियोऽवृजिनोऽकामहतो यो ब्रह्मवित्तमः ॥

(श्रोत्रियो — सर्व वेद वेदांग जाणणारा याज्ञवल्क्यासारखा; अकामहतो — निष्काम वरतंतूसारखा)

हे तिथेच वास्तव्य करणारे पितर आहे. पितर ही एक योनि आहे. कामना गळून पडलेल्या श्रोत्रियाला हा आनंद आपोआप मिळतो.

ते ये शतं पितृणां चिरलोकलोकानाम् आनन्दः स एकः अजानजानां देवानाम् आनन्दः। श्रोत्रियस्य च अकामहतस्य।

पितृलोकातील चिरस्थायी वास्तव्य करणाऱ्या पितरांच्या शंभर आनंदाइतका आनंद अजानज देवांचा असतो. पितृलोकावर अजान लोक आहे. तिथे जन्मलेले ते अजानज देव. श्रोत्रियाला या लोकातील भोगांचीही इच्छा असत नाही. तो निरिच्छ असल्याने तो आनंद त्याला स्वाभाविकपणे मिळतो.

ते ये शतम् अजानजानां देवानाम् आनन्दाः स एकः कर्मदेवानाम् आनन्दः ये कर्मणा देवान् अपियन्ति। श्रोत्रियस्य च अकामहतस्य।

अजानज देवांच्या शंभर आनंदाइतका कर्मदेवांचा एक आनंद असतो. जे उत्तम कर्म करून देवत्व प्राप्त करतात त्यांना कर्मदेव म्हणतात. पण अकामहत श्रोत्रियाला तो आनंद स्वाभाविकपणे मिळतो.

ते ये शतं कर्मदेवानां देवानामानन्दाः। स एको देवानाम् आनन्दः। श्रोत्रियस्य चाकामहतस्य।



© www.madhaveeraghuveer.com

22 SAT MAY 2010 | Priority

Wk 20, 142-223

**May 2010**

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 31 | | | | | 1 | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

8 am

ते ये शतं देवानामानन्दाः स एक इन्द्रस्यानन्दः। श्रोत्रियस्य चाकामहतस्य।

9

देवांचे शंभर आनंद मिळून इंद्राचा एक आनंद होतो

10 निष्काम आणि विद्वान आत्मज्ञान्याला हा आनंद होतो.

11

12

1 pm

2

3

4

5

6

7

© www.madhaveeraghuveer.com

स यश्चायं पुरुषे। यश्चासावादित्ये। स एकः।
सः यः एवंवित् अस्मात् लोकात् प्रेत्य एतम्
अन्नमयमात्मानम् उपसंक्रामति। एतम्
प्राणमयमात्मानम् उपसंक्रामति। एतं
मनोमयमात्मानम् उपसंक्रामति। एतं
विज्ञानमयमात्मानम् उपसंक्रामति। एतं
आनन्दमयमात्मानम् उपसंक्रामति।
तदप्येष श्लोको भवति।

हा आनंद जो माणसाच्या ठिकाणी आहे तोच सूर्याच्या ठिकाणी आहे. आनंद सर्व ठिकाणी एकच आहे. याप्रमाणे सर्वव्यापी आनंदाचे ज्ञान ज्याला होते तो मनुष्य मृत्युनंतर पंच कोशांच्या पलीकडे जाऊन आत्म्याशी एकरूप होतो. पुढील श्लोक याच अर्थाचा आहे.

इदम् म्हणून जे काही दिसते ते सर्व कशापासून निर्माण झाले? त्याला काहीतरी कारण असलेच पाहिजे. कार्यावरून कारणाचा बोध होतो. पाऊस पडताच कोरड्या जमिनीतून गवत उगवते, त्याअर्थी जमिनीत गवताचे बी असले पाहिजे. मग एवढ्या विशाल सृष्टीला सुद्धा काहीतरी व कोणीतरी कारण असलेच पाहिजे.

या सृष्टीचे उपादान कारण (कच्चा माल) व निमित्त कारण (बनवणारा) तो एकच आहे. त्या आत्म्यापासून आकाश, वायु, अग्नि, जल, पृथ्वी, औषधी, अन्न व अन्नापासून पुरुष निर्माण झाला. त्याच्यामुळेच श्वासोच्छ्वास, चलनवलन चालते. कार्यामुळे कारणाचा (दिसत नसले तरी) बोध होतो.

हे ज्याला समजते तो हेही जाणतो की जे व्यष्टि (व्यक्ति) मध्ये आहे तेच आदित्यामध्ये आहे.

परब्रह्म सत्यम् ज्ञानम् अनन्तम् आहे.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuvel.com

8 am सत्य म्हणजे अस्तित्व म्हणजेच आनंद. या जीवनाचा
आधार आनंदच आहे. आयुष्यात आपण जे काही करतो
9 ते केवळ आनंदासाठीच करत असतो. मात्र या आनंदाचे
काही स्तर आहेत. Levels

10 प्रथम आपण आनंदमयकोशालाच 'मी' समजतो
म्हणून शरीराला सुख देण्याचा विचार करतो [पुढे
11 ऐश्वर्य प्राप्त करण्याचा विचार करतो] हा पशुस्तरावरचा
आनंद आहे. नंतर स्वतःची करमणूक करून घेतो.
12 सख्यासोबत्यात रमतो, कलेची उपासना करतो, विज्ञानात
अभ्यासात रमतो, चारित्र्यसंपन्न असण्यात सुख मानतो

1 pm या आनंदाच्या श्रेणी आहेत. परंतु अंतिम शोध
घ्यायचा तो आनंदाचाच!

2 खरा आनंद हा बाह्य गोष्टींवर अवलंबून नसतो. तो
आतच आहे हे कळते तेव्हा आत उतरावेसे वाटते. जसजसे
3 आत आत शोध घ्यावा तसतसा अधिकाधिक आनंद
मिळू लागतो. आणि मग कितीही प्रतिकूल परिस्थिती
4 आली तरी हा आनंद ओसरत नाही. द्वंद्वाच्या पलीकडे
गेलेले संत-महंत हा आनंद मिळवतात. जपी-तपी प्राप्त करून
5 त्यांच्या आतमध्ये त्यांना आनंदस्वरूप परमात्म्याचे दर्शन होते.

मग आम्हाला का होत नाही? कारण आम्ही प्रपंचात
6 गुरफटलेले असल्याने आम्हाला तिथपर्यंत पोहोचता येत नाही.
आम्ही देहबुद्धीत अडकलेलो असल्याने सुखदुःख भोगत असतो.

7 संतांना मात्र 'आनंदाचे डोही आनंद तरंग' अशी
अनुभूति येते. त्यांचा आनंद वस्तुनिरपेक्ष, व्यक्तिनिरपेक्ष
असतो. त्यांचा आनंद पंचकोशांना व्यापून त्यापलीकडे
असतो. हा आनंद आतून उसळून असतो. त्यांना स्वतःचे
स्वरूप समजल्याने ते विश्वरूप होतात.

'विश्व होऊनी विचरे विश्वामाजी' केलेल्या आनंद
Birthday / Anniversary घेण्यासाठी परब्रह्माने विश्व निर्माण केले ते सर्व सीमा
ओलांडून असीम होऊन जातात.

१३ डिसेंबर ९७

## – नवम अनुवाक –

यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह। आनन्दं ब्रह्मणो विद्वान् न बिभेति कुतश्चनेति।

मन आणि वाणी जेथपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करून अप्राप्य म्हणून परत फिरतात त्या आत्मानंदाचा साक्षात्कार ज्याला होतो त्याला कसलेही भय उरत नाही. नेहमी मन अनुभव घेते आणि वाणी त्याचे वर्णन करते. परंतु इथे मात्र ब्रह्माचा अनुभव घेणारा ब्रह्माशी एकरूप होतो. तो वेगळेपणाने उरत नाही आणि द्वैताशिवाय व्यवहार होत नाही. इथे तर द्वैत शिल्लक नाही. म्हणून मनासह वाणी परत फिरते. अनुभव घेणारा असतो पण तो वेगळा उरत नाही. ब्रह्माशी एकरूप झाल्याने तो रसमय होऊन जातो. आनंदस्वरूप होऊन जातो. सत्यम् अनन्तम् ब्रह्म होतो. आणि त्यामुळेच त्याला कसलेही भय उरत नाही, जाणायचे काही शिल्लकच राहत नाही.

या ब्राह्मी स्थितीचे वर्णन करता येत नाही. कारण हा आनंद स्वसंवेद्य आहे.

एतं ह वाव न तपति। किमहं साधु नाकरवम्। किमहं पापं अकरवम् इति। स य एवं विद्वानेते आत्मानं स्पृणुते उभे ह्येवैष एते आत्मानं स्पृणुते। य एवं वेद इत्युपनिषत्

"मी चांगले कृत्य केले नाही" "मी पापकर्म केले" अशी शंका आत्मज्ञानी पुरुषाला ताप देत नाही. कारण आनंदरूप आत्म्याला जो जाणतो त्याचे सर्व कर्म आनंदरूप बनते. अशी ही रहस्यमय विद्या आहे.

| May 2010 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| 31 | | | | | 1 | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

ब्रह्मस्थितीला पोहोचलेला मनुष्य कोणताही मनस्ताप करून घेत नाही. सामान्य माणसाला पापपुण्याची चिंता असते. काही सत्कृत्य हातून घडले नाही किंवा मी असे करायला नको होते अशी चिंता त्याला सतत छळत असते. मात्र सत्यम् ज्ञानम् अनन्तम् ब्रह्माला जाणणारा मनुष्य अशा विचारांपासून अलिप्त राहू शकतो. तो परब्रह्माशी एकरूप झालेला असतो.

त्याला पुण्यकर्मांच्या फळस्वरूपाने मिळणारा स्वर्गही नको असतो किंवा पापकर्मांचे फळ जे नरक त्याचेही त्याला भय नसते. सर्व ब्रह्मांड तोच होतो. त्याला जन्ममृत्यूचेही भय उरत नाही.

परब्रह्माशी एकरूप झाल्यावर द्वंद्वे संपून जातात. ऊन उन्हाळा तापवत नाही. काटा काट्याला टोचत नाही. त्यामुळे पापपुण्याच्या वरवरच्या पापुद्र्याचा त्याच्यावर काही म्हणजे काही परिणाम होत नाही. तो नेहमी ब्रह्मस्थितीतच राहतो.

ही स्थिति प्राप्त करण्याचा मार्ग पुढील वल्लीत सांगितला आहे.

© www.madhaveerarchive.com

## — भृगु वल्ली —
## — प्रथम अनुवाक —

भृगुर्वै वारुणिः वरुणं पितरमुपससार अधीहि भगवो ब्रह्मेति । तस्मा एतत्प्रोवाच । अन्नं प्राणं चक्षुः श्रोत्रं मनो वाचमिति । तं होवाच । यतो वा इमानि भूतानि जायन्ते येन जातानि जीवन्ति । यत् प्रयन्ति अभिसंविशन्ति । तद् विजिज्ञासस्व । तद् ब्रह्मेति

वरुणाचा मुलगा भृगु आपल्या बापाकडे गेला. आणि म्हणाला — भगवन्, ब्रह्म म्हणजे काय ते मला सांगा. वरुणाने उत्तर दिले — अन्न, प्राण, चक्षु, श्रोत्र, मन आणि वाणी हेच ब्रह्म समज. तो पुढे म्हणाला —

ज्यापासून सर्व प्राणी उत्पन्न होतात, उत्पन्न झाल्यावर ज्याच्या सत्तेने जगतात आणि मेल्यानंतर ज्याच्यामध्ये विलीन होतात ते ब्रह्म होय. ते तू जाणून घे.

मागील वल्लीत ब्रह्माचे स्वरूपलक्षण सांगितले आता तिथपर्यंत कसे पोहोचायचे ते भृगुच्या उदाहरणावरुन स्पष्ट केले आहे.

वरुण ब्रह्मवेत्ते होते म्हणून भृगु त्यांच्याकडे गेला. ते वडीलांनी ब्रह्म जाणण्याची दारे सांगितली. परंतु तेवढ्यावरुन भृगुला काहीच समजले नाही. तेव्हा त्याने ब्रह्म निश्चितपणे ओळखण्याची खूण विचारली असे खुणेला तटस्थलक्षण म्हणतात. ते म्हणजे —

ज्यापासून सर्व भूते निर्माण होतात, ज्याच्या आधाराने ही सर्व भूते जगतात व ज्याच्यात विलीन होतात ते तत्व तू जाणून घे. तेच ब्रह्म आहे.

तेव्हा भृगुने तप (सूक्ष्म चिंतन) केले.

| May 2010 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| 31 | | | | | 1 | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

स तपोऽतप्यत। स तपस्तप्त्वा। अन्नं ब्रह्मेति व्यजानात्। अन्नात् हि एव खलु इमानि भूतानि जायन्ते। अन्नेन जातानि जीवन्ति। अन्नं प्रयान्ति अभिसंविशन्ति इति। तद् विज्ञाय पुनरेव वरुणं पितरम् उपससार। अधीहि भगवो ब्रह्म इति। तं ह उवाच। तपसा ब्रह्म विजिज्ञासस्व। तपो ब्रह्म इति। स तपोऽतप्यत। स तपस्तप्त्वा।

नंतर भृगुने ब्रह्मज्ञानासाठी तप केले (सूक्ष्म चिंतन केले.) तप केल्यावर अन्न हेच ब्रह्म होय असे त्याला ज्ञान झाले. कारण अन्नापासून सर्व प्राणी उत्पन्न होतात उत्पन्न झाल्यावर अन्नानेच जगतात आणि मेल्यावर अन्नामध्ये विलीन होतात.

ही सर्व लक्षणे अन्नामध्ये आहेत त्यामुळे अन्न हेच ब्रह्म असावे. अन्नानेच सप्त धातु निर्माण होतात. त्यातील वीर्याने प्राण्याचा जन्म होतो. अन्न खाऊनच तो पुष्ट होतो, जगतो आणि शेवटी अन्न देणाऱ्या पृथ्वीतच तो विलीन होतो. म्हणजेच अन्न म्हणजे ब्रह्म!

तो आनंदाने वडिलांकडे गेला. आपले विचार त्यांना सांगितले. वडील काहीच बोलले नाहीत. परंतु मनात म्हणाले, अजून हा स्थूलात अडकलेला आहे.

वडील बोलत नाहीत हे पाहून त्याला सत्य उमगले. अन्न हे ब्रह्म नाही कारण ते त्रिकालातीत सत्य नाही. ते निर्माण होते आणि त्याला शेवटही आहे. ते ज्ञानयुक्त नाही. तेव्हा ब्रह्माचे स्वरूपलक्षण त्याला लागू पडत नाही. तेव्हा त्याने पुन्हा वडिलांना विनंति केली — 'ब्रह्माचा उपदेश मला करा.' वडील म्हणाले 'पुन्हा तप कर.'

भृगु तपश्चर्येला बसला. अंतर्मुख होऊन एकाग्रतेने विचार करू लागला.

© www.maharaghuveer.com

Birthday / Anniversary

## – तृतीय अनुवाक –

प्राणो ब्रह्म इति व्यजानात्। प्राणात् हि एव खलु इमानि भूतानि जायन्ते। प्राणेन जातानि जीवन्ति। प्राणं प्रयन्ति अभिसंविशन्ति इति। तत् विज्ञाय पुनरेव पितरम् उपससार। अधीहि भगवो ब्रह्म। तं ह उवाच। तपसा ब्रह्म विजिज्ञासस्व। तपो ब्रह्म इति। स तपोऽतप्यत। स तपस्तप्त्वा।

भृगुने विचार केला — त्याने अधिक तप केले. त्यातून त्याला प्राण हे ब्रह्म आहे असे ज्ञान झाले. प्राणापासून सर्व प्राणी निर्माण होतात. उत्पन्न झाल्यावर प्राणानेच जगतात आणि मेल्यावर प्राणामध्येच विलीन होतात.

मूल जन्माला येते तेव्हा श्वास घेऊन ते रडू लागते. तेव्हा आपण जन्माचा आनंद साजरा करतो. श्वास घेत घेत माणूस जगतो आणि शेवटी श्वास प्राणातच विलीन होतो. जीव वायूशी एकरूप होतो.

चित्शक्ति प्राणाबरोबर येते व प्राणांबरोबर जाते. त्याच्या अस्तित्वाची खूण म्हणजे श्वास! जीवन हे श्वासापासून (अंतिम) श्वासापर्यंत असते. श्वास थांबला की सारे संपले.

एका सचेतनापासून दुसरा सचेतन निर्माण होतो म्हणजे निर्मिती ही प्राणशक्तीमुळेच शक्य होते.

तो आनंदाने वडिलांकडे आला. प्राण म्हणजेच ब्रह्म! त्यातूनच प्राणी निर्माण होतात, त्यानेच जगतात व शेवटी त्यातच विलीन पावतात.

त्यावर वडील पुन्हा गप्प बसले; परंतु स्थूलाकडून सूक्ष्माकडे त्याची प्रगति पाहून काहीसे सुखावले. परंतु भृगुने विचार केला प्राणांना उत्पत्ति आहे म्हणजे नाशही आहे, म्हणजे हे ब्रह्म नाही. पुन्हा वडिलांना म्हणाला, मला उपदेश करा.



© www.madhaveeragniveer.com

## - चतुर्थ अनुवाक -

मनो ब्रह्म इति व्यजानात्। मनसः हि एव खलु इमानि भूतानि जायन्ते। मनसा जातानि जीवन्ति। मनः प्रयन्ति अभिसंविशन्ति इति। तत् विज्ञाय पुनः एव वरुणं पितरम् उपससार। अधीहि भगवः ब्रह्म इति। तं ह उवाच। तपसा ब्रह्म विजिज्ञासस्व। तपो ब्रह्म इति। सः तपः अतप्यत। स तपस्तप्त्वा।

भृगुने अधिक तप (सखोल चिंतन) केले. तप केल्यानंतर "मन हे ब्रह्म आहे" असे ज्ञान त्याला झाले. मनापासून सर्व प्राणी उत्पन्न होतात. उत्पन्न झाल्यावर मनानेच जगतात. आणि मेल्यावर मनातच विलीन होतात.

अन्न व प्राण दोन्ही जड आहेत. त्यापेक्षा मन सूक्ष्म आहे. आपण सर्व कामे मनानेच करतो. मन थाऱ्यावर नसेल तर समोरची गोष्ट दिसत नाही. कान असून ऐकू येत नाही. मनाने दिलेल्या प्रेरणेमुळेच सर्व इंद्रिये काम करतात. मनच स्वप्नांची दुनिया उभी करते. मन म्हणजेच इच्छा, कामना, वासना। मृत्युसमयी जीव त्यांच्यासह बाहेर पडतो व त्यानुसारच अनुकूल परिस्थिती मिळताच नवीन जन्म घेतो. तेव्हा मन हे सर्वात प्रमुख आहे ∴ मन हेच ब्रह्म आहे.

हे निश्चितपणे कळल्यावर तो पुन्हा वडिलांकडे गेला. म्हणाला मला ब्रह्म कळले. मन म्हणजेच ब्रह्म!

याही वेळेला वडील काहीच बोलले नाहीत. तेव्हा यानेही विचार केला की खरोखर मन हे चंचल आहे त्याला उत्पत्ति आहे तसा नाशही आहे. म्हणजे ब्रह्माचे लक्षण त्याला लागू होत नाही. वडील म्हणाले, अरे ब्रह्म असे दाखवता, सांगता येत नाही, जा व आणखी तप कर. तप करूनच तुला ते अनुभवता येईल.

भृगु पुन्हा तपश्चर्येत बसला.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

२४ डिसेंबर २०१६

– पञ्चम अनुवाक –

8 am

विज्ञानं ब्रह्म इति व्यजानात्। विज्ञानात् हि एव खलु इमानि भूतानि जायन्ते। विज्ञानेन जातानि जीवन्ति। विज्ञानं प्रयन्ति अभिसंविशन्ति इति। तत् विज्ञाय पुनः एव वरुणं पितरम् उपससार। अधीहि भगवो ब्रह्म इति। तं ह उवाच तपसा ब्रह्म विजिज्ञासस्व। तपः ब्रह्म इति। सः तपः अतप्यत। सः तपः तप्त्वा।

भृगुने अधिक तप केल्यावर त्याला वाटले की विज्ञान म्हणजे बुद्धि हे ब्रह्म आहे. विज्ञानापासूनच सर्व प्राणी उत्पन्न होतात. उत्पन्न झाल्यावर विज्ञानाने जगतात. आणि मेल्यावर विज्ञानामध्ये विलीन होतात.

मनाला प्रेरणा देणारी बुद्धी ही निश्चितच मनापेक्षा सूक्ष्म आहे. कारण मनात काही संकल्प येण्यापूर्वी काहीतरी समजावे लागते. त्यासाठी बुद्धी हवी. जाणीव, चैतन्य हे मनाच्याही मागे आहे.

जाणीव चिद्रूप आहे —— दासबोध –

त्यामुळे ही जाणीव (विज्ञान) महत्त्वाची! जाणीवेतूनच जीव जन्म घेतात, जगतात व जाणीवेतच विलीन होतात.

भृगुला वाटले आपल्याला कोडे उलगडले उत्तर मिळाले. तो आनंदाने वडीलांकडे गेला व म्हणाला, विज्ञान हेच ब्रह्म आहे. वडील काहीच बोलले नाहीत. कारण ब्रह्माच्या बाबतीत कळणे न कळणे असे काहीच नसते. आणि ब्रह्म तर सदा वर्तमान आहे. ते नाही असे कधीच होत नाही आणि गाढ झोपेत तर विज्ञान (जाणीव) नसते.

म्हणून विज्ञान म्हणजे ब्रह्म नव्हे.

तेव्हा भृगुने पुन्हा तप केले.

© www.madhaveeraghuveer.com

1 TUE JUN 2010

Wk 22, 152-213

Priority

– षष्ठ अनुवाक –

आनन्दो ब्रह्म व्यजानात् । आनन्द्यात् हि एव खलु इमानि भूतानि जायन्ते । आनन्देन जातानि जीवन्ति । आनन्दं प्रयान्ति अभिसंविशान्ति इति । सा एषा भार्गवी वारुणी विद्या परमे व्योमन् प्रतिष्ठिता । स य एवं वेद प्रतितिष्ठति । अन्नवान् अन्नादो भवति । महान् भवति प्रजया पशुभि: ब्रह्मवर्चसेन । महान् कीर्त्या ।

भृगुने अधिक तप केल्यावर 'आनंद हे ब्रह्म आहे' असे ज्ञान त्याला झाले. आनंदापासून सर्व प्राणी उत्पन्न होतात. उत्पन्न झाल्यावर आनंदानेच जगतात. मेल्यावर आनंदामध्ये विलीन होतात. अशी ही वरुणाने भृगुला सांगितलेली भृगुने जाणलेली विद्या आहे. ही अत्यंत सूक्ष्म अशा हृदयाकाशामध्ये स्थित आहे. जो कोणी भृगुप्रमाणे तप आचरण करून आनंदाचा अनुभव घेतो तो ब्रह्माच्या ठिकाणी स्थित होतो. तसेच तो अन्नाने समृद्ध होतो. अन्नाचा उपभोग घेऊ शकतो. प्रजा पशु व ब्रह्मतेज यांनी तो थोर होतो. मोठी कीर्ति मिळवतो.

विज्ञानाच्या मागे आनंद आहे. आनंद हेच सर्वांचे मूळ आहे. आनंद हेच ब्रह्म आहे. त्याने हे विश्व क्रीडेसाठी आनंदासाठी निर्माण केले. आनंदातूनच हा विश्वाचा पसारा निर्माण झाला. माणूस जे काही करतो ते आनंदासाठीच. जगण्यातही आनंद आहे आणि शेवटी मिळून आलो त्यात विलीन होतो. कार्य नेहमीच कारणात विलीन होते.

सोन्याचे अलंकार मोडले की उरते ते निव्वळ सोने! मातीचे घर, पणती, कुंडी फुटून शेवटी मातीच उरते. मूळ कारणात विलीन होणे म्हणजे मृत्यु आणि मूळ कारणापासून अलग होणे म्हणजे जन्म! हा एकरूपतेचा आनंद मिळवणे हे जीवनाचे ध्येय आहे.

Birthday / Anniversary

मरणं प्रकृतिः शरीराणाम् जीवनं तस्य विकृतिः ।

© www.madhavaveeraghuveer.com

आतील चित्त आनंदस्वरूपच असते. सुखदुःखाचे लेप या अहंच्या कवचाला असतात. ते लेप कवच असेपर्यंतच टिकतात. कवच गळून पडल्यावर शुद्ध चिदानंद आहे.

तपाने, ध्यानाने भृगु पंचकोश ओलांडून आतपर्यंत पोहोचला. आपण सर्वही सूक्ष्म चिंतनाने तिथे पोहोचू शकतो.

स्थूल देह हा जड असून पंचमहाभूतांनी - पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश - बनलेला आहे. त्याला चालवणारा सूक्ष्म देह पंचवीस तत्त्वांचा बनला आहे.

आकाश — अंतःकरण, मन, बुद्धी, चित्त, अहंकार
अंतःकरण पंचक

वायु - व्यान, समान, उदान, प्राण व अपान
प्राण पंचक

तेज - श्रोत्र, त्वचा, चक्षु, जिव्हा, घ्राण
ज्ञानेंद्रिय

आप - वाचा, हात, पाय, शिस्न व गुद
कर्मेंद्रिय

पृथ्वी - शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध
विषय पंचक.

स्थूलदेह - अन्नमय कोश
सूक्ष्मदेह - प्राणमय, मनोमय, विज्ञानमय कोश
पाचवा आनंदमय कोश आहे.
प्रिय, मोद, प्रमोद या वृत्तींनी आनंद होतो.

भृगुने आनंद स्वरूप ब्रह्माचा अनुभव घेतला ∴ भार्गवी वारुणी विद्या म्हणतात.

प्रत्येकाच्या हृदयात परमाकाशात ही विद्या असते परंतु पाच कोशांनी झाकल्यामुळे तिचे खरे रूप उमगत नाही. परंतु या पाच कोशांचे अस्तित्व कळले. मी त्याच्या पलीकडे आहे. मी म्हणजे पंचकोश नाही हे समजले की आत्मस्वरूप आपोआपच समजते.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

Priority विहित कर्म मी नित्य करावे
आस नसो चित्ती।
निरिच्छ मानस तरीही असावी
उल्हासित वृत्ती।



8 am ते ज्याचे त्यालाच कळते. कारण ते स्वसंवेद्य आहे.
मात्र अशा व्यक्ती फारच थोड्या असतात
9 मनुष्याणां सहस्त्रेषु - - - - - - वेत्ति तत्त्वतः।
मात्र ज्याला हा अनुभव येतो त्याला आध्यात्मिक
10 लाभ तर होतोच. परंतु त्याचबरोबर भौतिक सुखेही
मिळते. श्रेयसाबरोबर प्रेयसही मिळते.
11 आपली अशी गैरसमजूत आहे की अध्यात्मातील
माणसाने दरिद्री असावे. गंभीर चेहरा करून सर्व
12 सुखे दूर सारावीत. वस्तुस्थिति अशी नाही.
ज्याला आत्मसाक्षात्कार झाला त्याला जगात
1 pm प्रतिष्ठा मिळते. आदर, सन्मान, कीर्ति मिळते. त्याला
विपुल अन्न, धनधान्य प्राप्त होते. नुसते मिळत नाही
2 तर तो अन्नाद (अन्न खाणारा) होतो. त्याच्याजवळ
भोगही असतात शिवाय भोगण्याची क्षमताही असते.
3 मुलबाळे, धनधान्य, पशुमते, नोकरचाकर या सर्वांनी
तर तो समृद्ध होतोच परंतु त्याहीपेक्षा महत्वाचे
4 म्हणजे तो ब्रह्मतेजाने झळाळत असतो.
श्री वर्चस्वमायुष्यमाविधा - - - - - -
5 या सृष्टीतील कोणतेही भोग वाईट नाहीत. मात्र
ते धर्म्य असावे (धर्माला अविरुद्ध म्हणजे अनुकूल)
6 सर्वांनी वाटून घ्यावे. - - - तेन त्यक्तेन भुञ्जीथाः
त्यागात आनंद आहेच. परंतु आत्मज्ञानी
7 पुरुषाने त्या भोगातील व्यर्थ जाणलेले असते
त्यामुळे ते त्याचा सीमित उपभोग घेतात परंतु त्यात
अडकत नाहीत. आसक्त होत नाहीत. मात्र याचा
अर्थ ते रुक्ष नसतात. ते प्रत्येक गोष्टीत ब्रह्मच
पाहतात. ब्रह्मरसाचाच आस्वाद घेतात. ते नित्य
संतुष्ट असतात. द्वंद्वातीत असतात. मिळाले किंवा
Birthday / Anniversary न मिळाले तरी त्यांचे समाधान भंगत नाही.

© www.madhaveeraghuveer.com

## — सप्तम अनुवाक —

अन्नं न निन्द्यात् । तद् व्रतम् । प्राणो वा अन्नम् । शरीरम् अन्नादम् । प्राणे शरीरं प्रतिष्ठितम् । शरीरे प्राणः प्रतिष्ठितः । तद् एतद् अन्नम् अन्ने प्रतिष्ठितम् । स य एतद् अन्नम् अन्ने प्रतिष्ठितम् वेद प्रतितिष्ठति । अन्नवान् अन्नादो भवति । महान् भवति । महान् भवति प्रजया पशुभिः ब्रह्मवर्चसेन । महान् कीर्त्या । [ शरीर व प्राण ]

अन्नाची निंदा करु नये. हे व्रत धारण करावे. प्राण हे अन्न आहे तर शरीर हे अन्नाचा उपभोग घेणारे आहे. प्राणावर शरीर अवलंबून आहे आणि शरीरावर प्राण अवलंबून आहे. दोघांचा परस्परांस आधार आहे हे जो जाणतो तो स्थिर होतो. तो संपत्तिमान होऊन (अन्नाने समृद्ध होऊन) संपत्तीचा उपभोग घेतो. संतति, पशु आणि ब्रह्मतेज यांनी मोठा होऊन कीर्तिमान होतो.

निंदा करत, नावे ठेवत खाल्लेल्या अन्नाने कधीच तुष्टि मिळत नाही. उलट त्याने त्रास होतो. अन्न हे प्रसाद समजून खा. त्यातून अमृतासमान पुष्टि व तुष्टि मिळते. आध्यात्मिक दृष्ट्या अन्न हे ब्रह्माने धारण केलेले रुपच आहे. त्यामुळे त्याचा आदर करायला हवा. ते व्रत म्हणून स्वीकारायला हवे.

जे जे ग्रासले जाते, भोगले जाते ते ते सर्व अन्नच आहे. त्या दृष्टीने पाहिले तर या विश्वातील प्रत्येक गोष्ट अन्नच आहे. कुणी ना कुणी तरी ते भोगत असतेच.

असा विचार करु लागलो तर प्राण हे शरीराचे अन्नच आहे. कारण शरीर हे प्राणांना गिळते, सामावून घेते. प्राण आहेत तोपर्यंत देह सजीव आहे.

© www.madhaveeraghuveer.com

| June 2010 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| 28 | 29 | 30 | | | | |

प्राण नसतील तर तेच शरीर प्रेत होते. त्याची माती होते. परंतु शरीर देखील महत्त्वाचेच आहे कारण नाहीतर प्राण कुठे राहिले असते? म्हणूनच प्राण व शरीर दोन्ही एकमेकांवर अवलंबून आहेत.

म्हणूनच अन्नावर अन्न प्रतिष्ठित आहे. आश्रयलेले, अवलंबून आहे. यातून एक महत्त्वाचा सिद्धांत समोर येतो.

या सृष्टीतील काहीही स्वतंत्र नाही. सारेच कशावर तरी अवलंबून आहे. सर्व गोष्टी परस्परांशी निगडित आहेत, बांधलेल्या आहेत. हे एकत्वाचे ज्ञान ज्याला होते तो कधीच स्वार्थीपणाने वागू शकणार नाही.

पशु, पक्षी, हवा, पाणी या सर्वांवर माझे जीवन जसे अवलंबून आहे तसेच माझ्यावर त्यांचे जीवन ठरणार आहे. ते संतुष्ट असतील तर मी संतुष्ट राहणार आहे. विश्वाच्या या एकत्वाची, साकल्याची ज्याला जाणीव होते तो कधीच विश्वाच्या यंत्राला खीळ बसेल असे वागणार नाही.

एखादा लहानसा स्क्रू देखील अवाढव्य यंत्रामध्ये अडथळा आणू शकतो. परंतु ज्याने त्याने आपले काम (कितीही लहान, क्षुद्र असले तरी) चोख केले तरच हे सृष्टिचक्र सुरळीत चालेल. जो या विश्वाचा ताल सांभाळणार नाही त्याचा ताल व तोल नीट राहणार नाही. अशा माणसाला गीता व्यर्थ जगणारा, अघायु, इंद्रियात रमणारा असे म्हणते. अशी माणसे आपल्या पोळीवर तूप ओढून घेणारी व पर्यावरण दूषित करणारी असतात. त्यामुळे समाजहिताची हानी होते. आणि जो या तालाशी ताल मिळवतो त्याचे जीवन सफल होते.

या पारमार्थिक लाभाबरोबरच व्यावहारिक फायदा सुद्धा आहे. त्याला भरपूर अन्न तर मिळतेच परंतु ते खाऊन पचवणारे सामर्थ्य शरीरही त्याला लाभते. भोग घेण्याची क्षमता त्यात असते. विश्व आणि व्यक्ती यात भेद वाटेनासा होतो की त्याचे वागणे प्रेमाचेच असेल. समाजासाठी

July 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

Priority

SUN JUN 6 2010

Wk 22, 157-208

जीवने यावदादानं स्यात प्रदानं ततोऽधिकम् ।
इत्येषा प्रार्थनाऽस्माकं भगवन् परिपूर्यताम् ।

8 am तो झीज सोसेल. जनहितार्थ कामे करण्यात त्याचा पुढाकार असेल. साहजिकच तो समाजात हवाहवासा
9 वाटेल. लोक मनापासून त्याचा आदर करतील. त्याची कीर्ति सर्वदूर पसरेल. त्याचा लोकसंग्रह वाढेल. या
10 सर्वाच्या मागे लहानसा परंतु महत्त्वाचा विचार आहे तो म्हणजे अन्नाची किंवा कुठल्याही गोष्टीची निंदा करायची
11 नाही. ती वस्तू, व्यक्ती, पदार्थ ब्रह्म आहे असे मानून त्याचा आदरच करायचा. Respect others!

12

- अष्टम अनुवाक -

1 pm अन्नं न परिचक्षीत । तद् व्रतम् । आपो वा अन्नम् । ज्योतिरन्नादम् । अप्सु ज्योतिः प्रतिष्ठितम् । ज्योतिष्यापः
2 प्रतिष्ठिताः । तदेतदन्नमन्ने प्रतिष्ठितम् । स य एतदन्नमन्ने प्रतिष्ठितं वेद प्रतितिष्ठति ।
3 अन्नवानन्नादो भवति । महान् भवति प्रजया पशुभिर्ब्रह्मवर्चसेन । महान् कीर्त्या ।

[आप व तेज]

4

अन्नाला त्याज्य मानू नये. (नाही म्हणू नये) हे
5 व्रत धारण करावे. पाणी हेच ~~तेज~~ अन्न, तेज हे अन्नाद आहे. पाण्यावर तेज अवलंबून आहे. तेज पाण्याचा आधार
6 आहे. दोघांचा परस्परांस आधार आहे हे जो जाणतो तो स्थिर होतो. तो संपत्तिमान होऊन संपत्तीचा उपभोग
7 घेतो. संतति, पशु आणि ब्रह्मतेज यांनी मोठा होऊन कीर्तिमान होतो.

आज आम्ही अन्नाला नाही म्हटले आणि उद्या जर अन्नाने आम्हाला नाही म्हटले तर काय होईल? अन्नाचा आदर करा. अगदी नको असले तरी थोडे घ्या, थोड्या वेळाने घ्या, ठेवून घ्या आणि अगदीच त्याज्य असेल तरी त्याला नमस्कार करून नाही म्हणा. अनादर मात्र कधीही करू नका.

Birthday / Anniversary

©www.madhaveeraghuveer.com

प्राण आपोमय आहेत. आप हे अन्न आहे तर ज्योती अन्नाद आहे. तहान लागल्यावर पाणी पिणे म्हणजे पाण्याचे तेजात विलीन होणे आहे. तहान लागणे म्हणजे शरीराच्या समतोलासाठी पाण्याची कमतरता असणे याची सूचना आहे.

पाण्यात तेज आहे म्हणूनच पाणी कोमट असते. जिवंत शरीराला पाणी (आप) व तेज (ज्योती) दोन्हींची आवश्यकता असते. शरीरातील पाणी संपले तर Dehydration होते. तेव्हा जीवाला धोका असतो.

अन्न हे परस्परांवर अवलंबून आहे, हे ज्याला समजते, त्याला विश्वाच्या एकात्मतेचे ज्ञान होते. असा ज्ञानी बुद्धीने स्थिर होतो. प्रजा व पशु यांनी समृद्ध होतो. त्याला ब्रह्मतेज प्राप्त होते. त्याची कीर्ती दूरवर पसरते. समाजात त्याला मान मिळतो.

— नवम अनुवाक —

अन्नं बहु कुर्वीत । तद् व्रतम् । पृथिवी वा अन्नम् ।

[पृथ्वी व आकाश]

अन्न पुष्कळ संपादन करावे हे व्रत धारण करावे. पृथ्वी हेच अन्न, आकाश हे अन्नाद आहे. पृथ्वीवर आकाश अवलंबून आहे. आकाश हा पृथ्वीचा आधार आहे. दोहोंचा परस्परांना आधार आहे हे जो जाणतो तो स्थिर होतो. तो संपत्तिमान होऊन संपत्तीचा भोग घेतो. संतति, पशु आणि ब्रह्मतेज यांनी मोठा होऊन मोठा कीर्तिमान बनतो.

Birthday / Anniversary

१६ डिसेंबर ९८

पूर्वीची समाजव्यवस्था लक्षात घेऊन हे व्रत सांगितले आहे. पूर्वी शिजवलेले अन्न विकले जात नसे. खाणावळी, हॉटेल्स नव्हती. पायी प्रवास करावा लागे. अशा वेळी कुठेतरी मुक्काम करावा लागे. तेव्हा गृहस्थ अशा वाटसरूंची जेवणाची, स्नानाची मुक्कामाची व्यवस्था करीत असे. जात, धर्म न विचारता 'अतिथि देवो भव' या भावनेने सन्मानाने अतिथीला जेवू घालत असे. अतिथि पंगतीला असणे हा गृहस्थाला सन्मान वाटत असे.

अशा वेळी केवळ घरातल्या लोकांपुरतेच शिजवून कसे चालेल? अन्नातून अधिक लोकांना सामावून घेता आले म्हणजे गृहस्थ-गृहिणींना आनंद वाटत असे. म्हणून अन्न भरपूर शिजवावे असा उपनिषदांचा आदेश आहे.

पृथ्वी व आकाश ही जोडी आहे. आपल्या धारण करणारी पृथ्वी हे अन्न आहे आकाश हे अन्नाद आहे. कारण आकाश हे पृथ्वीला धारण करते. आकाश हे पृथ्वीला सामावून घेते हे जरी खरे असले तरी पृथ्वी हा आकाशाचा आधार आहे. आकाश पृथ्वीवर प्रतिष्ठित आहे. ग्रह, तारे यांचे अंतर पृथ्वीपासूनच मोजले जाते.

म्हणजेच अन्न दुसऱ्या अन्नावर अवलंबून आहे. विश्वातील एकता परावलंबित्व ज्याला कळले तो कधीच एकांगी विचार करणार नाही. साकल्याने विचार करेल. अर्थातच तो अन्नाद बनेल. त्याला अन्नाची कमतरता कधीच भासणार नाही. त्याला भरपूर संतति, पशुधन प्राप्त होईल. त्याचे ब्रह्मवर्चस उजळेल. तो कीर्तिमान होईल. समाजात प्रतिष्ठा प्राप्त होईल. त्याचा लोकसंग्रह वाढेल.

© www.madhaveeraghuveer.com

## - दशम अनुवाक -

8 am न कंचन वसतौ प्रत्याचक्षीत। तद् व्रतम्।
तस्माद् हि यया कया च विधया बहु अन्नं
9 प्राप्नुयात्। आराधि अस्मै अन्नम् इति आचक्षते।
एतद् वै मुखतः अन्नं राद्धम्। मुखतः अस्मै अन्नं
10 राध्यते। एतद् वै मध्यतः अन्नं राद्धम्। मध्यतः
अस्मै अन्नं राध्यते। एतद् वै अन्ततः अन्नं राद्धम्
11 अन्ततः अस्मै अन्नं राध्यते। य एवं वेद।

12 आपल्या घरी वसतीकरता आलेल्या कोणालाही
आश्रय नाकारू नये. हे व्रत धारण करावे. म्हणून
1 pm कोणत्याही योग्य रीतीने पुष्कळ अन्न संपादन करावे.
आश्रयाला आलेल्या पुरुषासाठीच हे अन्न तयार केले
2 आहे, असे ज्ञानी पुरुष म्हणतात.
हे अन्न आश्रयासाठी आलेल्या माणसा करता
3 चांगल्या बुद्धीने संपादन केले तर त्याचे चांगले फळ
मिळते. मध्यम बुद्धीने केले तर मध्यम बुद्धीचे
4 फळ मिळते आणि हीन बुद्धीने केले तर हीन फळ
मिळते. हे जो जाणतो, त्याला तशीच फलप्राप्ति होते.
5 तत्त्व - अध्यात्मसाधनेमध्ये अन्नाला फार महत्त्व आहे.
अतिथिचे स्वागत करणे हा गृहस्थाचा धर्म आहे.
6 आलेला अतिथि म्हणजे देवाचेच रूप असते. तो तृप्त
झाला तर त्याच्या आशिर्वादाने गृहस्थाला सर्व काही
7 मिळत असते. मात्र तो असंतुष्ट होऊन गेला तर यजमानाचे
सर्व पुण्य त्याच्याबरोबर जाते. घरादारावर आपत्ती येऊ
शकते. [कठोपनिषद - यम - नचिकेत - ३ दिवस उपाशी]
अतिथि सत्कारासाठीच वैध, धर्म्य मार्गाने खूप अन्न
प्राप्त करा. स्नान, वस्त्र, बिछाना, भोजन आदराने द्यावे.
आपल्यासाठी भोजन तयार आहे असे आदराने म्हणावे.



© www.medhaveeraghuveer.com

8 am जो अतिथिला विशेष आदराने जेवायला वाढत नाही
तो जिथे जाईल तिथे त्याला त्याच पद्धतीने अन्न
9 मिळेल. पेरावे तसे उगवते. हे ज्याला कळते तो कधीच
दुसऱ्यांना दुःख करणार नाही. चांगलेच वागेल.
10 अशा माणसाचे सर्वत्र स्वागत होईल. समाजात मान मिळेल.

ज्या घरामध्ये, मंदिरामध्ये किंवा संस्थेमध्ये अन्नदान
11 चालू असते त्याच्या आसपास आत्मज्ञानी पुरुष असलाच
पाहिजे हा संतमाहात्म्याचा एक ठळक पुरावा आहे.

12 मानवी जीवनात अन्नाला जे महत्व आहे त्याच्या
दसपट महत्व अध्यात्मसाधनेत आहे.

1 pm म्हणून साधकाने आपल्या नित्याच्या आहाराविषयी
काही नियम पाळलेच पाहिजेत

१. अन्नाला नावे ठेवू नयेत.
2 २. आपल्याला न आवडणारा पदार्थ अधिक मागू नये.
3 ३. परंतु त्याच्यात दोष पाहू नये.
४. अन्नाला कधी नाही म्हणून अनादर करू नये
4 ५. मात्र प्रकृतिला बाधक वा अधर्म्य असेल तर
निश्चयाने परंतु आदराने नकार द्यावा.
5 ६. परंतु तरीही कोणी खऱ्या प्रेमाने आग्रह केला तर
थोड्याचा योग्य स्वीकार करून ते आदराने ग्रहण करावे
6 ७. जे खाणार आहोत ते प्रथम मनाने देवाला अर्पण करावे.
८. अभक्ष्य, अपेयपान टाळावे.
7 ९. अन्नदात्याबद्दल कृतज्ञता असावी.
१०. परिस्थितीच्या मर्यादा सांभाळून आपल्याला
जितके शुद्ध अन्न (चांगल्या वासनेच्या माणसाने
चांगल्या वस्तु वापरून, चांगल्या तऱ्हेने दिलेले)
मिळेल तितके साधनाला अर्थात अंतःकरण शुद्ध
होण्याला उपयोगी पडेल.

Birthday / Anniversary

© www.madhaveeradhuveer.com

8 am सध्याच्या काळात हे सर्व पूर्णपणे पाळणे शक्य
नाही. तेव्हा निदान अन्न सेवन करण्यापूर्वी भगवंताचे
9 स्मरण करून प्रार्थना करावी. हे निषिद्ध अन्न सुद्धा
मी तुझा प्रसाद म्हणून घेत आहे तेव्हा त्यामुळे
10 माझी वासना बिघडू देऊ नकोस. मनापासून अशी
प्रार्थना केल्यास त्या अन्नाचा आपल्या बुद्धीवर विपरीत
11 परिणाम होणार नाही.

अन्नाचा बुद्धीवर निश्चितपणे सूक्ष्म परिणाम होतो.
12 नांदेड - अप्पाराव कुळकर्णी - मोगलाई मध्ये मामुली
नोकरी, प्रपंच मोठा तरीही साधक वृत्तीने राहत असत.
1 pm पंढरीच्या वारीत - श्रीमंत सावकाराकडे मुक्काम -
भोजनाचा उत्तम बेत - विश्रांति घेत असताना
2 दिवाणखान्यातील चांदीचा पेला घ्यावा अशी हीन भावना
तेव्हा सचैल स्नान करून भगवन्नामाचा गजर केला.

3 तेव्हा प्रत्येक माणसाने आपल्या व्यवहाराच्या
मर्यादा सांभाळून आहाराचे धोरण ठरवावे.

4 प्रापंचिक माणसाच्या हातून थोडे तरी अन्नदान
झाले पाहिजे. हे म्हणणे तारतम्याने घ्यावे. आपण
5 घरी शिजवत असलेल्या अन्नामध्ये इतरांही वाटेकरी
आहेत याची जाणीव सतत असावी.
6 पूर्ण भोजन - एखादा पदार्थ - फळ - खडीसाखर - गोळी
किंवा गार पाणी प्रेमादराने द्यावे.

7 त्यामुळे आपल्या मनाची वृत्ति उदार होत जाते
आणि अशा वृत्तिने अध्यात्ममार्गात लवकर प्रगति होते.
सत्पुरुषांच्या घरचे अन्न अत्यंत शुद्ध बुद्धीने दिलेले
असल्याने त्याला कधी नाही म्हणू नये. ते अन्न खाल्ल्याने
बुद्धी व साधनात स्थिर व्हायला मदत होते. म्हणून
साधकाने सत्पुरुषाच्या घरचे अन्न मागून घ्यावे. खावे.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

क्षेम इति वाचि। योगक्षेम इति प्राणापानयोः। कर्मेति हस्तयोः। गतिरिति पादयोः। विमुक्तिरिति पायौ। इति मानुषीः समाज्ञाः। अथ दैवीः। तृप्तिरिति वृष्टौ। बलमिति विद्युति। यश इति पशुषु। ज्योतिरिति नक्षत्रेषु। प्रजापतिरमृतमानन्द इत्युपस्थे। सर्वमित्याकाशे।

क्षेम वाणीच्या ठिकाणी रूपाने स्थित आहे. प्राण व अपान यांचे ठिकाणी योगक्षेमरूपाने स्थित आहे. हातांच्या ठिकाणी कर्मरूपाने, पायांच्या ठिकाणी गतिरूपाने आणि गुदेंद्रियांच्या ठिकाणी विसर्जनरूपाने स्थित आहे. या मानव उपासना आहेत.

आता दैवी उपासना — तृप्ति या भावनेने वृष्टीमध्ये ब्रह्मोपासना करावी. विजेच्या ठिकाणी बळ, पशुचे ठिकाणी यश, नक्षत्रांचे ठिकाणी तेज, जननेंद्रियाच्या ठिकाणी सुप्रजाननरस व आनंद आणि आकाशाचे ठिकाणी सर्वांची भावना करून उपासना करावी.

परमेश्वराच्या अनंत शक्ती आपल्यात आहेत. परंतु त्यांचे काम इतके बिनबोभाट सुरू आहे. सुरळीत चालू आहे आणि म्हणूनच आम्हाला त्याची जाणीव होत नाही. परंतु सूक्ष्म दृष्टीने जेव्हा विचार करायला लागतो तेव्हा 'नान्तोऽस्ति मम दिव्यानां विभूतीनां परंतप।' या वचनाची आठवण झाल्याशिवाय राहत नाही.

वाणीमध्ये भगवंत 'क्षेम' (कल्याण) बनून राहतो. मधुर वाणी संतोष देणारी, कल्याणी असते. तशीच ती वापरावी. मुखातून नेहमीच आशीर्वाद, सदिच्छा निघाव्यात. आपण प्राण आत घेतो व अपान बाहेर टाकतो. योग म्हणजे प्राप्त करणे व क्षेम म्हणजे मिळालेल्याचे रक्षण करणे. त्यादृष्टीने प्राण व अपान हे योगक्षेम आहेत.

प्राणापान समायुक्तः पचाम्यन्नं चतुर्विधम्।

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

Priority आत्मा त्वं गिरिजा मतिः सहचराः

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| 28 | 29 | 30 | | | | |

June 2010

8 am हातांची काम करण्याची शक्ती म्हणजे भगवंतच आहे
आणि पायांना गति देणारा ही तोच आहे. तसेच
9 गुदद्वारामध्ये विसर्जन करणारा तोच आहे. मनुष्याच्या
शरीरात परब्रह्माच्या या जाणिवा आहेत. त्यामुळेच
10 परब्रह्माचे अस्तित्व ध्यानात येते व त्याची उपासना
करता येते.

11 वाणीमध्ये ज्ञानाचा साठा आहे. वाणीची उपासना करून
ब्रह्मापर्यंत पोहोचता येईल. व्यर्थ बडबड न करता वाणीचा
12 उपयोग नामासाठीच करावा. न बोल मना, कोमळ वाचा
दे रे राम, न तु वृथा वाक्य---, Ratio, मौनाने शुद्धि
1 pm श्वासाची प्राणायाम उपासना ---- ब्रह्मापर्यंत घेऊन जाते
हातांनी नवनिर्मिति, सत्कर्म — — " " "
2 पायांनी प्रदक्षिणा, सत्कार्य — — " " "
केल्याने देशाटन पंडित मैत्री सभेत संचार
3 विविधतेतून एकता — यातून स्वतःचा उद्धार करायचा.
समाजा म्हणजे उपासनेची रीत म्हणता येईल.

दैवी उपासना - वृष्टीकडून तृप्ती देण्याचे शिकावे.
ब्रह्मज्ञानी आत्मतृप्त असल्याने त्याच्या सहवासात येणाऱ्या
5 प्रत्येकाला तृप्तीचा, शांतीचा अनुभव येतो. बीजमध्ये जे
बळ आहे त्यास बळ समाजोपयोगी कामासाठी, रक्षणासाठी
6 वापरायचे व त्या बळी ही त्याचीच शक्ती आहे ही भावना ठेवायची
सर्वान् अविशेषेण पश्यति इति पशुः । अशी समदृष्टी
7 ब्रह्मवेत्त्याकडे असते. ती आपल्यामध्ये आणावी. पाहिजे---
किंवा पूर्वी पशु हेच धन होते. शेतीसाठी धष्टपुष्ट बैल हवे
मधुर दूध देणाऱ्या गायी हव्यात. घोड्यात यश, समृद्धी
देणारे पशुच आहेत. त्यामुळे पशुमध्ये यश पहावे.

नक्षत्रात त्याचे तेज असते. ते आत्मसात करायचे
जननेंद्रियाच्या माध्यमातून नवनिर्मिती घडत असते. शिवाय
Birthday / Anniversary शरीर मातीवरचे अद्भुत सुख देण्याची शक्ती त्यात आहे.

© www.madhavaraghuveer.com

Priority सुषुप्ति वनामाजी निजून जावे

त्याच्यामुळेच वंशसातत्य टिकून राहते. निर्मितिक्षमता आणि आनंद या दोन्ही शक्ती त्याच्याच आहेत. त्या गुणांची उपासना करावी.

आकाश हे सर्वव्यापी आहे. ते सर्वांना आधार देते. परमेश्वराकडूनच त्याने हे गुण घेतले आहेत. त्याच्याच आधारावर सर्व काही सुरु आहे.

अशा प्रकारे शरीरात किंवा शरीराबाहेर त्या परब्रह्माच्याच शक्तींचा प्रत्यय येतो. त्यांच्या द्वारे त्या परब्रह्माची उपासना करता येते. तो बाहेर आहे तसा आतही आहे. तो दूर आहे तितकाच जवळही आहे.

शरीर / पिंड — वाणी, प्राणापान, हात, पाय, उपस्थ, वायु
बाहेर / ब्रह्मांड — वृष्टि, विद्युत, पशु, नक्षत्र, आकाश

या सर्वांमध्ये त्याच्या शक्ती भरून राहिल्या आहेत. या सर्व त्याच्या विभूतिच आहेत. त्यामार्फत त्याची उपासना केली तर त्याचेच दर्शन होईल.

सत् प्रतिष्ठा इति उपासीत। प्रतिष्ठावान् भवति। तन्मह इति उपासीत। महान् भवति। तन्मन इति उपासीत। मानवान् भवति। तन्नम इति उपासीत। नम्यन्ते अस्मै कामाः। तद् ब्रह्म इति उपासीत। ब्रह्मवान् भवति। तद् ब्रह्मणः परिमरः इति उपासीत। पर्येणं म्रियन्ते द्विषन्तः सपत्नाः। परि ये अप्रिया भ्रातृव्याः।

ब्रह्म सर्वाधार आहे अशी उपासना करावी. म्हणजे साधक ते स्थान पावतो. विशालरूपाने उपासना करावी. तो विशाल होतो. मनरूपाने उपासना करावी. तो विचारवान् होतो. नमस्काररूपाने उपासना करावी. सर्व मनोरथ पूर्ण होतात. ब्रह्मत्वरूपाने उपासना करावी. ब्रह्मवान होतो. कालरूपाने ते सर्वनाशक आहे असे जाणून उपासना करावी.

Birthday / Anniversary

© www.madhaveeragluveer.com

Priority

June 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| 28 | 29 | 30 | | | | |

8 am म्हणजे द्वेष करणारे शत्रु आणि अप्रिय नातेवाईक
लय पावतात.

9 आकाश हे सर्वांचा आधार आहे. परंतु त्या
आकाशाला ब्रह्माचा आधार आहे. सर्व अस्तित्वाला कारण
10 ते ब्रह्म आहे. आकाशाच्या माध्यमातून सर्वाधार
म्हणून त्याची उपासना करू शकतो. अशा उपासनेचे
11 फलस्वरूप म्हणून साधकाला प्रतिष्ठा, स्थिरता प्राप्त होते
मान मिळतो. ब्रह्म सर्वात महान आहे. त्याला भूमा
12 म्हणतात. त्या दृष्टीने त्याची उपासना केली तर साधक
महान, श्रेष्ठ बनतो. आकाशाकडे मनरूपाने पाहिले.
1 pm मनन केले. मन, चित्त रूपाने त्याची उपासना केली
तर त्याच्या चिंतन मननाला विचाराला खोली प्राप्त
2 होईल. अशा चिंतनशील साधकाला सर्वत्र मान मिळेल.
त्याची नमस्काररूपाने उपासना केली म्हणजे लीन
3 होऊन, नम्र होऊन, शरणभावाने उपासना केली तर सर्व
भोग सर्व कामना नम्र होऊन तुमच्या पायाशी येतील.
4 खं ब्रह्म असे म्हणून जर त्याची उपासना केली तर
आकाशाचे सर्व गुण (सर्वव्यापकत्व, सर्वसमावेशकता व
5 अव्यक्तता) साधकात येतील. उपास्य व उपासक एकरूप होतील.
साधक ब्रह्मवान होईल. ब्रह्मविद् होईल.
6 परिमर म्हणजे अकार्यक्षम करणारा / नाहीसे करणारा!
हे विश्व पाच गोष्टींवर चालते अग्नी, वीज, चंद्र, सूर्य वृष्टि!
7 या पाचांना अकार्यक्षम करणारा म्हणजे यांच्या पलीकडचा
वायु! हे यजुर्वेदाचे उपनिषद आहे. यजुर्वेदाचा अंतरिक्ष
लोक आहे. अंतरिक्षात संचार करणारा वायु हा जगाचा
प्राण आहे. म्हणून यात वायुला प्राधान्य दिले आहे.
सर्व काही प्राणावर (वायुवर) आधारित आहे आणि
प्रत्यक्ष अनुभवाला येणारे परब्रह्माचे ते पहिले रूप आहे.
त्याच्या माध्यमातून परब्रह्माशी एकरूप व्हायचे

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

July 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

Priority

WED JUN 16 2010

Wk 24, 167-198

२७ डिसेंबर २०१७

व्यष्टिचा परिसर म्हणजे निद्रा तर समष्टिचा परिसर
8 am
म्हणजे प्रलय! व्यष्टीत सर्व इंद्रिये, मन आदि प्राणात
9 विलीन होतात तर सृष्टीत सर्व वायुमध्ये विलीन होते
कारणात कार्य विलीन पावते. जिथून निघाले तिथे
10 जाऊन पोहोचते. व्यावहारिक - पाण्याच्या प्रत्येक थेंबाला
समुद्रापर्यंत जाण्याची ओढ असते.
11 ब्रह्मामध्ये उत्पत्ति-स्थिति-संहार अशा तीन ~~स्थिती~~
शक्ती आहेत. ब्रह्माची संहारक म्हणूनही उपासना करता येते.
12 अशी उपासना केल्यास ती संहारकशक्ती साधकामध्ये
येऊ शकते म्हणजे साधकाने प्रत्यक्ष काही करायची गरज
1 pm नसते. आपोआपच दुर्जन वैरी नामोहरम होतात. त्यांच्या
मनातील वैरभाव नष्ट होतो. त्यांचा वध करणारे, फारसे
2 कुणी शिल्लक राहत नाही. तुकाराम महाराज - रामेश्वरभट.
ज्ञानेश्वर माऊली - चांगदेव. आचार्य - मंडनमिश्र.
3 साधुसंत आपणहून कुणाशीही वैरभाव बाळगत
नाहीत. त्यांना सर्वांविषयी कळवळा असतो. त्यांचा अकारण
4 द्वेष करणाऱ्यांबद्दल त्यांना प्रेमच असते. शेवटी ते त्यांना
प्रेमाने जिंकून घेतात आणि द्वेष करणारे त्यांचे भक्तच बनतात.
5 मात्र सर्वसामान्यांची धारणा निराळीच असते. त्यांना
वाटते की संतांना त्रास देणाऱ्यांना परमेश्वर शिक्षा करतो
6 खरी वस्तुस्थिती अशी आहे की प्रत्येक गोष्टीच्या माध्यमातून
परब्रह्मापर्यंत पोहोचता येते. तसा प्रयत्न केला तर आयुष्याचे
7 सोने होते, सार्थक होते. जीवन आनंदमय होते.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

8 am सः यः च अयं पुरुषे यः च असौ आदित्ये सः एकः
सः यः एवंवित् । अस्मात् लोकात् प्रेत्य । एतम्
9 अन्नमयं आत्मानम् उपसंक्रम्य । एतं प्राणमयं आत्मानम्
उपसंक्रम्य । एतत मनोमयं आत्मानम् उपसंक्रम्य । एतं
10 विज्ञानमयं आत्मानम् उपसंक्रम्य । एतम् आनन्दमयम्
आत्मानम् उपसंक्रम्य इमान् लोकान् कामान्नी
11 कामरूपी अनुसंचरन् एतं साम गायन् आस्ते ॥

12 तत्त्व - आपण मूळ आत्मस्वरूप आहोत.
अर्थ - मनुष्याच्या देहात राहणारा आत्मा आणि सूर्य-
1 pm मंडळात म्हणजे विश्वात राहणारा आत्मा एकच आहे.
ज्या पुरुषाला आत्मा आणि परमात्मा एकच आहे
2 असा अनुभव येतो तो या लोकातून मरण पावल्यावर
अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय व आनंदमय
3 कोश क्रमाने ओलांडून पलीकडे जातो आणि इच्छेला
येईल ते अन्न खाणारा व इच्छेला येईल ते रूप
4 धारण करणारा होतो. पुढे सामाचे गायन करीत या
लोकांमध्ये संचार करत राहतो.
5 आपण मूळ परमात्मस्वरूप असल्याने भगवंताचे सर्व
गुण - तेज, बळ, समाधान, निष्कामता आपल्यात आहेतच.
6 परंतु स्वतःच्या स्वरूपाचा विसर पडल्यामुळे देहाच्या
बंधनात अडकून हीन, दीन, आकुंचित, स्वार्थी आणि
7 दुःखी झालो आहोत. परंतु तरीही भगवंताचे गुण
अल्पांशाने का होईना आपल्यात आहेतच. त्यापैकी
एका तरी गुणाचा आधार घेऊन उपासना केली, [struck out]
भगवंताचे चिंतन केले तर आपली हीनता, दीनता,
आकुंचितपणा कमी होत जातो. पर्यायाने जीवनातील
दुःख नाहीसे होते.

Birthday / Anniversary

© www.madhuveeraghuveer.com

July 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

*Priority*



8 am म्हणून ज्याला भगवंताचा जो गुण आवडेल त्या
रूपाने भगवंताला जीवनात पाहण्याचा अभ्यास
9 ठेवला तर जीवाचा आपोआप विकास घडून
तो आत्मदर्शनाला प्राप्त होईल. उदा० आनंद हा
10 भगवंताचा एक गुण आहे. आपल्या जीवनातील
प्रत्येक घटनेत जर आनंद मानायला शिकलो तर
11 भगवंताची आनंदरूपाने उपासना होईल.

साधकाने असा अभ्यास केल्यास तो सुखदुःखाच्या
12 पलीकडे जाऊन आनंदस्वरूप बनतो. जे जे घडते ते ते
आनंदरूपच मानता आले तर आनंदवृत्ति कायम राहते
1 pm आणि कोणत्याही परिस्थितीत समाधान भंगत नाही.
प्रापंचिकाने प्रपंचाची घडी बिघडू न देता आनंदाचा
2 अभ्यास करणे इतके काही कठीण नाही.

काळ देहासी आला खाऊ
3 आम्ही आनंदे नाचू गाऊ

असे नामदेव महाराज म्हणतात.

4 कोणतेही संकट आले तरी त्यामागे परमेश्वरी
योजना असली पाहिजे. साधकाला अध्यात्ममार्गावर पुढे
5 नेण्यासाठी परमेश्वराने हा घाट घातला आहे, असे
कळले की मग मनुष्याला संकटाचा बाऊ वाटत नाही.
6 किंबहुना तो ~~[illegible]~~ नवीन धडा शिकण्यासाठी नवनवीन
संकटांची वाट पाहू लागतो.

7 हद्दपार झाले तर विजनवासात पडून राहावे लागेल याचे
दुःख न मानता विश्रांति व अभ्यास करता येईल याचे
समाधान मानावे. कोणाच्या तरी मृत्यूने आपले पाश
व आसक्ती कमी झाली असे समजावे.

लो. टिळक - कारागृहात गीतारहस्य, O मंडाले ४० ग्रंथ

Birthday / Anniversary

19 SAT JUN 2010

Wk 24, 170-195

Priority

June 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| 28 | 29 | 30 | | | | |

निजानन्दनिर्भरा मुनीची वृत्ती साक्ष दे अर्जुनी
जरी उपनिषत्कालीं रंगली हाऽऽऽउ हाऽऽउ म्हणुनी ||

8 am
हाउवु हाउवु हाउवु । अहम् अन्नम् अहम् अन्नम्
अहम् अन्नम् । अहम् अन्नादो२ अहमन्नादो२
9
अहमन्नादः । अहम् श्लोककृत् अहं श्लोककृत् अहं
श्लोककृत् । अहमस्मि प्रथमजा ऋता३स्य । पूर्वं
10
देवेभ्यो अमृतस्य ना३ माभि । यो मा ददाति
स इदेव मा३ आवाः ।
11
अहमन्नं अन्नं अदन्तम् ३ घि । अहं विश्वं भुवनं
अभ्यभवा ३ म् । [illegible]
12
[illegible]

1 pm

2

3

4

5

6

7

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com